आलोक / डॉ. नीळकंठ रथ / पारखे उद्योग समूह / सौ. प्रभा ठकार
डॉ. बी. जी. देशपांडे / श्रीपाद जोशी / डॉ. गुप्ते / व्यवसाय मार्गदर्शन
व इतर नेहमीचे साहित्य

11 SEP 1975

# अर्थ

जुलै ७५ • ३ रुपये



# अर्थ मासिकासंबंधी थोडी माहिती

प्रा. बा. गो. काळे ह्यांनी 'अर्थ' हे नियतकालीक आर्थिक प्रश्नांची सामान्य जनांस माहिती व्हावी व त्यातून महाराष्ट्राचा आर्थिक अभ्युदय होत रहावा, ह्या ध्येयाने १९३५ मध्ये सुरू केले. त्यांच्या निधनानंतर १९४६ ते डिसेंबर १९७४ पर्यंत त्यांचे चिरंजीव, प्रख्यात लेखक व विचारवंत श्रीयुत श्री. बा. काळे ह्यांनी न्या. रानडे व प्रा. काळे ह्यांची समाजहितेच्छू परंपरा चालू ठेवण्याच्या निष्ठेने हे कार्य पुढे चालविले.

वैयक्तिक जबाबदारीवर आणि कोणत्याही व्यापारी संस्था, उद्योग-समूह वा राजकीय पक्ष इत्यादींचे मिंधे न होता ध्येयवादी प्रेरणेने चालविलेले, आर्थिक विषयांना वाहिलेले हे एकमेव नियत-कालिक, त्याच ध्येयधोरणांशी सुसंगती राखून आम्ही पुनरुज्जीवित करण्याचा संकल्प केला आहे.

आपल्या ह्या मासिकात-आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, महाराष्ट्रीय स्तरांवरच्या आर्थिक घडामोडी, उद्योग-कारखानदारी, व्यापार, स्वतंत्र व्यवसाय, व्यवस्थापन, चलन, वित्त, बँकिंग, नियोजन, विकास, शेती, ग्रामीण उद्योग, सहकार, श्रमिक, तरुणांना उपयुक्त मार्गदर्शन, कॉलेज व हायरसेकंडरी अभ्यासक्रमास संदर्भ व पूरक वाचन, नवीन प्रक्रिया, यंत्रे, प्रकल्प ह्यांना प्रसिद्धी, गृहोपयोगी अर्थ-शास्त्र आणि ग्रंथपरिचय, ह्यांसारख्या जिव्हाळ्याच्या आर्थिक विषयांच्या अभ्यासाचे उपयुक्त साहित्य उपलब्ध होईल.

अर्थतज्ज्ञ, नामवंत प्राध्यापक, यशस्वी व उमलते उद्योगपती-व्यापारी-बँकर-सहकारी नेते-श्रमिक संघटक इत्यादींकडून लेख मिळविण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्यामुळे सिद्धांताचा अभ्यास करणाऱ्यांना व्यवहाराची (Application) माहिती होते. तसेच व्यवहारात यशस्वी झालेल्या व्यक्तींना तात्त्विक बैठक व आर्थिक धोरणाविषयी योग्य अंदाज करण्यास उपयुक्त व अद्ययावत माहिती मिळणे शक्य होईल.

सध्याच्या युगात आर्थिक संघर्ष जास्त निकराचा झाला आहे. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी आर्थिक प्रश्नांचे समग्र ज्ञान प्राप्त करून घेणे, हे सर्वांना अनिवार्य झाले आहे. ह्या दृष्टीने अर्थ हे मासिक आपल्या संस्थेतील सर्व घटकांच्या वाचनात यावे तसेच वैयक्तिक स्वतःच्या संग्रहीदेखील असावे, असे आपणास अर्थातील साहित्याच्या उपयुक्ततेमुळे वाटत राहील. अर्थचा दर्जा त्या दृष्टीने सतत अधिक चांगला होत रहावा, ह्या दृष्टीने आमचे परिश्रम सातत्याने चालू राहतील.

आपण ह्या मासिकाचे वाचक, लेखक, टीकाकार तसेच शक्य असल्यास जाहिरातदार होऊन ह्या चांगल्या कार्यास उदार आश्रय द्यावा, ही विनंती.

आपले नम्र

कमलाकर परचुरे सुभाष बर्वे भालचंद्र राव

## चेंबर ऑफ कॉमर्स व इण्डस्ट्रीजचे सभासद, बँकर्स, व्यापारी, कन्सल्टंट्स व उद्योगपती ह्यांसाठी

अर्थमध्ये आम्ही 'उद्योग-वार्ता' हे सदर सुरू करीत आहोत. त्यात आपण केलेल्या उत्पादनातील नवीन तंत्रांचा वापर, उत्पादन-वाढीचे प्रकल्प, आयातपर्यायतेकरिता केलेले विशेष प्रयोग तसेच खर्च व किमती कमी करून गुणवत्ता वाढवण्याकरता केलेले प्रयत्न ह्यांना विशेष प्रसिद्धी दिली जाईल.

शासन, समाज, अर्थतज्ज्ञ व संबंधित संस्था ह्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या दृष्टीने आपण आपल्या उद्योग-व्यवसायातील अडचणी व त्रुटी ह्यांच्यासंबंधी मोकळेपणाने आपले विचार लेख वा मुलाखत ह्यांच्याद्वारे मांडावेत. आपले हे मासिक त्या दृष्टीने एक फार उपयुक्त व चांगले माध्यम होऊ शकेल. जनतेतील तसेच शासक वर्गातील आपल्यासंबंधी असलेले पूर्वग्रह व गैरसमज दूर होण्यास त्याची मदत होईल. अशा प्रकारच्या लेखनातील वेळ व त्रास वाचविण्याच्या दृष्टीने आम्ही आवश्यक ते सहकार्य देण्यास सदैव उत्सुक आहोत.

## रचनात्मक कार्य करणाऱ्या लोकनेते व सहकारी चळवळीतील संघटकांसाठी विनंती विशेष

शहरी विचारवंत व ग्रामीण परिसरातील कृषि-उद्योग घडविणाऱ्या कार्यकर्त्यात अंतर पडू नये, ह्या दृष्टीने आपण कार्यान्वित केलेल्या विविध लोकोपयोगी आर्थिक प्रकल्पांची माहिती अशा मासिकातून वेळोवेळी प्रसिद्ध होणे अगत्याचे आहे. शहरी लोकांचे पूर्वग्रह नाहीसे करण्याकरता कोणतेही कार्य उभे करताना ग्रामीण भागात कोणत्या अडचणी येतात, ह्यांची इतरेजनांस जाणीव देणे तितकेच आवश्यक झाले आहे. यांत्रिकीकरण तसेच विज्ञाननिष्ठ आधुनिकीकरणाचा वेग इतका प्रचंड आहे की शहर व खेडे ह्यांतील फरक केवळ कृत्रिमच राहील, अशी आता तरी स्थिती आहे.

आपल्या परिसरातील नव्या उमेदीच्या तरुण कार्यकर्त्यास एकूण जागतिक व राष्ट्रीय स्तरावरची आर्थिक माहिती अद्ययावतपणे होणे जरुरीचे झाले आहे. ह्या दृष्टीने त्यांच्या आकांक्षा व आवाका वाढविण्याकरिता अर्थचे वाचन व त्यावरील विचारमंथन आपल्या पुढाकाराने शक्य होईल.

आपण केलेल्या आर्थिक प्रगतीबद्दलचे समाधान कोणाला तरी सांगावे, असे वाटणे साहजिक आहे. त्याचप्रमाणे आपल्या भागातील आर्थिक प्रकल्पांकरता कोणत्या अडचणी येतात तेही इतरांना सांगितले गेले तर अशा सुसंवादाने अडचणी निवारण करण्याच्या दृष्टीने योग्य ते धोरण व कार्यवाही होण्यास अनुकूल वातावरण तयार होत असते.

ह्या दृष्टीने आपले लेख व हृद्गत अर्थ मासिकात छापण्यास आम्हाला फार आनंद होईल.

अर्थचे धोरण 'अकरणात्मक' ( Negative ) नाही. कार्य करणाऱ्यांच्या हातूनच चुका होतात; त्यांच्या कार्यात त्रुटी राहतात. पण कार्यात काय साधले, कितपत साधले आणि झाले त्यापेक्षा अजून चांगले होण्याकरिता काय करणे आवश्यक होते... ह्या गोष्टींना आमच्या दृष्टीने जास्त महत्त्व देणे उचित होईल.......... ह्या विचारांशी आपण सहमत असाल ह्या अपेक्षेने आपल्याकडून योग्य ते सहकार्य मिळत राहील असे वाटते.

# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : पहिले अंक : चवथा : जुलै ७५
किंमत : ३ रुपये वार्षिक वर्गणी : ३० रुपये

क्रम :

आलोक / १
शेतमालाच्या किमती / ६
एक पुरुषार्थ-गाथा / ११
नवीन यंत्रे, प्रक्रिया, प्रकल्प / १५
नैसर्गिक तेल व आर्थिक गळचेपी / २२
अर्थशास्त्रीय परिभाषेचा प्रश्न / २६
मोझांबिक / ३२
तरुणांचे मनोगत / ३५
ग्रंथपरिचय / ३८
संख्याचित्र / ४०
पाच–तीन–दोन / ४३
कंपन्यांच्या कारभाराची मेख / ४४

# आलोक

## जग

युनोतर्फे औद्योगिक विकास परिषद पेरू देशातील लीमा येथे मार्च २७ ला आयोजित करण्यात आली होती. परिषदेत गाजलेला ठराव म्हणजे 'तिसऱ्या जगातील मागास देशांना जागतिक उद्योग व व्यापार ह्यात २५ टक्के वाटा मिळेल अशा दृष्टीने विकसित राष्ट्रांनी सहाय्य व आवश्यक तो वाव उपलब्ध करावा. इ. स. २००० ह्या वर्षी अविकसित देशांचे सामर्थ्य इतके वाढावे अशी अपेक्षा करण्यात आली. सध्या जगातील शेकडा ७० टक्के लोकसंख्येकडून जगाच्या एकूण औद्योगिक उत्पादनापैकी फक्त ७ टक्केच उत्पादन होते. ह्या ठरावावर उलटसुलट चर्चा झाली, उपसूचना आल्या व खूप वादंग माजले. अमेरिका, प. जर्मनी, जपान, फ्रान्स, ब्रिटन, कॅनडा ह्या देशांनी ठरावासंबंधी प्रतिकूल व तटस्थ भूमिका घेतली. तथापी ठरावाच्या दिशेने कार्य करण्याकरिता एक विश्वव्यापी धोरण व संघटित प्रयत्न करण्यात यावा ह्यावर एकमत झाले आहे. परिषदेतला दुसरा महत्त्वाचा ठराव म्हणजे, "विकसनशील देशांना त्यांच्या आयात किमतीच्या प्रमाणात निर्यात किमती वाढविण्यास व त्या दोहोंमध्ये मेळ बसविण्यास मुभा द्यावी." हा ठराव ७४ अनुकूल व ६ विरोधी अशा मतदानामुळे पास झाला. ६ विरोधी देश म्हणजे अमेरिका, प. जर्मनी, इटली, जपान, कॅनडा व ब्रिटन. ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, बेल्जम, डेन्मार्क, फिनलंड, आयर्लंड, नेदरलंड, न्यूझीलंड, नॉर्वे, स्पेन, स्वीडन व स्वित्झर्लंड ह्यांनी ह्या ठरावाबद्दल तटस्थता दर्शविली.

गॅट (जनरल अग्रीमेंट ऑन टॅरिफ्स व ट्रेड) ह्या संस्थेने जागतिक आर्थिक परिस्थितीसंबंधीचा आपला सविस्तर अहवाल नुकताच सादर केला आहे. अहवालात असे म्हटले आहे की–जरी जागतिक व्यापार १९७३ पेक्षा ४४ टक्यांनी किमतीच्या स्वरूपात वाढला असला तरी वास्तविक पहाता त्यातील वाढ ७४ मध्ये फक्त ५% च आहे. १९७३ चे तुलनीय आकडे असे :– मागील वर्षापेक्षा म्हणजे १९७२ पेक्षा ३८ टक्क्यांनी व्यापारमूल्यात वाढ पण संख्यात्मक वाढ व्यापारातील ७२ पेक्षा पंधरा टक्क्यांचीच दिसते. ह्याचाच अर्थ वस्तू व सेवांच्या संख्यात्मक व्यापारात वाढ झालेली नसून त्यांच्या किमतीत बरीच वाढ झालेली दिसते. जागतिक व्यापारातला महत्त्वाचा वाटा OECD (ऑर्गनायझेशन ऑफ इकॉनॉमिक को–ऑपरेशन व डेव्हलपमेंट) च्या सभासद राष्ट्रांचा आहे; पण १९७४ च्या उत्तरार्धात त्या देशातील उत्पादनात फार मोठी घट झाली. त्या देशात आलेल्या मंदी व चलनवाढीमुळे जाग-

तिक व्यापारात संख्यात्मक घट आलेली दिसते. १९७५ च्या उत्तरार्धात जर त्या देशातील परिस्थिती सुधारली तर जागतिक व्यापारात १ ते ३ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याचा संभव आहे. पेट्रोल पाठविणाऱ्या देशांकडे जगातील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांकडून निर्यातीचा ओघ मात्र फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मागील वर्षापेक्षा अशा निर्यातीत सुमारे दुप्पट वाढ झालेली आहे आणि ही निर्यात एकूण जागतिक व्यापाराच्या २० ते २५ टक्के असू शकेल असा अंदाज व्यक्त केला आहे. ह्याउलट अरब देशांकडून पाठवलेल्या वास्तव निर्यातीत ४ टक्के घट होऊनही त्यांना मिळालेल्या उत्पन्नात १७५ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. पेट्रोल निर्यात करणाऱ्या देशांखेरीज इतर बहुतेक देशात आयातीत वाढ व देण्याघेण्याचा असमतोल कमीजास्त प्रमाणात आढळतो आहे. चालू वर्षी औद्योगिक राष्ट्रांच्या निर्यातीत मात्र विक्रमी वाढ झाली; कारण तशी वाढ करणे त्यांना अपरिहार्यच झाले होते.

जागतिक बँकेचे अध्यक्ष रॉबर्ट मॅकन्मारा ह्यांनी १९७५ ते १९७९ ह्या आगामी चार वर्षांत जगातील गरीब देशांच्या शेतकी प्रगतीस सहाय्य करण्याकरता व अन्नसमस्येवर मात करण्याकरता ७२०० दशलक्ष डॉलर्सची मदत उपलब्ध केली जाईल असे जाहीर केले. जगातील ८० कोटी गरीब लोकांपैकी सुमारे ६० कोटीहून जास्त लोक अत्यंत हलाखीच्या व दयनीय परिस्थितीत जीवन कंठत आहेत. त्यांची गरिबी ही मानवी अस्मितेला लांछन आणणारी आहे. ह्या मदतीतर्फे शेती-उत्पादन, आरोग्य, शिक्षण, निवास ह्यांमध्ये सुधारणा घडविणाऱ्या योजनांना प्राधान्य दिले जाईल.

## अमेरिका

कंबोडियाने अमेरिकेचे व्यापारी जहाज 'मायागेझ' १२ मे रोजी कांपांग सोम बंदरात अडकवून ठेवले होते. ह्यापूर्वी अशी घटना उत्तर कोरियात जानेवारी १९६३ मध्ये झाली होती. त्या वेळी उ. कोरियाने अमेरिकेचे एक टेहळणी जहाज ('प्युब्लो) पकडले होते. कंबोडियाने ज्या अटी घातल्या होत्या व हेरगिरीचे आरोप केले त्यामुळे अमेरिकेत खळबळ उडाली. ताबडतोब प्रे. फोर्ड ह्यांनी ह्याबाबतीत गंभीर उपाययोजना केली जाईल, जहाज त्वरित मुक्त करावे असा संदेश धाडला होता. हेन्री किसिंजर ह्यांनी अमेरिका ही गोष्ट सहन करणार नाही असाच इशारा दिला. तथापी त्याची फारशी दखल घेतली गेली नाही. दि. १५ मे ला अमेरिकेच्या आरमार व विमानदलाने सुमारे १५ तासांची घनघोर लढाई करून हे जहाज सोडविले. ह्या बाबतीत जगातील देशांची प्रतिक्रिया विभिन्न आहे. सोव्हिएत रशियाने आग्नेय आशियातल्या राजकारणात जास्त लक्ष मुद्दाम घालायचे नाही असे ठरवलेले दिसते म्हणून रशियाने अमेरिकेचा प्रत्यक्ष जळजळीत निषेध केला नाही. चीन व उत्तर व्हिटनाम ह्यांनी ह्या लढाईच्या घोडचुकेबद्दल अमेरिकेस दोषी धरले. प्रथम हेरगिरी करायची व त्यानंतर दंडेलगिरी; पण ह्याच धोरणाने अमेरिकेला द. व्हिटनाममधून व आग्नेय आशियातून माघार घ्यावी लागणार आहे असा इशारा दिला. प. जर्मनीने अमेरिकेला पाठिंबा दिला आहे व असंही म्हटले आहे की अमेरिकेलाही जर्मनीचा पाठिंबा घेणे जरुरीचे आहे. जपानमधील सत्तारूढ पक्षाने, व्यापारी जहाज खुल्या समुद्रात वावरताना पकडण्याबद्दल, कंबोडियाला दोषच दिला आहे; पण जपानमधल्या विरोधी पक्षाचा ह्या भूमिकेला पाठिंबा नाही. बेल्जममध्ये तटस्थता दर्शविली गेली. फ्रान्स, भारत, डेन्मार्क, लेबॅनॉन, स्पेन, पूर्व जर्मनी ह्या देशांतील वृत्तपत्रांनी मात्र अमेरिकेच्या धोरणाचा निषेध केला आहे.

खुद्द अमेरिकेत फोर्ड ह्यांनी उचललेल्या पावलाचे बरेच स्वागत झाले. त्यामुळे राष्ट्राचा आत्मविश्वास, आशावाद दुणावला. युरोपमधील नाणेबाजारात डॉलर शक्तिमान झाला. जहाजाची सुटका झाल्यामुळे आग्नेय आशियातले पुन्हा होऊ घातलेले युद्ध टळले म्हणून नाणेबाजारात डॉलरची मागणी स्थिर झाली. काही अमेरिकन अर्थतज्ज्ञांचं असं मत आहे की, ह्यामुळे अमेरिकेतली सध्याची मंदी कमी होण्याचा संभव आहे. टाइम पत्राने जो अमेरिकन जनतेचा नुकताच कानोसा घेतला आहे त्यातील काही निष्कर्ष असे आहेत. हा कानोसा यँकेलोव्हिच ह्यांच्या लोकमताच्या संशोधनपद्धतीनुसार घेतला गेला. हा अभ्यास टेलिफोनच्या सहाय्याने संपर्क पातळीवर झाला. आता फक्त ३६ टक्के लोकांना देशातील सध्याची परिस्थिती आर्थिकदृष्ट्या समाधानकारक वाटत नाही. 'मायागेझ'च्या मुक्तीपूर्वी हे आर्थिक निराशावादाचे प्रमाण जास्त होते ते आता कमी होत आहे.

## ब्रिटन

नाइलाजाने एप्रिल १ पासून ब्रिटनमधील घरगुती वीजवापराचे दर ३० टक्क्यांनी वाढवण्यात आले आहेत. अर्थमंत्री डेनिस हीले ह्यांनी वीजकामगारसंघटनांना...वेतनवाढीसंबंधी सबुरीची भूमिका घेण्यास सांगितले आहे. ब्रिटन इतर

देशांतून चलनवाढ आयात करीत नसून देशातल्या वेतनवाढीमुळेच ही समस्या निर्माण झाली आहे असे त्यांनी मत व्यक्त केले. वाजवीपेक्षा जास्त मजुरी खर्च झाल्यामुळे एखाद्या कंपनीस जसे दिवाळे काढून उद्योग बंद करावा लागतो तशी काहीशी स्थिती आज ब्रिटनची झाली आहे असेही त्यांनी सांगितले. राजकीय ध्येय-धोरणापेक्षा आर्थिक वास्तवता स्वीकारणे, राष्ट्रीकृत उद्योगांचा तोटा कमी करणे, विशेषतः अन्नावर, ब्रेडवर द्यावयाच्या मदती (सबसिडीज) बंद करून राज्याच्या खर्चात कपात करणे आणि मोठ्या प्रमाणावर वेतनवाढ होण्यास प्रतिबंध करणे ह्या गोष्टी ब्रिटनची अर्थव्यवस्था सुरळीत करण्यासाठी जरुरीच्या आहेत असे त्यांचे मत आहे. ब्रिटनचे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन ह्यांनी युरोपीय आर्थिक कुलाचे सभासदत्व चालू ठेवण्याच्या धोरणास ब्रिटिश जनतेचा भरघोस पाठिंबा मिळवला असल्यामुळे विल्सन ह्यांचे स्थान जास्त पक्के झाले आहे. विल्सन ह्यांच्या धोरणाला कामगार-संघटनांनी विरोध दर्शविला होता.

## चीन

मध्यंतरी अमेरिकन वृत्तपत्रसंपादकांचा एक समूह चीनमध्ये गेला असता उपपंतप्रधान तेंग-सिओ-पिंग ह्यांनी त्यांचेजवळ मोघम असे उद्गार काढले की, तैवानमुक्तीचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी व मुख्य चीनशी तैवान संलग्न करण्याकरता चीनला सैनिकी कारवाई करावी लागेल असे वाटते. 'ज्या ठिकाणी झाडू पोचत नाही तिथून धूळ सहजासहजी निघत नाही.' असेही त्या संदर्भात ते म्हणाले.

भारताने ज्या पद्धतीने सिक्कीमचे संलग्नीकरण केले त्याबद्दल चीनने भारताचा निषेध केला आहे. काश्मीरमधील नव्या राजकीय बदलांच्या बाबतीतही चीनने भारताचा निषेध करून, पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या भूमिकेचाच अनुनय केला आहे.

## बांगला देश

६ एप्रिल रोजी बांगला देशात १०० टक्क्याच्या (Takka) सर्व नोटा पूर्वसूचना न देता एकदम रद्द करण्यात आल्या. ह्या बदलानंतर तीन दिवस चलनाचे व बँकांचे सर्व देवघेवीचे व्यवहार स्थगित ठेवण्यात आले. जुन्या नोटा बँकांमध्ये जमा करून त्याऐवजी धारकांना रसीदा देण्यात आल्या आहेत. काळा पैसा व चलनवाढ ह्यामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडवणे हा ह्या कारवाईपाठीमागचा उद्देश आहे.

## इराण

एप्रिल २३ रोजी इराण व भारत ह्या उभय देशांत संयुक्त व्यापारी करार झाला. करारावर मि. फरेदून महादेवी व श्री. पी. एन. हक्सर ह्या अनुक्रमे इराण व भारत ह्यांच्या प्रतिनिधींनी सह्या केल्या.

करारान्वये भारताने ७·५ दशलक्ष टन अशुद्ध लोखंड प्रतिवर्षी १९८० ते २००० ह्या २० वर्षांत इराणला पुरवायचे. त्या बदल्यात इराणने ३० कोटी डॉलरचे दीर्घ मुदतीचे कर्जसहाय्य दिले आहे. भारतातील एका कागदकारखान्यास २० लक्ष टन कागद पुरविण्याकरता लागणाऱ्या भांडवल-गुंतवणुकीची जबाबदारी इराणने घेतली आहे. इराणमधील अराक ह्या ठिकाणच्या अॅल्युमिनियम कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता भारतातर्फे तांत्रिक सहाय्य व ३० लक्ष टन अॅल्युमिनियम दरवर्षी पाठवण्यात येणार आहे. मागील मार्चमध्ये इराणमध्ये आश्रय घेतलेल्या कुर्दिश टोळ्यांतील सुमारे ५०००० निर्वासित इराकच्या सरहद्दीवरील आपल्या नेहमीच्या वस्तीच्या प्रदेशात परतले आहेत. इराक व कुर्दिश लोकांच्या ह्या चकमकीत आतापर्यंत उभयपक्षी सुमारे २०००० लोक कामी आले असावेत.

## जपान

एप्रिल ७५ मध्ये जपानच्या परराष्ट्रीय व्यापारात ४२ कोटी डॉलर्सची तूट दिसते. तुटीची प्रमुख कारणे म्हणजे जपानमध्ये औद्योगिक मंदीचे वातावरण हे एक आणि जपानमधून अल्प मुदतीचे भांडवल, बाहेर जाण्याच्या प्रक्रियेत वाढ ही होत. जपानचा एक प्रमुख उद्योग म्हणजे जहाज-बांधणी. जहाज बांधणाऱ्या कंपन्यांना २५·५ कोट डॉलर अॅडव्हान्स रक्कम परदेशातल्या ग्राहकांकडून मिळाली; पण कंपन्यांना आपल्या कर्जाची परतफेड करताना ४·३ कोट डॉलर्स द्यावे लागले. त्यामुळे १·५ कोट डॉलर्स किमतीचे अल्पमुदती भांडवल परदेशी बँकात जमा झाले.

जपानने आपली परदेशाची चलन-तूट भरून काढण्याकरिता परदेशी कर्जे घेण्याचे धोरण स्वीकारले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीतल्या शिलकी तसेच एस. डी. आर. व अर्जित चलन ह्यांचा वापर न करता तात्पुरते परदेशी चलन उसने घेऊन परिस्थिती निभावून न्यायची असे धोरण जपानने तूर्तास स्वीकारले आहे.

## भारत

### फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स व इंडस्ट्रीज F. I. C. C. I. = वार्षिक अधिवेशन

फेडरेशनचे वार्षिक अधिवेशन २५ एप्रिल रोजी नवी दिल्ली येथे भरले होते. अध्यक्ष के. के. बिर्ला ह्यांनी उद्घाटक श्रीमती इंदिरा गांधी ह्यांचे स्वागत करताना चलनवाढीविरुद्ध घेतलेल्या शासकीय कार्यक्रम व पवित्र्यांचे अभिनंदन केले. सांप्रतच्या कठीण काळात फेडरेशनचे सर्वतोपरी सहकार्य देशास मिळेल असेही आश्वासन त्यांनी दिले. त्या वेळी श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनी शासनाचे धोरण संमिश्र अर्थव्यवस्थेस अनुकूल राहील की नाही ह्याबद्दल पंतप्रधानांनी निःसंदिग्ध खुलासा करावा अशी विनंती केली होती. पंतप्रधानांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात असे सांगितले की, देशाच्या आर्थिक नीतीमध्ये कोणत्याही प्रकारचा आमूलाग्र बदल होणे संभवनीय नाही व इष्ट नाही. व्यापारी व उद्योगपतींनी मात्र आपल्या गरीब व अविकसित देशातील प्रश्न ओळखून त्यांच्याशी समरस भूमिका घ्यावी. सरकार, नियोजन–खर्च व विशेषतः नियोजनाव्यतिरिक्तच्या खर्चात कपात करणार आहे आणि किमती उतरविण्यासाठी व स्थिर ठेवण्यासाठी बँकांतर्फे देण्यात येणाऱ्या कर्जांवर मर्यादा पूर्ववत चालू ठेवाव्या लागतील असे सांगितले. विशेषतः कृषि, कृषि–उद्योग, लघु–उद्योग व राष्ट्रीय पातळीवरचे महत्त्वाचे उद्योग ह्यांना प्राधान्य देण्याकरता बँकांनी कर्जांचे वाटप गरजेनुसार नियोजित करावे असे सुचवले.

फेडरेशनचे अध्यक्ष के. के. बिर्ला ह्यांनी नियोजनखर्चात चालू वर्षी केलेली २३ टक्के वाढ ही अपुरी आहे असे सांगून देशातील अनेक उद्योगधंद्यांना जी मंदीची झळ बसत आहे त्याला कारणीभूत बँकांतर्फे मिळणाऱ्या कर्जात झालेला तुटवडा आणि उद्योगांची इतर माध्यमातून भांडवल उभारण्याची असमर्थता ह्या प्रमुख बाबींकडे लक्ष वेधले. पोलाद, काच, रेयॉन, सायकली, पंखे, ज्यूट, कापडगिरण्या, यंत्रोत्पादक कारखाने ह्या उद्योगात मंदीचे प्रमाण फार असून मिनि-पोलाद कारखाने, रेल्वे वॅगन उद्योग व मोटरकारखाने ह्यांची परिस्थिती अगदीच वाईट आहे असे त्यांनी सांगितले. ह्या उद्योगांपैकी काही कारखाने बंद करावे लागले आहेत व काहींच्या उत्पादनवाढीच्या व गुंतवणुकीच्या योजना स्थगित कराव्या लागल्या आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील घसरणीची ही प्रवृत्ती नाहीशी करण्याकरता उत्पादनकरात सवलती, बँक–पत–शिथिल–धोरण, घसारानिधीत वाढ करण्यासाठी सवलती देणे इ. गोष्टींची मागणी केली. फेडरेशनने खालील ठराव केले– (१) आयात-पर्याय वस्तू करणाऱ्या कारखान्यांना उत्तेजन देण्याकरता कायमचे 'राष्ट्रीय आयात–पर्यायता महामंडळ' स्थापन करावे. (२) निर्यातीस जास्त चलन व मूल्य मिळवून देणाऱ्या अद्ययावत वस्तूंना प्राधान्य दिले जावे. कच्च्या मालाच्या पारंपारिक निर्यातीपेक्षा अभियांत्रिकी उद्योगात तयार झालेल्या व अधिक मूल्य मिळविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाला महत्त्व द्यावे. (३) भारतीय उद्योगांना परदेशातील उद्योगांच्या साहाय्याने संयुक्त संचालित उद्योग सुरू करण्यास उत्तेजन मिळावे. (४) निर्यात–उद्योगयोजकांना रोकड सहाय्य व मदत त्वरित उपलब्ध करावी. त्यात दिरंगाई नसावी. (५) राज्य वीजमहामंडळाच्या तांत्रिक व शासकीय व्यवस्थापनाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. तसेच विद्युतशक्तीचा पुरवठा जास्त प्रमाणावर होण्यासाठी नवीन प्रकल्प पार पाडावे. त्याचबरोबर उपलब्ध विजेचे उद्योगांच्या महत्त्वानुसार वाटप–नियोजन होण्याची जरूर आहे. (६) पाचव्या पंचवार्षिक योजनांमध्ये देशातील कोळशाचे उत्पादन किमान उद्दिष्टाप्रमाणे १३५ दशलक्ष टन होण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे. कोळशाची जलद वाहतूक होण्यातही अडचणी आहेत. (७) देशातील पेट्रोल व तत्सम तेलांच्या साठ्याचा उपयोग करून घेण्याकरिता 'बांबे हाय' सारख्या योजनांना गती दिली जावी. (८) नैसर्गिक गॅस, गोबरगॅस, औष्णिक वीज व सूर्यशक्ती इत्यादी शक्तींची नवी साधने वाढवण्यास व उपयोगात आणण्यास उत्तेजन मिळावे.

फेडरेशनच्या नव्या पदाधिकाऱ्यांचीही निवड झाली. १९७५–७६ करता अध्यक्ष म्हणून श्री. हरीष महिंद्र व उपाध्यक्ष म्हणून श्री. एम. व्ही. अरुणाचलम ह्यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली.

कार्यकारिणीवर श्री. एस. के. बिर्ला, श्री. रामकृष्ण बजाज, श्री. श्रीराम चोखाणी, श्री. ओ. पी. खैतान, श्री. एम. एम. तायल, श्री. रौनकसिंग व श्री. एच. एल. सोमाणी ह्यांची निवड झाली.

## भारतातील सार्वजनिक उद्योगांची (Public Sector) आर्थिक स्थिती

सार्वजनिक उद्योगांचे हिशेब एप्रिल ७५ मध्ये लोकसभेत सादर झाले आहेत. १९७३–७४ ह्या वर्षी सर्व सरकारी उद्योगांचा एकूण निव्वळ नफा ६४·४२ कोटी रुपये झाला. एकूण १२२ सरकारी उद्योगसंस्थांनी ७३–७४ ह्या वर्षीची गुंतवणूक ६·२ कोटी केली असून मागील वर्षीच्या ५·५ कोटी गुंतवणुकीपेक्षा सुमारे २० टक्के बाढ, चालू वर्षी झाली असे दिसते. ७२–७३ ह्या मागील वर्षी सरकारी उद्योगांचा निव्वळ नफा फक्त १७·७४ कोटी होता. म्हणजेच ७३–७४ ह्या वर्षी नफ्यात खूपच वाढ झाली आहे. १९७१–७२ हे वर्ष विशेष स्मरणीय. कारण की त्याच वर्षात पहिल्यादा सरकारी उद्योगसंस्थांनी फायदा दाखविला. त्याआधी सातत्याने सरकारी उद्योगांना तोटाच येत होता. ७१–७२ पासून सरकारी उद्योगांचे नफ्याचे प्रमाण वाढते आहे असे दिसते. म्हणजेच त्यांनी केलेल्या कामगिरीत आता सुधारणा होत आहे असे ढोबळ अनुमान करता येईल. विक्रीची उलाढालही उद्योगांच्या संख्येत वाढ झाल्याकारणाने वाढली आहे. ७२–७३ मध्ये ती ५२६२ कोटी रुपये होती. ७३–७४ मध्ये ती ६७७७ कोट रुपये इतकी झाली आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत सरकारी उद्योगांनी वेगवेगळ्या प्रकारे नियोजनखर्चाकरिता रु. ३१२० कोट उपलब्ध केले. ४५ उद्योग त्यांच्या यंत्रशक्तीचा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त उपयोग करीत आहेत. जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा विक्रम 'मिनरल्स व मेटल्स ट्रेनिंग कॉर्पोरेशन'ने केला आहे. त्यांचा नफा रु. २६·१६ कोटी आहे. इंडिअन ऑइल कॉर्पोरेशन व हेवी इलेक्ट्रिकल्स ह्यांचा क्रमांक त्यांच्या खालोखाल आहे. ऑइल व नॅचरल गॅस कमिशनच्या नफ्यात तिप्पट व भारत हेवी इलेक्ट्रिकल्सच्या दुप्पट वाढ झाली. मात्र बोकारो स्टीलच्या तोट्यात ५·४ कोटींवरून १२·४ कोटीपर्यंत वाढ झाली आहे.

## जमीनसुधारणा अंमलबजावणी

भारतातील १७ राज्यांनी जरी कमाल जमीनधारणा विधेयके संमत केली तरी न्यायालयीन निर्णयांमुळे विधेयकांची अंमलबजावणी करताना अडचणी उपस्थित झाल्या आहेत. जमीनमालकांनी शासनाविरुद्ध दाखल केलेल्या फिर्यादींचा आकडा ३,३४,००० आहे. त्यांपैकी फक्त २६,००० फिर्यादींचा निकाल लागला आहे व त्यामुळे २,१६,००० एकर जमीन जमीनमालकांकडे जास्तीची आहे असे ठरविले गेले आहे. तेवढीच जमीन भूहीन लोकांकरिता उपलब्ध झाली. त्यांपैकी फक्त २०,००० एकर जमिनीचेच प्रत्यक्ष वाटप होऊ शकले आहे. आंध्रप्रदेशने हे विधेयक नुकतेच संमत केले. विविध राज्यांनी ठरविलेल्या जमीनधारणेच्या कमालमर्यादा येणेप्रमाणे : १. आंध्रप्रदेश : ५ व्यक्तींच्या कुटुंबाला १० ते १८ एकर दोन पिके येणारी बागायती जमीन नाही तर एक पीक येणारी १५ ते २७ एकर बागाईत जमीन, नाही तर ३५ ते ५४ एकर जिराईत (कोरडवाहू) जमीन. २. आसाम : एका व्यक्तीला ५० बिघे...फळबागांना सवलत. ३. बिहार : ५ व्यक्तींच्या कुटुंबाला १५ एकर बागाईत जमीन, २५ एकर बागाईत जमीन, फळबागा, डेअरी इ. करता. ४. गुजरात : १० ते १८ एकर बागाईत नाही तर २० ते ५४ एकर जिराईत. ५. हरियाणा : बागाईत ७·२ हेक्टर ते १०·९ हेक्टर एका पिकाकरिता. कुटुंबातील प्रत्येक जास्तीच्या व्यक्तीकरिता सिलिंगच्या १/५ जमीन वेगळी मिळेल. ६. हिमाचल प्रदेश : १५ एकर बागाईत निश्चित उत्पन्न देणारी जमीन. ७. कर्नाटक : १०–१३ एकर, ८. काश्मीर : ९·१ ते १६·८एकर बागाईत, ९. केरळ : एका व्यक्तीस ६ ते ७॥ एकर, कुटुंबास १२ ते १५ एकर, १०. मध्यप्रदेश : १० ते ३० एकर. ११. ओरिसा : १० एकर बागाईत, १२. पंजाब : ५ व्यक्तींच्या कुटुंबास ७ हेक्टर दुबार पीक देणारी जमीन व ११ हेक्टर एकवार पीक देणारी जमीन, १३. राजस्तान : १८ एकर बागाईत, १४. तामिळनाडू : १५ एकर, १५. त्रिपुरा : ४ ते १२ हेक्टर, १६. उत्तर प्रदेश : ७ हेक्टर बागाईत, १७. पश्चिम बंगाल : २·५ प्रमाणित एकर प्रत्येक कुटुंबाला, १८. महाराष्ट्र : १० ते १५ एकर बागाईत...जिराईत २० ते ५४ ऊसमळे, फळबागा, दुग्धव्यवसाय इत्यादींकरता सवलती. महाराष्ट्राने जमीनधारणेच्या कमालमर्यादा निश्चित करण्यात कुळकायद्याप्रमाणेच पुढाकार घेतला आहे.


**अर्थ मासिकाची वर्गणी**

**संपादक 'अर्थ'**

९०६, शिवाजीनगर, पुणे ४ ह्या पत्त्यावर चेक वा मनीऑर्डरने पाठवावी.

# शेतमालाच्या किंमती

## बांधून देण्याच्या प्रश्नाची चिकित्सा ( उत्तरार्ध )

डॉ. नीळकंठ रथ

अनुवादक – मंगेश पदकी

लेखाच्या उत्तरार्धात डॉ. रथ ह्यांनी शेतमालाच्या किमती निर्धारित करण्यातील वेगवेगळ्या तित्त्वक निकषांची पाहणी करून त्यातील एखादे तत्त्व स्वीकारल्यास त्यामुळे व्यावहारिक अडचणी कोणत्या उपस्थित होतील ह्याचे समग्र विश्लेषण दिले आहे. भारतासारख्या देशात किमती निश्चित करताना उपभोक्त्याची क्रयशक्ती, उत्पादनखर्च मजुरी व सर्व प्रमुख शेतीमालाच्या किमतीची सुसंबद्धता व शेतकऱ्यांचा निर्वाहखर्च ह्यामध्ये सुसूत्र सांगड कशी बसवता येईल ह्याची सविस्तर चर्चा ह्या लेखात झाली आहे.

गेल्या ३० वर्षांच्या दरम्यान जवळजवळ अखंडपणे भारत सरकारने महत्त्वाच्या शेतीमालाच्या आणि मुख्यत: तांदूळ, गहू, ज्वारी आणि बाजरी यांसारख्या अन्नधान्याच्या किमती बांधून दिल्या आहेत. बऱ्याच वेळा यातील बहुतेक पिकांच्या दोन प्रकारच्या किमती घोषित केल्या आहेत. त्यातली पहिली किमान-भाव किंवा आधारकिमत या वेगळ्या नावांनी ओळखली जाते; तर दुसरीला सरकारी सतत खरेदी किंमत म्हणतात. प्रत्यक्ष कार्यवाहीत ही दुसरी किंमतच चालू होती; पहिल्या प्रकारची किंमत लागू होण्याचे प्रसंग मात्र गेल्या २५ वर्षांत एकदोनदाच उद्भवले. या किमतीचा थोडक्यात विचार आधी करू.

प्रथमत: शेतीमाल विक्रीला आल्यावर त्याला किमान एवढी किंमत मिळेल असे पेरणीआधी शेतकऱ्याला आश्वासन व खात्री देण्यासाठी किमान किंवा आधार-किमत ठरवली होती. यासाठीच त्या किंमतीची घोषणा पिकाच्या हंगामाच्या सुरुवातीला केली जाते. नेमकी हीच किंमत का ठरविली जाते त्यासंबंधीचे तपशील प्रसिद्ध होत नाहीत. ही किंमत ठरवताना गत वर्षांच्या किंमती विचारात घेतल्या जातात एवढेच सांगितले जाते. वस्तुस्थिती पाहाता या सर्व काळात खुल्या बाजारातील किमत नेहमी किमान किमतीपेक्षा खूपच जास्त होती. १९५६ सालापासून बिगर शेतीमालासह शेतीमालाच्या किमती सतत वाढत असल्यामुळे याचे आश्चर्य वाटायला नको. या कारणामुळे, बाजारातील किमती धरल्या म्हणून उत्पादकांना सरकारकडे किमान किमतीला आपला शेतीमाल विकण्यासाठी जाण्याचा प्रश्न कधीच उद्भवला नाही.

अशी परिस्थिती १९५४–५५ साली एकदाच निर्माण झाली होती. या दोन वर्षी अतिशय चांगला पाऊस झाल्यामुळे सर्व देशभर पीकउत्पादन उत्तम झालं होतं. शिवाय, कोरियातील युद्धसमाप्तीनंतर जगभरातील शेतीमालाच्या किंमती तीव्रपणे घसरल्या होत्या. या दोन गोष्टींमुळे अन्नधान्याच्या किंमती एकदम उतरल्या. दीड वर्षाच्या काळात गहू, ज्वारी आणि बाजरी यांच्या किमती ३० ते ३५ टक्क्यांनी खाली आल्या; हरभरा आणि डाळी यांच्या किमती ५० टक्क्यांनी उतरल्या. या गोष्टीचा फायदा घेऊन अन्नधान्याचं निर्नियंत्रण केलं आणि प्रत्येकाची किमान किंमत तेवढी घोषित केली. तथापी, या घोषित किंमती इतक्या कमी होत्या की प्रमुख अन्नधान्यांच्या भावात ३० टक्के घट होऊनही किंमतीची पातळी सरकारी किमान-किमतीला स्पर्श करू शकली नाही.

त्यानंतरच्या २० वर्षांत, फक्त एकदाच, १९६९–७० साली गव्हाच्या किमतीत म्हणण्याजोगीघट झाली होती. त्या वर्षी अफाट पीक आल्यामुळे हापूर आणि उत्तर भारतातील अन्य मोठ्या बाजारात (मंडीत) गव्हाची किमत सरकारी खरेदी किमतीपेक्षा खाली उतरली. असे असूनही ती किमान–किमतीएवढी घसरली नव्हती. सरकारी खरेदीच्या किमतीत विकायला तयार असलेल्या शेतकऱ्यांचे सर्व धान्य

खरेदी करण्याचा रास्त निर्णय त्या वेळी सरकारनं घेतला. गव्हाच्या किमतीच्या घसरणीला ताबडतोब खीळ बसली, उत्पादकांना सरकारी खरेदी किमत मिळाली. सरकारनं साहजिकच खुल्या बाजारांतून गव्हाची प्रचंड खरेदी केली. सरकारी खरेदी किमतच किमान वा आधार-किमत बनली.

या अनुभवातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली म्हणजे चलनवाढ होत असलेल्या अर्थव्यवस्थेत किमान किंवा आधार-किमतीला फारसा अर्थ उरत नाही; दुसरं म्हणजे ज्या भावानं खुल्या बाजारात उत्पादकाकडून निदान काही माल घ्यायची सरकारची तयारी आहे ती सरकारी खरेदीची किमत अस्तित्वात असताना त्यापेक्षा कमी अशी किमान किंवा आधार-किमत पुन्हा बांधून देणं निरर्थक ठरतं. खरं म्हणजे अलीकडे शेतीमाल भाव-आयोग हेच म्हणू लागला आहे.

सरकारी खरेदी-किमत हीच वास्तवातली किमत हे ओघाने आलेच. १९६५ पर्यंत अनेक राज्यसरकारांशी विचार-विनिमय करून भारत सरकारचं अन्न आणि शेतकी मंत्रालय ही किमत ठरवीत होते. १९६५ साली विविध शेतीमालाच्या खरेदी किमतीची शिफारस केंद्र सरकारला करण्यासाठी शेती भाव आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्यांचे मुख्य मंत्री आणि केंद्रीय अन्न आणि शेतकी मंत्री यांच्या बैठकीत या शिफारशीवर चर्चा होते आणि तेथेच या किमतींचा अंतिम निर्णय घेण्यात येतो.

सरकारी खरेदी-किमत नक्की कशा प्रकारे ठरविली जाते, त्याबाबत त्यांचा एखादा फॉर्म्युला वगैरे आहे काय याबाबत पूर्वी केंद्रीय मंत्रालयानं किंवा आता शेतमाल भावआयोगानं जनतेपुढे स्पष्ट प्रकटन केलेलं नाही. खरं म्हणजे प्रत्यक्षात शेतमाल भावआयोगाला सदर किमतींची शिफारस करण्यासाठी अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. पिकाच्या सर्वसाधारण उत्पादनखर्चातील संभाव्य बदल, या किंवा इतर अन्न-धान्याचं संभाव्य उत्पादन, खुल्या बाजारातील गतकालीन किंवा येत्या वर्षाच्या किमतीचा रोख, सार्वजनिक वाटपव्यवस्थेच्या गरजांचा अंदाज, अन्नधान्याच्या आयातीची शक्याशक्यता, अनुदानातील बदलामुळे किंवा शहरी कामगार वा मध्यम-वर्गाच्या राहणीमानाच्या खर्चातील बदलामुळे सरकारी खरेदी किमतीत घडणाऱ्या बदलाचा सरकारी अर्थसंकल्पावर होणारा संभाव्य परिणाम वगैरे गोष्टी होत. या सर्व गोष्टीचा एका फॉर्म्युलात समावेश करणे कठीण असते आणि शेवटी ही गोष्ट राजकीय पातळीवर ठरवावी लागते. कारण शिलकी राज्ये जास्त खरेदी किमतीची मागणी करतात तर तुटीच्या राज्यांना कमी किमत हवी असते. केन्द्र सरकारनं ठरवलेली खरेदी किमत म्हणजे अनेक आर्थिक आणि राजकीय गोष्टी विचारात घेऊन अंतिमतः घेतलेला राजकीय निर्णय असतो.

असे असतानाही सार्वजनिक चर्चेत किमत ठरविताना पिकाच्या उत्पादनखर्चावरच अनेकदा जवळजवळ निर्णायक भर दिला जातो. एखाद्या मालाच्या, विशेषतः सरकारने ठरविलेल्या किमतीत किमानपणे त्याच्या उत्पादनखर्चाचा अंतर्भाव व्हावा असे प्रतिपादन केले जाते. वास्तविक वेगानं चलनवाढ होत असलेल्या अर्थव्यवस्थेत उत्पादन-खर्चावर आधारलेली किमत उत्पादक शेतकऱ्यांना अगदीच असमाधान-कारक वाटेल. कारण शेतीमाल बाजारात येईपर्यंत सर्व-साधारण मागणी इतकी वाढलेली असेल की खुल्या बाजा-रातील भाव काही महिने अगोदर झालेल्या उत्पादनखर्चा-पेक्षा खूपच वाढलेले असणार.

शिवाय, अशी परिस्थिती नसली आणि किमत उत्पादन-खर्चावर ठरवायची असा एखाद्याचा आग्रह असला तर प्रश्न उभा राहतो तो हा की उत्पादनखर्च कुणाचा? कारण एखाद्या परिसरातील किंवा एखाद्या खेड्यातील देखील एखादे पीक घेणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा दर टनी किंवा प्रति किलो-मागे (एकच) ठरलेला उत्पादनखर्च नसतो. (एखाद्या पिकाचा सर्वसाधारण उत्पादनखर्च सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीत समान असतो असा, विशेषतः शहरी लोकांत, सर्वसामान्य गैरसमज असतो.) यात आश्चर्यकारक काही नाही. कारण एकाच पिकाखालील शेताशेतांतील जमिनीचा मगदूर वेगवेगळा असतो; खेड्याखेड्याचं नसलं तरी तालुक्या-तालुक्याचं पर्जन्यमान वेगळं असतं; सर्व शेतकरी बियाणं किंवा खतांचा उपयोग किंवा मेहनत सारख्याच प्रमाणात करीत नसतात आणि शेवटी सांगायचं म्हणजे प्रत्येक शेतकरी आपल्या कामात सारखाच तरबेजही नसतो. गेल्या २० वर्षांत भारत सरकारच्या निर्देशनाखाली गोळा करण्यात आलेल्या उत्पादन-खर्चाच्या आकडेवारीवरून शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च किती वेगळा असतो ते दाखविता येते. भारतातील निर-निराळ्या जिल्ह्यांतली आणि निरनिराळ्या पिकांची ही सर्व माहिती, एखाद्या जिल्ह्यातील (किंवा दोन चार तालुक्यांतील) १५० शेतकऱ्यांच्या नमुन्यांत सर्वांत महागड्या उत्पादकाचा दर टनी उत्पादनखर्च सर्वात कमी उत्पादनखर्चाच्या ५ ते ६ पट जास्त असल्याचं दाखवते. हे उत्पादक (अपवादरूप) आहेत असाही याचा अर्थ नव्हे; सर्व उत्पादक उत्पादन-खर्चाच्या या दोन सीमांतच विखुरलेले आहेत. एखाद्या तालु-क्यांत एखाद्या पिकाचा कमीत कमी उत्पादनखर्च ५ रुपये

आणि जास्तीत जास्त २५ रुपये आढळला तर बहुतेक शेतकऱ्यांचा खर्च या दोन टोकांमध्येच कुठेही असू शकणारा होता.

एकाच पिकाच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या उत्पादनखर्चाचा हा प्रकार असल्याने किमती ठरविण्यासाठी कुणाचा ( किंवा कोणत्या उत्पादनपातळीचा ) खर्च विचारात घ्यावा हा प्रश्न निर्माण होतो. सरकार किंवा शेतीभाव आयोग सर्व उत्पादकांचा सरासरी खर्च विचारांत घेतात; परन्तु शेतकऱ्यांच्या दृष्टीने या सरासरीचा एक तोटा आहे. ही सरासरी कमी आणि जास्त खर्चाची सरासरी असल्यानं, या सरासरी उत्पादनखर्चाच्या पातळीवर किमत ठरविण्यास अंदाजे निम्म्या शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनखर्चाएवढी किंवा जास्त किमत मिळेल तर उरलेल्या निम्म्या शेतकऱ्यांना या ठरविलेल्या किमतीत आपला उत्पादनखर्च पूर्णपणे बसत नसल्याचं आढळून येईल. आणि एतदर्थ, त्यांना ती किमत न्याय्य वाटणार नाही.

सर्व शेतकऱ्यांचा नसला तरी बहुतांश शेतकऱ्यांच्या ( किंवा शेतमालाच्या ) उत्पादनखर्चाचा समावेश होईल. अशा प्रकारे ही किमत ठरविली जावी अशी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची मागणी असते. म्हणून एकूण उत्पादनाच्या ८५ टक्के शेतमालाच्या उत्पादन-खर्चाचा अंतर्भाव होईल अशी किमत असावी असे ते म्हणतात. १९२० च्या दशकात अमेरिकेत अशा प्रकारच्या प्रस्तावावर गरमागरम चर्चा घडली होती. आता तिथे याबाबतीत कोणी बोलत नाही. मात्र आमच्या देशात ते चलनी नाणं झालेलं दिसतं. दोन वर्षांपूर्वी एका प्रगत व उत्साही शेतकऱ्यांच्या एका संघटनेनं, फार्मर्स क्लब ऑफ इंडियानं' शेती भाव आयोगापुढे अगदी हाच दावा मांडला होता.

आता या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होतात. पहिली गोष्ट म्हणजे शेतमाल भाव आयोग आणि सरकार यांनी ठरवलेली ही किमत बाजारात येणाऱ्या एकूण शेतीमालांतील जो काही भाग सरकार विकत घेणार असते त्यासाठी असते. बाकीचा खुल्या बाजारी जो काय भाव मिळणार असेल त्या भावाने विकली जायची असते. सरकारी खरेदी किमत हीच बाजारातली एकमेव किमत असावी असा दंडकही नसतो. अशा परिस्थितीत, ८५ टक्के शेतकऱ्यांच्या ( किंवा शेतीमालाच्या ) उत्पादन-खर्चाचा समावेश होईल अशीच किमत सरकारनं का ठरवावी ?

परंतु शेतकऱ्यांच्या गटाची सूचना अशी दिसते की बाजारातील सर्व खरेदी-विक्रीचे व्यवहार होऊ शकतील अशीच किमत सरकारनं ठरवावी आणि त्या किमतीला बाजारात विक्रीसाठी येईल त्या सर्व मालाची खरेदी करावी. सरकारनं तसं करायचं ठरवलं तरी या किमतीत ८५ टक्के शेतमालाच्या उत्पादनखर्चाचा समावेश का असावा हा प्रश्न राहतोच. ७५ किंवा ९५ टक्के का नको? काही तरी ठरवायचे म्हणून ठरविले जाते. त्यामागे काही खास तत्त्व असे नाही,

परंतु, वर पाहिल्याप्रमाणे, विशेष महत्त्वाची गोष्ट ही की एकाच पिकाचा उत्पादनखर्च परिसराप्रमाणे बदलत असतो. ८५ टक्क्यांचा खर्चही तसाच बदलतो. म्हणजे त्याच पिकासाठी वेगवेगळ्या परिसरात (किंवा एखाद्याला वाटल्यास राज्यात, खेड्यात देखील) वेगवेगळी किमत ठरवावी लागेल. खुल्या बाजारातले भावही परिसराप्रमाणे बदलत असतात, तेव्हा खरी अडचण ती नव्हे. मुद्दा असा की दोन ठिकाणच्या भावांतील फरक शेतमाल एका ठिकाणाहून दुसरीकडे नेण्याच्या खर्चाइतका असायला हवा. एका ठिकाणची किमत या वाहतुकीच्या खर्चाहून जास्त असेल तर कमी भावाच्या ठिकाणचा सर्व शेतीमाल विक्रीसाठी जास्त भावाच्या ठिकाणी जाईल. यामुळे बाजारात भलताच गोंधळ उडेल आणि सरकारला तो माल तो ज्या ठिकाणाहून आला त्या ठिकाणी नेण्यासाठी मोठी तूट सहन करावी लागेल. आता प्रत्येक ठिकाणच्या ८५ टक्के शेतमालाच्या खर्चावर ठरविलेल्या किमतीतला फरक इतर ठिकाणच्या माल नेण्याच्या वाहतूकखर्चापेक्षा मुळीच कमी किंवा जास्त राहाणार नाही याची हमी कोण देऊ शकेल ? खरे पाहता, भारतातील दोन वेगवेगळ्या ठिकाणच्या उत्पादनखर्चाच्या आकडेवारीचे गणितं करून पाहिल्यावर किमत.तला हा फरक त्या ठिकाणांमधील वाहतूकखर्चापेक्षा कधी बराच जास्त आणि कधी कमीही असल्याचं आढळून येतं. कसंही असलं तरी खाजगी व्यापाऱ्यांनी एका ठिकाणाहून नेलेलं धान्य पुन्हा त्या ठिकाणी नेण्यासाठी सरकारला फार मोठा खर्च करावा लागेल. या साऱ्या प्रकारांतील बेहिशेबीपणा कुणाच्याही लक्षात येण्यासारखा आहे.

परंतु एवढ्यावरच हे संपत नाही. नेहमीच्या परिस्थितीत बाजारातील कुठल्याही शेतीमालाचे सर्वसाधारण खुल्या भावात ८५ टक्के शेतमालाच्या काटेकोर खर्चाचा समावेश बहुधा नसतोच. आता अन्नधान्यासारख्या काही वस्तूंच्या किमती ठरवायच्या झाल्या तर त्यांच्या किमती इतर शेतीमालांच्या किमतीपेक्षा खूपच जास्त राहतील आणि उत्पादक शक्यतेनुसार त्यांच्या जमिनी आणि इतर साधनसामग्री त्या पिकांऐवजी क्रमाक्रमानं अन्नधान्याखाली आणतील. अन्नधान्याचं उत्पादन निश्चितच वाढेल; परंतु इतर पिकांचं उत्पादन घटेल आणि त्यामुळे नवेच प्रश्न निर्माण होतील.

आणि शेवटी असा प्रश्न राहातो की अन्नधान्याच्या या वाढलेल्या भावात संपूर्ण उत्पादन खरेदी तरी कोण करील ? आज तर, रेशनचे भाव कमी असतानाही अनेकांना अनेकदा उपाशी राहावं लागतं. किमती आणखी वाढवल्या तर सरकारी गुदामात अन्नधान्य असताना देखील इतर अनेकांवर तो प्रसंग येईल. लोकांना अधिक घेण्याची गरज नाही म्हणून नव्हे तर केवळ त्यांना परवडत नाही म्हणून असे होईल. शेतकऱ्यांना वाढीव भाव दिले तरच ते देशात समृद्धीचं सोनं पिकवू शकतील असं म्हणणारे काही शेकडो प्रतिनिधी नेमकी ही बाजू विसरतात. वास्तविक, आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे अमेरिकेत नेमकं हेच केलं जातं; परंतु त्या आणि या देशात एक अतिशय सरळ फरक आहे. तो देश इतका श्रीमंत आहे की अन्नधान्याच्या किमतीच्या

तिथल्या सर्वसामान्य माणसाला वाढीची झळ फारशी लागत नाही आणि शेतमालातील थोडयाशा भाववाढीचा हा बोजा तिथल्या ९० टक्क्यांहून अधिक लोकसंख्येवर विभागला जातो. कारण त्यांच्या देशात फक्त ७ टक्के लोकच शेतीवर तर ९३ टक्के बिगरशेती उद्योगावर अवलंबून आहेत. आपल्या देशात या उलट परिस्थिती आहे. ७० टक्के शेतीत आणि ३० टक्के बिगरशेतीत आहेत. ज्यामध्ये बहुतांश लोक अगदीच गरीब आहेत असे ३० टक्के (लोक) ७० टक्क्यांच्या उत्पन्नवाढीस काय हातभार लावू शकणार ?

आणि अखेरीस गोष्ट राहाते ती ही की विशिष्ट वर्षातील एखाद्या पिकाचा उत्पादनखर्च काढण्यास खूपच वेळ लागतो. खर्च सबंध हंगामभर केले जातात आणि उत्पादन मात्र काढणी-मळणी झाल्यावरच कळते. शेतकऱ्यांच्या वेगवेगळया प्रदेशांतील प्रातिनिधिक नमुन्याच्या प्रत्यक्ष दर टनी खर्चाचा हिशेब मांडायला काढणीमळणीनंतर काही काळ लागणे अनिवार्यच असते. शेतकऱ्यानं आपल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी तोपर्यंत वाट पाहावी काय ?

म्हणजे थोडक्यात दर टनेज फार्मर्स क्लबनं पुरस्कारिलेली ही पद्धत 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' या प्रकारची आहे. ही पद्धती शर्यतीतल्या लंगडया घोडयासारखी आहे. अमेरिका किंवा इतर विकसित (प्रगत) देश याबाबत एक ब्रही काढत नाहीत ते उगाच नव्हे. परंतु इतर बहुतेक क्षेत्राप्रमाणे यातही उशिरा आलेले आपल्यापैकी काहीजण दुसऱ्या कोणत्याही देशानं न अंगीकारिलेलं हे बहिष्कृत 'तंत्र' धरून बसलेले दिसतात.

मग असा प्रश्न विचारला जाईल की त्या देशात शेतीमालाच्या किमती कशा ठरवितात ? ते उत्पादनखर्च विचारात घेत नाहीत का ? याचं उत्तर असं आहे की, होय, घेतात; परंतु शेतीप्रतिनिधींनी पुरस्कारिलेल्या पद्धतीने नव्हे. आपण अमेरिकेचे उदाहरण घेऊ. सुरुवातीला तिथे १९१० ते १९१४ या चार वर्षांतील इतर भावाबरोबर शेतीमालाच्या सरासरी किंमती शेतकऱ्यांच्या दृष्टीनं सर्वोत्तम होत्या. यावर शेतकऱ्यांचं व इतर सर्वांचं एकमत झालं. त्या सरासरी उत्पादनखर्चाएवढया किंवा एकूण ८५ टक्के उत्पादनाच्या खर्चाएवढया आहेत का ते शोधून काढण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. त्यात काहीच तथ्य नाही. आता येथून सुरुवात करून चालू सालापर्यंत प्रत्येक शेतीउत्पादनखर्चात किती वाढ झाली ते पाहतात. यासाठी शेतीस लागणाऱ्या मालाच्या किंमतीत झालेले बदल आणि त्यांचे सरासरी शेतीखर्चातील प्रमाण ते विचारात घेतात. तसेच १९१०-१४ च्या तुलनेनं शेतकऱ्याच्या कौटुंबिक निर्वाहखर्चातील वाढही ते जमेस धरतात. १९१०-१४ आणि चालू साल या दरम्यान उत्पादनखर्च आणि कुटुंबनिर्वाह समजा ५ पटीनी वाढले असल्यास, शेतीमालाच्या किंमतीही १९१०-१४ च्या किंमतीच्या पाच पटीनं असायला पाहिजेत असं सरकार म्हणतं आणि त्या वर्षी सरकार शेतकऱ्याला त्या किंमतीची हमी देतं म्हणजेच त्या किंमतीला विकत घेण्यास कोणीही तयार नसल्यास सरकार ते घेईल. अशा हिशेबातील उत्पादनखर्चाच्या आकडेवारीच्या आणि आपल्या शेतकऱ्यांच्या गटांनी सुचविलेल्या आयोगातील फरक सहज कळण्याजोगा आहे. अमेरिकेत उत्पादनखर्चाच्या आकडेवारीचा उपयोग दरम्यानच्या काळात सरासरी शेतीखर्चाच्या बदलाच्या टक्केवारीचा अंदाज करण्यासाठी करतात. परिणामी तथाकथित 'सुवर्णयुगां'तील शेतकऱ्यांना मिळालेल्या आणि द्याव्या लागणाऱ्या किंमतीच्या तौलनिक परिस्थितीत बदल होत नाही. त्याच्या आधारावर किंमती ठरविण्यासाठी दर वर्षाचा उत्पादनखर्च काढण्यासाठी त्या आकडेवारीचा उपयोग केला जात नाही.

आपल्या देशात सरकारी खरेदीच्या किंमती ठरविताना ज्या अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतात त्यातली ही एक बाब होय; परन्तु देशांतील सर्व प्रमुख पिकांच्या प्रदेशांतील पूर्वीच्या वर्षांतील उत्पादन–खर्चाची एकसारखी आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे ते नेहमीच शक्य होते असे नाही. शिवाय आपले 'सुवर्ण–वर्ष कोणते ? इतर किंमतीपेक्षा शेतीमालाच्या किंमती ज्यात अधिक वेगानं दौडतात त्या प्रकारच्या चलनवाढीच्या अर्थव्यवस्थेत जोराने वाढणाऱ्या चलनवृद्धीच्या अर्थव्यवस्थेत असा शोध घेणे आवश्यकही आणि त्यांत तथ्यही नाही.

वास्तविक, १९५२–५३ नंतरच्या २१ वर्षांत (म्हणजे १९७३–७४ पर्यंत) शेतीमालाच्या एकूण किंमती ३·४ पटीनं वाढल्या तर औद्योगिक मालाच्या किंमती २·६ पटीनं. १९६०-६१ च्या परिस्थितीच्या संदर्भात आपण या वाढीची तुलना केल्यास आपल्याला शेतीमालाच्या किंमतीतही वाढ झालेली आढळेल. १९५२–५३ किंवा १९६०–६१ च्या परिस्थितीशी तुलना करता एकूण शेतीमालाच्या किंमती तौलनिकदृष्टया शेतकऱ्यांच्या जास्त फायदाकारक होत्या त्याचा हा एक प्रकारचा निर्वाळा होय. अमेरिकेत करतात त्याप्रमाणे, या दोन्हींपैकी कुठलेही वर्ष मूळ धरून सरकारनं, शेतीमालाच्या सर्व किंमतीचा अंदाज केल्यास खुल्या बाजारातील प्रत्यक्ष किंमतीपेक्षा शेतीमालाच्या सरकारने अशा प्रकारे ठरविलेल्या किंमती कमी असल्याचे आढळले असते.

आता सर्व शेतीउत्पादनाच्या बाबतीत हे खरं नव्हे. याला एकमेव अपवाद म्हणजे गहू; त्याच्या किंमती इतर सर्व शेतीमालाच्या किंमतीएवढया वाढल्या नाहीत. खरे म्हणजे १९५२–५३ च्या पातळीशी तुलना केल्यास त्याच्या किंमतीत औद्योगिक वस्तूंच्या किंमतीपेक्षापेही कमी वाढ झाली. मात्र १९६०–६१ शी तुलना केल्यास गव्हाचा भाव औद्योगिक वस्तूंच्या किंमतीपेक्षा थोडासा वाढला. गव्हाच्या भावातील हे चढउतार अंशतः गेल्या ८ वर्षांत गव्हाच्या उत्पादनतंत्रात घडून आलेल्या क्रांतीमुळे तसेच गव्हाच्या तौलनिक उत्पादन–खर्चात तीव्र घसरण झाल्यामुळे आणि अंशतः सरकारी धोरणामुळेच झाले. गेल्या २० हून अधिक वर्षी परदेशांहून गहू आयात करून (दीर्घकाळ अमेरिकेहून पी.

एम्. ४८० खाली अतिशय स्वस्त भावांत आणि आता जास्त दरानं) तो अगदी कमी भावात विकण्याचे सरकारी धोरण होते. शिवाय गव्हाच्या विभागीय हालचालींवर घातलेल्या निर्बंधांची एरवी वाढले असते त्याहून त्याचे भाव खाली ठेवण्यास मदतच झाली आणि या सान्याचा फायदा सरकारी खरेदी किमतीनं पटकावला. आता अमेरिका आणि इतर विकसित देशांचे काहीही धोरण असले तरी, भारतातील गरीब उपभोगकत्याला गव्हाच्या उत्पादनातील तांत्रिक क्रांतीच्या लाभापासून वंचित करणे योग्य नव्हे. हे मान्य झाल्यावर, १९५२–५३ किंवा १९६०–६१ मधील पातळीशी समानता ठेवायची असल्यास सरकारी खरेदीभावात आणखी वाढ करण्याची कितपत शक्यता आहे ते तपासून पाहाणे जरुरीचे आहे. इतर सर्व शेतीमालाच्या बाबतीत ही शक्यता नाही.

उत्पादनखर्चावर आधारित अशा किंमती ठरविण्यातल्या अडचणींच्या आणि त्यांतील शक्याशक्यतेच्या या खुलाश्याने शेतकऱ्यांचे समाधान मात्र होत नाही. उलट ते विचारतात: उद्योगपती तर त्यांच्या उत्पादनावर त्यांच्या किमती छापतात. त्यांचा उत्पादनखर्च आणि नफ्याचा हिशेब यांच्या आधारावर हे केलं जातं. शेतकऱ्यांच्या बाबतीत ही विचारसरणी का नसावी? औद्योगिक वस्तूंच्या किमती ठरविण्याचा प्रश्न फार गुंतागुंतीचा असतो. इथे त्यात शिरणे शक्य नाही. परन्तु वरील विचारसरणीतील एक मूलभूत दोष दाखवणे इथे आवश्यक आहे. उद्योगपती कारखानदार आपल्या वस्तूंवर त्यांच्या किमती खुशाल छापू शकतो; परन्तु उपभोक्त्यांनी ती घ्यावीच असे बंधन तो आणू शकत नाही. त्यांनी ती विकत घेतलीच नाही तर त्यांचा साठा पडून राहील; मग तो किमती कमी तरी करील किंवा उत्पादनच बंद पडेल. याउलट सरकारनं शेतीउत्पादनाच्या किमती छापाव्यात असे शेतकरी म्हणतो तेव्हा तो माल उपभोक्त्यांनी घेतला नाही आणि त्या किमतीला बाजारात तो खपला नाही तर तो सरकारने उचलावा असा आग्रह धरतो. या दोन्ही प्रकारच्या किमती बांधून देण्यात हाच मोठा फरक आहे. तसंच प्रत्येक कारखानदार किमतीची चिठ्ठी चिकटविण्याआधी आपल्या नफ्याच्या टक्क्यांचा हिशेब करतो असं म्हणणंही खरं नाही. पुष्कळांना मोठ्या कारखानदारांच्या भावांचेच अनुकरण करावे लागते आणि साहजिकपणेच फरक जरी असला तरी शेतीधंद्याप्रमाणेच सर्वांचा उत्पादनखर्च सारखाच असतो असे नाही. त्यामुळे महागड्या उत्पादकाचा नफ्याचा लभ्यांश कमी असतो. हे झाले औद्योगिक उत्पादनाच्या भावाच्या बाबतीत.

काही वेळा असेही प्रतिपादन केलं जातं की आपल्या देशात शेतीउत्पादन हे शेतकऱ्याच्या उत्पन्नाचं एकमेव साधन असल्याकारणानं त्याला निदान किमान जीवनमानाची पातळी प्राप्त होण्यापुरती किंमत तरी मिळायला हवी. दोन वर्षांपूर्वी कापसाच्या वाढीव किमतीबाबत महाराष्ट्रात जी मोठी खळबळ उडाली तेव्हा काही जणांनी हा युक्तिवाद केला होता. पाच एकरांच्या कापूसशेतकऱ्याला एक क्विंटल कापसाचा समजा पाचशे रुपये भाव ठरविल्याशिवाय साधारणतः किमान म्हणण्याजोगं जीवनमान प्राप्त होणंही अशक्य आहे. म्हणून कापसाचा भाव तेवढाच असावा असा दावा मांडला गेला.

किमान कौटुंबिक जीवनमानाची हमी देणाऱ्या उत्पन्नाचा आग्रह बाळगणाऱ्यांच्या हेतूबद्दल कोणीही शंका घेऊ शकणार नाही. तेव्हा क्षणभर आपण ही विचार सरणी मान्य करू आणि ती कापसाव्यतिरिक्त अन्य उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना लागू करू. मग आपणही ५ एकर ज्वारीच्या शेतकऱ्याला कुटुंबपोषणासाठी किमान उत्पन्न मिळेल असे ज्वारीचे भाव असावेत असे म्हणू शकतो. याचाच अर्थ ज्वारीची किंमत आज आहे त्यापेक्षा वाढवावी लागेल. परंतु त्यामुळे कापूसउत्पादकांच्या वास्तविक उत्पन्नावर तावडतोब परिणाम होईल. कारण त्याच्या किमान उत्पन्नाचा हिशेब ज्वारीच्या चालू भावावर केला गेला होता. म्हणजे कापसाचे भाव वाढवायला हवेत आणि त्यामागोमाग ज्वारीचे भावही. कारण कापडाचे भाव वाढतील आणि ज्वारी घेणाऱ्या शेतकऱ्याला कापडाचीही गरज आहे. आपलेच शेपूट पकडू पाहाणाऱ्या कुत्र्याचाच हा प्रकार!

असेच पुढे म्हणजे ही विचारसरणी भूमिहीन मजुरालाही लागू करावी. त्यालाही किमान जीवनमान आणि म्हणून त्यासाठी योग्य अशी मजुरी मिळायला नको का? खरं म्हणजे तेथेच सुरुवात व्हायला हवी. त्यावर खुल्या बाजारातील शेतमालाच्या किमती निश्चित होतील आणि मग ज्या शेतकऱ्यांना शेतीपासून मजुरीचं किमान उत्पन्न मिळविता येत नाही त्यांनी शेती सोडून मजुरांच्या रांगेत भरती होणेच योग्य होईल. थोडक्यात म्हणजे तात्त्विकदृष्ट्या ही विचारसरणी योग्यच; मात्र तिची सुरुवात मजुरीपासून झाली पाहिजे. इतरांनी मागणीनुसार जुळवून घ्यावे. त्यासाठी खरी आवश्यकता शेतीमालाच्या किमान किमतीची नसून शेतमजुरीचे भाव निश्चित करण्याची आहे.

सरकारनं शेतीमालाचे भाव प्रत्यक्ष उत्पादनखर्चाच्या आधारावर ठरवावे किंवा शेतकऱ्यांना काही किमान उत्पन्नाची खात्री मिळावी अशी काही लोकांची जी मागणी आहे त्यात इतक्या अडचणी आणि विसंगती आहेत की त्यातून काहीच निष्पन्न होऊ शकत नाही ते आपल्या लक्षात येते. तुल्यतेवर आधारलेले भाव निश्चित करणे शक्य आहे आणि त्यांचा उपयोगही होऊ शकेल; परंतु चलनवाढीच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात त्यामुळे शेतकऱ्यांच्या हेतूंची पूर्ती होईलच असे नाही.

[पृष्ठ २५ वर]



# एक पुरुषार्थ-गाथा

## पारखे उद्योगसमूहाची ४५ वर्षे


**डॉ. श. द. कोपर्डेकर,** M. Com., Ph. D.
इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट, रिसर्च अँड डेव्हलपमेंट

भारतातील कागद-उद्योगात पारखे उद्योग-समूहाचे एक वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. गेल्या ४५ वर्षांत ह्या उद्योग-समूहाची जी बहुविध दिशेने प्रगती झाली त्याचे रहस्य उगवत्या उद्योजकांनी समजून घ्यावे ह्या दृष्टीने हा लेख देत आहोत. कल्पनाशक्ती, जिद्द, पराक्रम व श्रद्धा हे गुण या उद्योगाचे प्रवर्तक श्रीमान बाबुरावजी पारखे ह्यांच्यात एकवटले आहेत. 'अर्थ' मासिकाचे ते प्रथमपासून चहाते आहेत आणि नव्या 'अर्थ' ला त्यांचा आधार, उत्तेजन आणि मार्गदर्शन लाभले आहे.

### उद्योगाची प्रेरणा व संस्थापना

मातुःश्री ती. माईसाहेबांच्या प्रेरणेने श्री. बाबुरावजी पारखे यांनी उद्योगास सुरुवात केली. ते १५ वर्षांचे असतानाच वडिलांचे निधन झाले. कुटुंबाचा सारा भार ती. माईसाहेबांवर पडला; परंतु अत्यंत धीराने त्यांनी संसाराचा भार एकटचाने उचलला. त्यांनी मुलांच्या मनावर सुसंस्कार तर केलेच; परंतु '**परसेवेतील तूपसाखरेपेक्षा यत्नाची भाकरी अधिक भाग्याची**' हे त्यांनी मुलांच्या मनावर बिंबवले. श्री. बाबुरावजी मॅट्रिकच्या वर्गात असताना ती. माईसाहेबांनी कागदापासून पाकिटे बनविण्याचा गृहउद्योग सुरू केला. एक दाबप्रेस घेतला. त्यावर मुलांच्या साहाय्याने त्या पाकिटे बनवू लागल्या. हळूहळू स्क्रू-प्रेस, पंचिंग मशीन अशी उपकरणे घेतली. विक्रीचे काम पारखेसाहेब स्वतः पाहत असत. अनेक ठिकाणी त्यांनी दुकानात पाकिटे विक्रीसाठी ठेवली. हळूहळू विक्री वाढत गेली. ग्राहकांचा प्रतिसाद वाढत गेला तसा व्यवसाय वाढविण्याच्या योजना त्यांच्या मनात आकार घेऊ लागल्या. बी. ए. झाल्यावर मुंढव्याच्या डेक्कन पेपर मिलमध्ये काही काळ व्यवसायाचे ज्ञान घेण्यासाठी बाबुरावजींनी काम केले. त्याच वेळी जपानमध्ये कच्च्या मालाची निर्मिती होत नसताना तो देश धाडसाने जागतिक बाजारपेठेत उतरला, ह्याचे बाबुरावजींना विशेष नवल वाटले आणि **व्यवसायाच्या शिक्षणासाठी त्यांनी जपानला जाण्याचा निर्णय घेतला.** बाबासाहेब घोरपडयांची शिष्यवृत्ती मिळवून ते एक वर्ष जपानला राहिले. तेथील कागदव्यवसायाचा त्यांनी अभ्यास तर केलाच; त्याशिवाय, शिष्यवृत्तीतून काही पैसे वाचवून एक यंत्र खरेदी करून पुठ्ठा तयार करण्याच्या उद्योगाची कल्पना ठरवूनच ते भारतात परत आले.

पारतंत्र्याचा काळ होता. एतद्देशीय उद्योजकांना सरकारची मदत नव्हती व सहानुभूतीही नव्हती. नव्या उद्योगाची स्थापना करताना अनेकविध अडचणी पुढे उभ्या राहात होत्या; परंतु बाबुरावजींच्या मनात अनेक नव्या योजना तरळत होत्या. बाबुरावजींची दृष्टी अनेक नव्या क्षितिजांवर टक लावून होती. अंतर्मन अनेक नव्या वाटा धुंडाळण्यात गुंतले होते.



**पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि., खोपोली येथील कारखान्यात कागद तयार होत असताना**


## युद्ध आणि युद्धोत्तर काळातील प्रगतीचे टप्पे

जपानहून परत आल्यावर श्री. पारखे यांनी मुंबईला जागा घेतली व दिवसाला २ टन क्षमता असलेले पुठ्ठा तयार करण्याचे यंत्र बसविले. व्यवसायाचा व्याप वाढल्याने १९४२ साली भारत एन्व्हलप कं. चे पेपर अॅण्ड पल्प कन्व्हर्शन्स प्रा. लि. मध्ये रूपांतर झाले. हळूहळू व्यवसायवाढीच्या आणखी योजना साकार होऊ लागल्या. बाबुरावजींना अनेक मित्रांचे सहकार्य लाभले. डॉ. घ. ज. परांजपे यांनी व्यवसायाच्या जवळजवळ प्रारंभापासून फार मोलाची कामगिरी पार पाडण्यास प्रारंभ केला. आजही डॉ. परांजपे, बाबुरावजींना मोलाची मदत करीत आहेत. व्यवसायाच्या विस्ताराच्या चिंतेत सतत गढलेल्या बाबुरावजींना, **नंदादीपाप्रमाणे सौ. कमलाताईंनीही कशी साथ दिली असेल व अडचणीच्या प्रसंगात त्यांच्या मनातील उत्साह व उभारी टिकवून धरण्यासाठी कसे साहाय्य केले असेल**, याची इतरांना कल्पनाही करता येणार नाही. व्यवसायाच्या विकासाच्या दृष्टीने खोपोली या गावात सुमारे १०० एकर जमीन पेप्को मिल्सने खरेदी केली. रेल्वेतिकिटाला लागणारा बोर्ड, तसेच औद्योगिक वेष्टनासाठी लागणारे कागद व पुठ्ठ्याचे प्रकारही खोपोलीस होऊ लागले. त्या काळात खोपोली हे एक खेडे होते. त्या भागात 'पेप्को मिल्स' हा पहिलाच कारखाना होता; परंतु पेप्को मिल्स सुरू झाल्यावर अनेक छोटेमोठे कारखाने तेथे निघाले. आज तो भाग कारखान्यांनी गजबजून गेला आहे. व्यवसाय वाढविण्यासाठी जरूर असलेली यंत्र-सामुग्री आयात करणे परदेशी चलनाच्या टंचाईमुळे त्या काळात अवघड झाले होते. **त्यातून मार्ग काढण्यासाठी यंत्रे निर्माण करण्याचा विभाग पेप्को मिल्सने सुरू केला.** खोपोलीला यंत्रे बनवून ती पेप्को मिल्सने स्वतःच्या कारखान्यांत बसविली आणि उत्पादनक्षमता प्रतिदिनी २० टनांपर्यंत वाढविली.

## सेन्ट्रल पल्प मिल्सची स्थापना

त्या काळात कागद बनविण्यासाठी लागणारा लगदा परदेशांतून आयात केला जात होता. हा लगदा भारतातच बनवता येईल का ? पेप्को मिल्सला फक्त दररोज ५ टन लगद्याची गरज होती; परतु लगद्याची गिरणी आर्थिक दृष्ट्या किफायतशीर व्हावी यासाठी प्रतिदिनी ७५ टन उत्पादन होईल एवढी गिरणी उभारणे जरूर होते. पेप्को मिल्सच्या आवाक्याबाहेरची ही योजना आहे असे सकृतदर्शनी अनेक लोकांना वाटले असेल; परंतु पेप्को मिल्सने जिद्दीने ही योजना हाती घेतली. त्यासाठी अनेक मध्यम आकाराच्या कागदगिरण्यांचे साहाय्य घेतले. अमेरिकेतील आयात–निर्यात बँकेचे कर्ज मिळविले. इतरहि अनेक अडचणी उभ्या राहिल्या.

१९६६ मधील रुपयांच्या अवमूल्यनामुळे प्रकल्पाचा ऋणभार एका रात्रीनं २ कोटी रुपयानी वाढला. परंतु तरीही हा लगद्याचा कारखाना १९६८ साली सुरू झाला. वांबूच्या



**सोनगढ येथील सेंट्रल पल्प मिल्स (बांबूच्या लगद्याची गिरणी)**

**लगद्याचा जगातील हा पहिलाच कारखाना आहे.**

सेंट्रल पल्प मिल्स, लहान व मध्यम आकाराच्या कागदगिरण्यांसाठी लगदा बनविते. परंतु सरकारने परवाना दिलेल्या लहान कागदगिरण्यांपैकी सुमारे ८०/९०% गिरण्या सुरू होऊ शकल्या नाहीत. म्हणून सोनगडलाच लगद्याचे कागदात रूपांतर करणारी कागदगिरणी काढावी लागली. सध्या या कागदगिरणीत प्रतिदिनी **२० टन कागद बनतो.**

सेंट्रल पल्प मिल्सचे वर्क्स डायरेक्टर श्री. एन. एस. सदावर्ते यांचा कारखाना उभारण्यात फार मोठा वाटा आहे. आजही व्यवसायाच्या अनेक बाजू श्री. सदावर्ते समर्थपणे सांभाळत आहेत. श्री. गो. के. परांजपे, कै. दादासाहेब कवठेकर व श्री. ज. आ. मोडक यांचाही व्यवसायाच्या विकासाला मोठाच हातभार लागला आहे. देशातील लगद्याची मागणी पुरी करता यावी यासाठी लगद्याच्या गिरणीची उत्पादनक्षमतासुद्धा प्रतिदिनी १५० टनांपर्यंत म्हणजे प्रतिवर्षी ४०,००० टनांपर्यंत वाढलेली आहे. ही उत्पादनक्षमता **५०,००० टनांपर्यंत वाढविण्याच्या कल्पनेवर कंपनी सध्या विचार करीत** आहे. तसेच कागदाचे उत्पादनही प्रतिवर्षी २१,००० टनावर नेण्याचा विचार कंपनी करीत आहे. सेन्ट्रल पल्प मिल्सने सुमारे २ कोटी रु. किमतीचा लगदा निर्यात केला आहे. त्याशिवाय **आतापर्यंत सुमारे २२ कोटी रुपयांची आयात थांबविली आहे. सोनगडला गिरणीत सुमारे १००० लोक काम करीत आहेत; त्याशिवाय सुमारे ८,००० आदिवासी बांबू तोडण्याच्या कामात गुंतले आहेत.**

## पेपको मिल्सचा विकास

खोपोलीला सुमारे ७०० कामगार काम करीत असून शिवाय कागदाची रद्दी गोळा करून ती पुरविण्याच्या कामात सुमारे १००० लोक गुंतलेले आहेत. **खोपोलीच्या यंत्रविभागात कागदव्यवसायाला उपयुक्त अशी अनेक यंत्रे आणि उपकरणे तयार होतात.** हा यंत्रविभाग स्वतंत्र करून त्याचा विकास करण्याची योजना सध्या विचाराधीन आहे. त्याशिवाय वृत्तपत्रांना लागणाऱ्या फ्लॉन्ग किंवा मॅट्रिक्स बोर्ड या विशिष्ट प्रकारच्या कागदाचे उत्पादन करण्याची योजना हाती घेतली आहे. तसेच 'पारखे कन्सल्टंटस् प्रा. लि.' ही संस्था नव्या **कागदउद्योगांना मार्गदर्शन करण्यासाठी काढण्यात आली आहे.**

पेपको मिल्सचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून श्री. प्रकाश पारखे व सेल्स ऑर्गनाइझर म्हणून श्री. अरुण पारखे व्यवसायाचा व्याप सांभाळत आहेत. तसेच पेपकोचे सेक्रेटरी श्री. वि. मा. सावळापूरकर दैनंदिन प्रशासन पाहतातच. त्याशिवाय व्यवसायाचे नियोजन व विस्ताराच्या विविध बाबूसंबंधीही ते काम पहातात. पेपकोच्या विकासाला कै. सुधाकरजी यांचाही मोलाचा हातभार लागला आहे.

## पारखे रिसर्च फाउंडेशन

कागद व पुठ्ठ्यापासून बनणाऱ्या वस्तूंचे अनेक छोटे कारखाने काढता येण्यासारखे आहेत. अनेक कलाकुसरीच्या वस्तू व दैनंदिन जीवनात वापरता येण्यासारख्या वस्तू पुठ्ठ्यापासून बनवता येणे शक्य आहे. या बाबतीत जपानने खूपच प्रगती करून दाखवली आहे. बांबूपासूनही अनेकविध प्रकारच्या वस्तू बनू शकतात, ज्याची सामान्य माणसाला कल्पनाही नसते. त्यासाठी नुकतेच पुण्यात एक प्रदर्शन आयोजित केले होते. या बाबतीत कायम स्वरूपाचे काही कार्य करावे या दृष्टीने उद्योगसमूहाने काही योजना आखल्या आहेत. कोणत्याही उद्योगाचा विकास संशोधनावाचून होत नाही. कागदव्यवसायातही आज संशोधनाची नितांत आवश्यकता आहे. पाश्चात्य देशांत प्रत्येक मोठी कागदगिरणी संशोधनासाठी व अभ्यासासाठी एक सुसज्ज प्रयोगशाळा चालवते. भारतातील अनेक मोठ्या गिरण्यांकडे अशा प्रयोगशाळा आजही नाहीत.

कागदव्यवसायाच्या तांत्रिक बाजूसंबंधी संशोधन करण्यासाठी नुकतीच पारखे रिसर्च फाउंडेशनची स्थापना केली आहे. कागदगिरणीत वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची कोणत्या प्रक्रियांनी सुधारणा करता येईल याचा प्रथम अभ्यास फाउंडेशनतर्फे केला जाईल. त्यातूनच कागद व पुठ्ठ्याच्या दर्जासंबंधी अनेक अभ्यासयोजना हाती घेतल्या जातील. आणखी कोणत्या कच्च्या मालापासून आर्थिकदृष्ट्या किफायतशीर रीतीने चांगला कागद बनवता येईल याचाही अभ्यास फाउंडेशन हाती घेणार आहे. यासाठी रासायनिक व तांत्रिक संशोधनाची सोय असलेली एक अद्यावत संशोधनशाळा फाउंडेशनतर्फे उभारली जाणार आहे.

### यशाचे श्रेय :

व्यवसायाला प्रारंभ करताना व विकासाच्या योजना राबवताना अनेकविध अडचणी व समस्या उभ्या राहिल्या. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडवावे लागले. सोनगडचा प्रकल्प तर अनेक मोठ्या अडचणींतून पुरा करावा लागला. १९६६ सालच्या अवमूल्यनामुळे या प्रकल्पाचा ऋणभार दोन कोटी रुपयांनी एका रात्रीत वाढला आणि व्यवसायाचे आर्थिक गणित विस्कटून गेले; परंतु या सर्व अडचणींतून मार्ग काढून प्रकल्प पुरा झाला व उत्पादन सुरू झाले.


छोट्या कागदगिरण्यांसाठी कागदाचा लगदा पुरविण्यासाठी हा कारखाना निघाला; परंतु सरकारने परवाने दिलेल्यांपैकी सुमारे ८० / ९० टक्के गिरण्या सुरू होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे लगद्याला पुरेशी मागणी येईना. व्यवसायाचे आर्थिक गणित बसण्यासाठी कागदाची गिरणीच सोनगडला उभारावी लागत आहे. सुमारे ५।६ कोटी रुपयांची ही कागदगिरणीची योजना आता एक टप्पा पुरा करून दुसऱ्या टप्प्यात जात आहे.

अडचणी आल्या तरी न डगमगता दुप्पट उत्साहाने त्या अडचणींशी सामना करून मात करण्याची जिद्द व चिकाटी श्री. बाबुरावजींच्याजवळ आहे. त्यामुळेच व्यवसायाचा विस्तार एवढा होऊ शकला. स्वतः बाबुरावजींना व्यवसायाच्या यशासंबंधी विचारले तर मात्र ते म्हणतात, 'परमसद्गुरु श्रीगजाननमहाराज ह्यांची कृपा व मातुःश्री माईसाहेबांच्या प्रेरणेमुळेच उद्योगाला यश मिळू शकले. श्रद्धा ठेवून प्रयत्न केले एवढाच आमचा भाग. श्रीगजाननमहाराजांच्या कृपेवाचून या अडचणीतून मार्ग काढू शकलो असतो की नाही ही शंकाच आहे.'

बाबुरावजींच्या जवळचा गुणसमुच्चय व त्यांच्या सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य यामुळेच शून्यातून एवढा मोठा विस्तार झाला हे कोणीहि मान्य करील. पंचेचाळीस वर्षांच्या इतक्या छोट्या कालखंडात एवढा मोठा उद्योगसमूह विस्तारला हे बाबुरावजींना व त्यांच्या सहकाऱ्यांनाही भूषण आहे आणि देशाच्या भावी औद्योगिक भरभराटीचीही त्यातच ग्वाही आहे.

महाराष्ट्राने अनेक कर्तृत्ववान व्यक्तींना जन्म दिला, वाढवले व त्यांच्या कर्तबगारीने बहरलेला कालखंड डोळे भरून पाहिला आहे. अनेक क्षेत्रांत महाराष्ट्राचे सुपुत्र चमकले आणि त्यांनी भारतीय पातळीवर विशिष्ट कार्यक्षेत्रात खोल ठसा उमटवला आहे. अनेक पिढ्या कार्याच्या खुणा मागे राहतील अशी कामगिरी महाराष्ट्रीय व्यक्तींनी करून दाखवलेली आहे. अशा अफाट कर्तृत्वाच्या व्यक्तींमध्येच श्री. बाबुरावजी पारखे यांचीहि गणना करावी लागेल. अवघ्या पंचेचाळीस वर्षांच्या कालखंडात पारखे उद्योगसमूहाची वाढ, विस्तार व विकास बहुविध दिशांनी झालेला आहे !

काही शेकडो रुपये किमतीच्या दोन यंत्रांनी सुरू झालेल्या या उद्योगसमूहात आज वीस कोटींहून अधिक भांडवल गुंतवणूक झाली आहे. कागदाची केवळ पाकिटे बनवणाऱ्या एका छोट्या गृहउद्योगाचे रूपांतर आज पुठ्ठे, वेष्टनकागद, लगदाकागद, यंत्रसामुग्री वगैरे अनेक वस्तू बनवून उद्योगविषयक सल्ला देणाऱ्या व संशोधन करणाऱ्या एका मोठ्या उद्योगसमूहात झाले आहे. अत्यंत आश्चर्यकारक वाटावी अशीच ही प्रगती आहे. श्री. बाबुरावजींच्या अफाट कर्तृत्वातून या विलक्षण प्रगतीला दिशा मिळाली व त्यांच्या सहकाऱ्यांच्या चिकाटी व परिश्रमांतूनच या उद्योगसमूहाचा इतिहास घडला आहे.



## नवीन यंत्रे प्रक्रिया व प्रकल्प

# ‘ डिम्पेक्स इंटरनॅशनल ’च्या

## सौ. प्रभा ठकार ह्यांची मुलाखत

पुण्याच्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या एकमेव प्रमुख स्त्री एक्स्पोर्टर सभासद सौ. प्रभा ठकार ह्यांच्या ‘ डिपेक्स इंटरनॅशनल ’ ह्या उद्योगसंस्थेचा तिसरा वर्धापनदिन ह्याच महिन्यात नुकताच झाला. विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे एक महिला असून स्वतःच्या हिंमतीवर त्यांनी त्यांचा उद्योग वाढवला. एवढेच नव्हे तर ज्या उद्योगाला व्यापारी व कारखानदारी दृष्टीने कोणी महत्त्व देणार नाही अशा कलात्मक वस्तूंच्या निर्मिती व परदेशी व्यापार ह्यांत साहसी व संयोजक दृष्टी दाखविली व जगावेगळा हा उद्योग परदेशी चलन मिळवून देण्यात किफायतशीर आहे हे त्यांनी सिद्ध केले आहे. आंतरराष्ट्रीय महिलावर्षाच्या निमित्ताने ह्या मुलाखतीचे औचित्य जास्त आहे. सौ. प्रभाताई ठकार ह्यांच्या उदाहरणाने महिला-वाचकांनी स्फूर्ती घेऊन आर्थिक व उद्योगव्यवस्थापनक्षेत्रात धडाडीने पुढे सरसावण्यासाठी ह्या चालू वर्षी निर्धार करावा ही अपेक्षा.

**आपल्या ‘ डिपेक्स इंटरनॅशनल ’ ह्या व्यापारी संस्थेच्या धंद्याचे स्वरूप काय ?**

आमची ही संस्था प्रोप्रायटरी कन्सर्न आहे. आमच्या संस्थेमार्फत गृहांतर्गत सजावट (इंटिरिअर डेकोरेशन), फर्निचर कॉंट्रॅक्टस्, शोभिवंत व कलात्मक वस्तूंचे उत्पादन, कपड्यांवर ‘ बाटिक ’ डिझाइन्स करून देणे ‘ बाटिक ’ कला शिकवण्याचे वर्ग तसेच भारतातल्या जुन्या काळातल्या आकर्षक वस्तूंच्या नमुन्याप्रमाणे केलेल्या वस्तू की ज्यात भारतीय इतिहास, संस्कृती व कला ह्यांचे दर्शन घडते अशा अस्सल पौर्वात्य वस्तूंची निर्यात ह्या प्रमुख गोष्टी केल्या जातात. तसेच आम्ही भारतातल्या विविध जाती-जमाती, आदिवासी आणि ग्रामीण लोक ह्यांच्या अलंकार, पूजेचे साहित्य, कला, पेहराव इत्यादींच्या नमुन्यांवरून, आमच्या कारागिरांकडून तशा कलात्मक वस्तू तयार करवून घेतो व त्या वस्तू देशातल्याच हॅंडलूम हाउस, पारिजातसारखी सहकारी भांडारे व सुपर मार्केट्सच्या द्वारा फॅशनेबल जगात प्रसृत करतो. ज्या वस्तू ‘ अतिपुरातन ’ (Antique) आहेत त्यांच्या बाजारावर नियंत्रणे आहेत. विशेषतः अमेरिका, जर्मनी व युरोपातील प्रगत देशांतील श्रीमंत लोकांत भारतीय घाटाच्या कलात्मक वस्तूंची ( उदाहरणार्थ बाटिक आर्ट इत्यादी ) मागणी अलीकडे वाढू लागली आहे. आम्ही अशाच वस्तूंची निर्यात करण्यावर आता जास्त भर दिला आहे. वस्तू पाठवताना मात्र आम्हाला ती अति-पुरातन नाही ह्याची काळजी घ्यावी लागते. तसेच जेवढ्या वस्तू कस्टम नियमानुसार पाठवता येतात तेवढ्याच वस्तूंचा समावेश आम्ही आमच्या निर्मिती आणि निर्यातीत केला आहे.

**तुम्हाला ह्या चाकोरीपेक्षा वागळ्या धंद्याची कल्पना कशी सुचली ?**

खरे म्हणजे ही कल्पना पूर्वनियोजित नाही. मुळात धंदा किंवा व्यापार करावा असे अनेक वर्षं कधी वाटलंच नाही. माझे पती हे भारतीय विमानदलात एक अधिकारी होते. लग्न झाल्यानंतर (Cosmopolitan) संमिश्र समाजात वावरावे लागले. आम्ही त्या वेळी राजस्थान, दिल्ली, डेहराडून ह्या भागात जास्त राहिलो. दिल्ली हा बाटिकचा बालेकिल्ला. उत्तर भारतातल्या पंजाब, दिल्ली, हरियाना या राज्यांत बाटिकची आवड असलेल्या महिला फार. मैत्रिणींच्या ओळखीने छंद म्हणून मी बाटिक शिकले. शिकायलाही अवघड गेले नाही. कारण लहानपणापासून माझे ड्रॉइंग चांगले होते. ड्रॉइंगमध्ये खूप बक्षिसे मिळाली होती. शाळेतले व कॉलेजमधील करिअर प्रथमश्रेणीचे असूनही पेंटिंग्जच्या स्पर्धेत मी हौसेने भाग घेत असे.

आमच्या सैन्यदलातल्या अधिकाऱ्यांच्या पत्नींचे एक विशिष्ट प्रकारचे सामाजिक जीवन असते. त्यात अशा छंदांना आपोआपच महत्त्व प्राप्त होते. कधी पतिराज फ्रंटवर, कधी दौऱ्यावर, तर कधी इमर्जन्सी ड्यूटीवर. मिस्टर ठकारांची बदली ज्या वेळी आसाममध्ये झाली त्या वेळी तिथे Family Station नसल्यामुळे मी दिल्लीतच राहिले व दिल्लीत मी ‘ सिल्व्हिया स्कूल ऑफ इंटिरिअर डेकोरेशन ’ जॉइन केले.



☆ ☆ ☆

**सौ. प्रभा ठकार**
**त्यांच्या बाटिक कलाकृतीसह**

त्या स्कूलचा मी डिप्लोमा मिळविला; पण तोपर्यंत डेकोरेशन बाटिक इत्यादींचा उपयोग धंद्याकरता करावा असे मला तरी कधीच वाटले नाही. मिस्टर ठकार पुन्हा दिल्लीला परतल्यावर मात्र, माझी बाटिक व इंटिरिअर डेकोरेशनमधील प्रगती पाहून त्यांनी पक्के ठरविले की ह्या कलेचा उपयोग धंद्याची दृष्टी ठेवूनच केला पाहिजे. त्याचे कारण असे की, एक तर माझ्यातली कला वाया जाऊ नये आणि दुसरे म्हणजे सेवानिवृत्तीनंतर आम्हा दोघांना एक स्वतंत्र उद्योग करता आला पाहिजे. म्हणून त्यांनी बळेबळे मला जाहिरात देण्यास प्रवृत्त केले. आमची पहिली जाहिरात दिल्लीच्या टाइम्समध्ये आली आणि त्याला प्रतिसाद मिळाला एका अजमेरच्या गृहस्थाकडून. त्यांच्या बंगल्याच्या सजावटीचे काम मला मिळाले. हा आमच्या धंद्याचा ओनामा. त्यानंतर किलाचंद, गोएंका समूहांच्या काही इमारतींची दिल्लीतच कामे मिळाली. त्यानंतर आमचे घरचेच काम म्हणजे डेहराडूनच्या एअरफोर्स अकादमीच्या मेसहॉलचे. अशी एकामागून एक कामे मिळत गेली; पण दिल्लीमध्ये बाटिक वस्तूंच्या निर्यात-धंद्याचे काही सुचले नव्हते. एका अनुभवातून दुसरी–दुसरीतून तिसरी–अशाच कल्पना घेऊन आम्ही आमचा धंदा वाढवला. व्यापार करायचा एवढा ठाम निर्धार मात्र श्रीयुत ठकारांचा. त्यात श्रेय मला नाही.

**दिल्लीला आपल्या धंद्याचा जम बसू लागल्यावर आपण पुण्याला का आलात ? पुण्याचे काही स्वतंत्र आकर्षण आहे काय ?**

दिल्लीला आम्ही जरी काही कामे मिळविली तरी दिल्लीत स्थायिक व्हायचे नाही एवढे आमचे निश्चित ठरले होते. निवृत्तीनंतर पुण्यात राहायचे म्हणून आम्ही १९६७ पासूनच एक जागा बुक करून ठेवली होती. दिल्लीत फक्त अनुभव

☆ ☆ ☆



**सौ. राधिका बेवूर**
**बाटिक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना**

मिळाला. बाटिकची कला आत्मसात करता आली. उत्तर हिंदुस्थानात आणि विशेषत: दिल्लीत कलाकुसर, कारागिरी, सौंदर्य, सजावट ह्यांच्याबद्दल विशेष प्रेम आहे. मोंगलांची राजधानी व हिंदु-मुस्लीम संस्कृतीतील अभिजात रसिकतेचा संगम एकूण आर्थिक समृद्धीमुळेदेखील, तिकडे आपल्यापेक्षा जास्त आढळतो. दिल्लीत शिकायचे, पाह्यचे, प्रयोग करायचे; पण त्यांचा उपयोग महाराष्ट्रातच करायचा असे आम्ही ठरवले. शिवाय निवृत्तीनंतर दिल्लीला राहणे मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय व्यक्तीस परवडण्यासारखे नाही. आमचे मित्र-नातेवाइक व परिवार इकडे म्हणून आम्ही महाराष्ट्रातच स्थायिक व्हायचे ठरवले. अफाट मुंबईत जागा मिळवणे व धंदा करणे ह्या गोष्टी त्रासदायक म्हणून टुमदार पण आधुनिक पुणे (जे मुंबईहूनही दूर नाही) आम्ही निवडले.

**पुण्यास तुम्ही केव्हा आलात ? आल्यानंतर तुम्ही धंद्याची जुळवाजुळव कशी केली ? सुरुवातीच्या दिवसांत तुमचे धंद्याचे स्वरूप कसे होते ?**

१८ जून १९७० ला मी पुण्यात आले. श्रीयुत ठकार दिल्लीतच राहाणार होते. कारण त्यांची नोकरीची ३-४ वर्षे राहिली होती. त्यांच्या निवृत्तीनंतर आम्ही पुण्यास आलो असतो तर धंद्याची सुरुवात होऊन जम बसायला अधिक काळ गेला असता. आमचे पुण्यातले घर तयार झाले की मी लगेच दिल्लीहून निघाले. ह्यात मात्र नियोजन होते. पुण्यास आल्या-वर माझे दीर प्रो. एम्. बी. ठकार (प्रोफेसर ऑफ साउंड रेकॉर्डिंग, फिल्म इन्स्टिटयूट) तसेच आमचे इतर नातेवाईक व मित्रमंडळी ह्यांची मदत झाली. उत्तेजन मिळाले; पण उत्तेजनाखेरीज आणखीन काय मिळणार ! कलात्मक वस्तू... त्याही बाटिकच्या... इंटिरिअर डेकोरेशनसारखी महागडी फॅड... ह्या सर्वांबद्दल अस्सल पुणेकराला ह्या गोष्टी धंद्याच्या

दृष्टीने कशा यशस्वी होणार ह्याबद्दल संशय वाटणे साहजिकच आहे. त्या वेळी प्रथमतः मी 'बाटिकचा' एक वर्ग काढला. वर्गाची फी १५० रु. होती. फीमध्येच वर्गातर्फे बाटिकला लागणारे कापड, रंग, मटेरिअल पुरवले जात असे. महिलांना त्याची गोडी लागली. तसं म्हटलं...तर...पुण्यात बाटिक 'त्याआधी' फारसे माहीत नव्हते. मी ते येथे पहिल्यांदा Popular केलं असं म्हणणं वस्तुस्थितीस सोडून नाही. आमच्या क्लासमधील मैत्रिणींच्या साहाय्याने मी बाटिकची प्रदर्शनेही भरवली. त्यात सौ. राधिका बेवूर ह्यांनी उद्घाटन केलेले राजेंद्रसिंग इन्स्टिट्यूटमधील १९७३ चे प्रदर्शन उल्लेखनीय आहे. ह्या प्रदर्शनामुळे माझ्या ओळखी वाढल्या. त्यातूनच 'इंटिरिअर डेकोरेशन'च्या कल्पनेला चालना मिळाली. सुरुवातीला आमच्याच वसाहतीतील शेजाऱ्यांच्या घरातील प्रमुख दालनांची मी सजावट करून दिली. सकाळ, केसरी व पूना हेरॉल्डमधून जाहिरात देऊ लागले. ग्राहकांच्या शिफारसी, वर्तमानपत्रातील जाहिराती व प्रसिद्धी तसेच व्यक्तिगत परिचय त्यातून काम मिळू लागले. पुण्यात माझे स्वतःचे कंपनीत सुतार कामाला नसल्यामुळे मोडक ब्रदर्स ह्यांच्या सहकार्याची मला मदत झाली. हळूहळू सुतारांना कॉंट्रॅक्ट द्यायचे व त्यांच्याकडून कामे करवून घ्यायची हेही मला जमू लागले. विशेषतः मी माझ्या गाडीने टिंबर मार्केट-मध्ये एकटीच स्त्री मोठ्या प्रमाणावर लाकूडखरेदीकरता जेव्हा जात असे तेव्हा प्रथम मार्केटमधील मंडळींना ते विचित्र वाटत असे. लाकूड डिकीत व वर कॅरिअरवर टाकून मी खुशाल धंद्याकरता ग्राहकांकडे तसेच वर्कशॉपवर जात असे. त्या वेळी माझ्या पेहराव व चेहऱ्यामोहऱ्यावरून मी महाराष्ट्रीय स्त्री आहे असं वाटत नसल्यामुळे मला वाटतं...ते थोडसं धकलंही असावं. आता सर्व गोष्टी परिचयाच्या, नित्याच्या झाल्यावर मार्केटमधल्या लोकांनाही त्यात संकोचल्यासारखं होत नाही. इंटिरिअर डेकोरेशनची आमची सुरुवातीची उल्लेखनीय कामे म्हणजे 'अमीर हॉटेल'चा ऑडिओ-क्लब तसेच 'ब्लू डायमंड' हॉटेलमधील 'मयूरहॉल'. एकीकडे बाटिकच्या वस्तूंची विक्री व दुसरीकडे डेकोरेशन असे मी करत असता एक महत्त्वाची कलाटणी आमच्या धंद्याला मिळाली. पुण्यात परदेशी टूरिस्ट येत असतात. ते इथे आल्या-वर भारतीय कलात्मक वस्तू खरेदी करण्यात इंटरेस्टेड अस-तात. माझा ह्या लोकांशी संपर्क येऊ लागला व त्यांनी बाटिकच्या वस्तू विकत घेण्यास सुरुवात केली. विमानाने जाताना, वस्तू हव्या तितक्या नेता येत नसल्याने, स्वदेशी परत गेल्यावर त्यांच्याकडून काही ऑर्डर्स मिळू लागल्या. परदेशातून जी पहिली ऑर्डर आली ती 'अलास्का'तून. त्या ऑर्डरमुळेच 'डिम्पेक्स इंटरनॅशनल' ह्या संस्थेचा जन्म झाला. ती ऑर्डर मोठी होती व ती पुरी करण्यासाठी आम्हांला निर्यात-परवाना घेणे आवश्यक होते. त्याकरता रजिस्टर्ड व्यापारी संस्थेची गरज होती म्हणून लगेच घाईघाईने सर्व कायदेशीर व्यवहार पुरे करून ५ जुलै, १९७२ रोजी आम्ही डिम्पेक्स इंटरनॅशनलची मुहूर्तमेढ केली. अशा रीतीने मी भारतातील निर्यात-उद्योगात पदार्पण केले.

**आपण मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासद केव्हा झालात ? चेंबरच्या बाबतीत आपले अनुभव काय आहेत ?**

चेंबरची सभासद मी १९७२ मध्येच झाले. चेंबरच्या सभा-सदत्वामुळे मला निर्यात-परवाना, बँकांकडून भांडवल, तसेच व्यवस्थापकीय मार्गदर्शन उपलब्ध होण्यास मदत झाली. चेंबरच्या सभा, व्याख्याने, पत्रके व साहित्य उपयुक्त असते. पण मी एकटीच स्त्री सभासद सभांना उपस्थित असले म्हणजे मलाच संकोचल्यासारखे होते. चेंबरमध्ये माझ्या जोडीला अनेक महिला ज्या वेळी येतील त्या वेळेला खरंच मराठा चेंबरमध्ये एक नवे Life व चैतन्य येईल. चेंबरने सेक्रेटरीअल तसेच एजन्सी सर्व्हिसेस जास्त प्रमाणावर उपलब्ध कराव्या. तसेच मॅनेजमेंट कन्सल्टिंगची चेंबरमार्फत स्पेशलाइज्ड सोय झाल्यास फारच चांगले होईल.

**महिला म्हणून आपल्याला धंद्यात कोणत्या स्वरूपाच्या अडचणी येतात ?**

पहिली म्हणजे...पुरुषांना वाटणारा संकोच व विचित्रपणा. त्यामुळे धंद्याचे सौदे ठरवताना एक प्रकारचा Curt पणा आढळतो. दोन पुरुष जसे मोकळेपणानी बोलू शकतात त्या-प्रमाणे स्त्रीशी त्यांना बोलता येत नाही. काही व्यवहार, कर, कायदे इत्यादीमुळे व्यापारीसंकेतानुसार होत असतात. स्त्रियांशी ते मोकळेपणाने ठरवणे कठीण होते. ऑफिसमधील एखादा माणूस नियमांनुसार माहिती देतो. एखादा पुरुष जसा दुसऱ्याला चहाला घेऊन जाईल, पार्टीला आमंत्रण देईल, ड्रिंक्स व इतर आवडीनिवडीसंबंधी विचारील म्हणजेच व्यापारी स्वरूपाची घसट वाढवण्याकरिता ज्या गोष्टी पुरुषांमध्ये शक्य होतात तितक्या प्रमाणात एखाद्या स्त्रीने नेतृत्व केलेल्या धंद्यात होणे कठीण. तसेच स्त्रियांना वाजवीपेक्षा जास्त दाक्षिण्य दाखविले जाते. अंडरहॅंड डीलिंग, व्यक्तिगत कमिशन अशा गोष्टी अप्रत्यक्षरीत्यादेखील सुचवता येत नाहीत. ह्या-बाबतीत माझी तक्रार नाही; पण व्यवहारांचे करार त्यामुळे मर्यादित संख्येनेच होतात. ह्याशिवाय एखाद्या उच्चपदस्थ प्रतिष्ठित ग्राहकाने बिलाचे पैसे बुडवले तर ते वसूल करणे कठीण. ह्याच्या जोडीला प्रवास, धावपळ, दगदग हे तर असतातच; पण स्वतःच्या घरातले कामही चुकत नाही. बँक-मॅनेजरलासुद्धा कर्ज मंजूर करताना एक प्रकारची धास्तीच वाटते.

सारांश महिला म्हणून उद्योग करताना अडचणींची यादीच मोठी होईल.

**आपली धंद्याची उलाढाल गेल्या तीन वर्षांत कसकशी वाढली ?**

पहिल्या वर्षी म्हणजे ७२–७३ मध्ये आमच्या कंपनीची उलाढाल सुमारे ८०००० रुपयांइतकी झाली. ७३–७४ मध्ये ती १ लाखावर गेली व गेल्या वर्षी म्हणजे ७४–७५ मध्ये ती १। लाखाच्यावर आहे. चालू वर्षी ती अजूनही वाढेल. ह्याचे



**वर्कशॉपमधील विद्यार्थिनी**

कारण परदेशात आमच्या फर्मला प्रसिद्धी मिळू लागली आहे. पण आमच्या धंद्याचे स्वरूप इतर धंद्यांपेक्षा फार वेगळे आहे; ऑर्डर आल्या की रॉ मटेरिअल घ्या व फिनिश्ड प्रॉडक्ट बनवा इतकं ते सरळ नाही. ऑर्डर्स कलात्मक वस्तूंच्या येतात. त्या तयार करायला कलावंताचे श्रम ( Artistic Labour ) लागतात. तसेच विविध वस्तूभंडार दुकाने, जुन्या वस्तूंची दुकाने, जुनी सराफी दुकाने, सुपर स्टोअर्समधून हेरून गोळा करावी लागतात. म्हणजे त्यात Collection Work आहे. ऑब्सर्व्हेशन वर्क तर फार! सारखं त्या दृष्टीने कुठे काय मिळेल ह्यावर लक्ष ठेवावे लागते. त्यामुळे धंद्याचा व्याप वाढवायला नैसर्गिक मर्यादा आहेत. ह्याच्यात वैयक्तिक माझे श्रम, पर्यवेक्षण व निवड ह्या गोष्टीत वेळ फार जातो; पण त्याला इलाज नाही. म्हणूनच जसजशा परदेशी ऑर्डर्स येऊ लागल्या तसतसे निर्यात व्यापारावरच मला लक्ष केंद्रित करावे लागत आहे. त्यामुळे बाटिकच्या वस्तू. तसेच अंतर्गत सजावटीची कामे फारशी घेता येत नाहीत. सुदैवाने मिस्टर ठकार नुकतेच मला जॉइन झाले आहेत. आता आमच्या दोघात व्यवस्थापकीय श्रमाचे वाटप करता आले आहे. ते व्यावहारिक बाजू पहातात तर मी कलात्मक बाबींकडे लक्ष देऊ शकते. दुःख हे होते की कामे फार मिळत असूनही आम्ही ती जास्त प्रमाणावर घेऊ शकत नाही ह्याचंच.

**कलात्मक वस्तू व सजावट ह्या गोष्टींची मागणी चैनीच्या सदरात येते. त्यामुळे ही मागणी फक्त श्रीमंत गटापुरतीच मर्यादित असेल. त्यामुळे ह्या धंद्याला कितपत वाव (Scope) आहे? अलीकडच्या आर्थिक बिकट काळात ह्या गोष्टींची मागणी व आवड कमी झाली असेल काय?**

ह्या बाबतीत आमचा अनुभव असा आहे की ह्या गोष्टींची आवड व गरज सतत वाढत चालली आहे. नुसतेच श्रीमंत लोक आमचेकडे ह्या मागण्या करतात असे नाही तर मध्यमवर्गातल्या व्यक्तींना देखील–निदान आपली ड्रॉइंगरूम तरी उत्तम फर्निश्ड तसेच रंग–संगती, भिंतीवरील सजावट, खोलीत ठेवलेल्या साऱ्या वस्तूंना खास व्यक्तिमत्त्व, योग्य घाट डिझाइन असावे आणि साऱ्या वस्तूंच्या समूहातून एकवटलेले समतोल सौंदर्य निर्माण व्हावे अशी इच्छा व गरज वाटत आहे. तसेच मोठमोठ्या सामाजिक मालकीच्या तसेच कंपनींच्या मालकीच्या इमारती, हॉटेल्स् ह्यांना योग्य रीतीने सजवावे असे वाटू लागले आहे. कारण बिल्डिंगच्या खर्चाच्या मानाने सजावटीचा खर्च तसा अल्प असतो; पण सजावटीने जो ग्रेस येतो तो ओबडधोबड इमारतीला येत नाही. अगदी साध्या कल्पनांनी, कमी खर्चात सजावट करता येते हे अलीकडे लोकांच्या ध्यानात येऊ लागले आहे. रहाणीमानही वाढत आहे. तेव्हा कलात्मक वस्तूंची व रसिकांची गरज वाढतच राहणार.

खरं म्हणजे ह्यापुढच्या काळांत ह्या धंद्याला स्कोप फार वाढत रहाणार आहे अशी परिस्थिती आहे. सध्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये सुद्धा ज्या घरात आपण विसावा घेतो ते घर सुरेख असावे, सुंदर असावे ही गरज तशी कायमची व अटळ आहे. सजावटीचा खर्च सुद्धा एकदाच होतो. त्यामुळे जे लोक फ्लॅट बांधतात त्यांना सजावटीचा खर्च फ्लॅटच्याबरोबर आवश्यक स्वरूपाचा वाटतो म्हणूनच तितकेसे जड वाटत नाही. 'इंटिरिअर डेकोरेशन' खरं म्हणजे सापेक्ष आहे. आपआपल्या घरानुसार, गरजेनुसार, उत्पन्नानुसार ते Adjust करता येईल. उदाहरणार्थ एखाद्या सामान्य उत्पन्नाच्या मध्यमवर्गीय व्यक्तीच्या घरातील बैठकीची खोली ५० ते १०० रुपयात सुरेखपणे डेकोरेट करता येईल. त्याच्या पलंगावरील गाद्यांना आच्छादणारी सुरेखशी चादर, त्यावर गिरद्या, खिडक्या व दारांना बाटिकचे पडदे, भिंतीवर १० रुपयांपर्यंतचे बाटिकचे म्युरल तसेच टेबलक्लॉथ इत्यादींनी ते घर सुद्धा सुशोभित होऊ शकेल. ४००–५०० रुपये खर्चल्यास खोलीला साजेसे फर्निचर पाहिजे तसे करून घेता येईल. बाजाराच्या रेडिमेड स्टिरिओटाइप फर्निचरपेक्षा हे मुद्दाम बनवून घेतलेले फर्निचर वेगळ्या घाटाचे डिझाइनचे असल्यामुळे खोलीच्या व्यक्तिमत्त्वाला वैशिष्ट्य आणू शकते. त्या घरात येणाऱ्या इतर परिचित मंडळींना ह्या वैशिष्ट्यपूर्ण फर्निचरचे व सजावटीचे कौतुक वाटून गृहस्वामिनीला त्यामुळे जे सतत समाधान लाभेल त्याचे मोल काहीच नाही कां? १०००–२००० रुपये खर्च केल्यास एखादा छोटासा फ्लॅट छानपैकी सजवता येतो. कालांतराने लोकांचे पूर्वग्रह व त्याबद्दलचे गैरसमज निघत आहेत म्हणूनच 'अंतर्गत सजावट' ह्या धंद्याला, योजक चतुर असल्यास असीमित वाव आहे.

**आपल्या धंद्यातल्या यशाचे रहस्य काय?**

मी खालील गोष्टींमुळे यश लाभले असे सांगेन. (१) मला स्वतःला माझ्या धंद्याची माहिती आहे. मी स्वतः आर्टिस्ट आहे. दुसऱ्यावर अवलंबून मला आर्टिस्टिक कामे करून घ्यावी लागली असती तर हा धंदा जमला नसता. (२) धंद्याला जी चौफेर अनुभवाची व अवलोकनाची दृष्टी लागते ती मला माझ्या वैयक्तिक जीवनातून लाभली. इजिप्तमध्ये आम्ही ३ वर्षे राहिलो. देशविदेश पाहिले. भारतात हैद्राबाद, डेहराडून, दिल्ली, जोधपूर इत्यादी ठिकाणी राहिलो. राजस्तान, हैद्राबाद व दिल्ली ह्या भागात टूरिस्ट लोकांची केंद्रे. तसेच सौंदर्यदृष्टी वाढवायला अनुकूल. (३) माझी स्वतःची धडाडी, इंग्रजी, हिंदी, इ. भाषांवर प्रभुत्व व यजमानांचे उत्तेजन व मार्गदर्शन (४) वैयक्तिक संपर्क व सोशल लाइफ. (५) बाटिकचा वर्ग. ह्या वर्गात श्रीमंत व उच्चमध्यम वर्गीय देशी व परदेशी महिलाच येत असल्याकारणाने आपोआप परिचय व परिचयातून कामे मिळण्याची संधी (६) पूना हेरॉल्डमधल्या जाहिराती. कारण ह्या पत्राचे वाचन ज्या समाजात, ज्या घरात होते त्याच घरातून डेकोरेशनकरता मागणी येण्याचा संभव असतो. (७) मिस्टर ठकारांनी व्यवस्थापनाची एक आघाडी आता संपूर्णपण सांभाळली आहे. (८) विमानदलातल्या नोकरीच्या अनुभवामुळे परदेशांबद्दल जास्त माहिती. निर्यातपरवाना मिळाला. तसेच आर्टिस्टिक मॅगेझिन्स, फॅशन्स म्युझियम, ओव्हरसीज बुलेटिन, एक्स्पोर्ट गाईड इत्यादी सतत पाहत राहिल्याने धंद्याची अद्यावत दृष्टी. (९) स्टेट बँक, एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी स्कीम व इतर लघु व खादी उद्योगांना मिळणाऱ्या सवलती. (१०) आणि शेवटचे म्हणजे ह्या धंद्यात मिळणारा आनंद–तो म्हणजे चाकोरीबाहेर जाऊन काही विशेष करून दाखवण्याचा व पैसे मिळवण्याचा.

**आपल्या धंद्यात कोणत्या अडचणी आहेत?**

पहिली म्हणजे निर्यातविषयक सारखे बदलत असणारे कायदेकानू व नियम ह्यांच्यामुळे होणारी डोकेदुखी. दुसरी म्हणजे भांडवल. तिसरी म्हणजे वेळेचा अभाव, चौथी म्हणजे मेण, केरोसीन, साबण, डिटर्जंट पावडर, व नेप्थॉल व ब्रियॉल जे उंची रंग बाटिकच्या कामासाठी लागतात त्यांच्यात झालेली भाववाढ. शेवटची म्हणजे कॉंट्रॅक्ट पुरा केल्यानंतर ग्राहकांला इंजिनिअर डेकोरेटरला पैसे देताना जी खळखळ वाटते त्याची, ग्राहकाला वाटतं की डेकोरेटरने जे केलं ते आपल्यालाही करता आलं असतं. फरक एवढाच आहे की काम पुरे झाल्यानंतर त्यांना तसे वाटते. काम पुरे होण्याच्या आधी डेकोरेटरचीच मदत हवी असते. सारांश डेकोरेटरचे काम फक्त "कल्पना देण्याचेच" आहे. एकदा त्याची कल्पना मूर्त स्वरूपात आली की कलावंतांच्या कल्पनेचे फारसे कौतुक रहात नाही. म्हणूनच बऱ्याचदा काही वेळा डेकोरेटरची कॉंट्रॅक्टमध्ये ठरलेली फी थोडी बुडते. ह्या बाबतीतला एक आणखीन् तापदायक भाग असा की प्रत्येक ग्राहक-व्यक्तीला असं वाटतं की आपल्याला फार उच्च दर्जाचा एस्थेटिक सेन्स आहे. त्याला धक्का न लागू देता, फार काळजीपूर्वक रीतीने डेकोरेटरला आपली आर्टिस्टिक स्कीम पटवून द्यावी लागते. असो. सर्वच धंद्यांत अडचणी तर आहेतच. आमच्या ह्या अशा.

**तुमच्या धंद्यात तुम्ही किती व्यक्तींना पूर्ण वेळ काम दिले आहे?**

सध्या ७ मुली-माझ्याच विद्यार्थिनी-माझ्याकडे बाटिकचे काम पूर्ण वेळ करतात. त्यांना मी रीतसर पगारही देते. त्यांना मी उपजीविकेचे साधन व व्यवसाय देऊ शकले हे मला अभिमानाचे वाटते. आमच्या धंद्यात आम्हाला विशिष्ट कसब व कला येणाऱ्या व्यक्तींनाच घेता येते. फर्निचरची कामे मात्र मी कॉंट्रॅक्टने करवून घेते. पुण्याच्या सुतारांची कारागिरी व क्षमतेबद्दल माझे चांगले मत आहे.

**तुमच्या धंद्यात भांडवल कशा स्वरूपाचे लागते?**

यंत्र व मटेरिअलपेक्षा आम्हाला जरूरशा कलात्मक वस्तू जिथेजिथे आढळतात त्या विकत घेऊन ठेवून आमचा स्वतःचा म्युझियम डेव्हलप करावा लागतो. त्याकरता बरेचसे भांडवल अडकून रहाते. जेव्हा ऑर्डर येईल तेव्हा त्यातल्या काही वस्तू जातात, काही रहातात. परत त्यात भर घालायची. हे रहाट-

गाडगे चालू ठेवावे लागते. धातूपासून बनविलेले जाळीदार टेबललँप, स्टँड, लाकडी कोरीव वस्तू, पुतळे पानदानाचे तऱ्हे-तऱ्हेचे साहित्य, शृंगारपेट्या...एक ना दोन...शेकडो वस्तू खरेदी करून ठेवाव्या लागतात. अर्थात परदेशी लोकांची मागणी आल्यानंतर ह्या वस्तू विकल्यास नफ्याचे प्रमाणही चांगले असते; पण त्यात अडकलेल्या भांडवलाच्या व्याजाचा भाग लक्षात घ्यायला पाहिजेच.

**तुमच्या ह्यापुढच्या योजना कोणत्या ?**

२-३ महिन्यानंतर आम्ही मार्केट रिसर्चकरता युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहोत त्यातून आम्हाला नव्या कल्पना व नवी माहिती मिळेल. तसेच काँट्रॅक्टस होतील व परदेशी मागणी समजावून घेता येईल. तिकडे प्रदर्शने व जाहिरात करण्याचा विचार आहे. तसेच **मध्यमवर्गीय लोकांना 'अंतर्गत सजावट' करून देण्याच्या "स्वस्त जनता योजना" ऑफर कराव्या असा विचार आहे.** थोडक्यात म्हणजे देशात व परदेशांत जास्तीत जास्त मार्केट मिळवण्याचा प्रयत्न करायचा आहे.

**तुम्हाला ह्या धंद्यात समाधान आहे का ?**

मागे वळून पाहिल्यास असे वाटते की एक गृहिणी म्हणून मी फक्त माझे घर सांभाळले असते तर आज वर्षाकाठी सुमारे १०-१२ हजार रुपये जे स्वत: मिळवते ते जमले नसते. इतक्या श्रमिकांना काम देता आले नसते. स्वत:चे व्यक्तिमत्त्व सध्या जे स्वतंत्र विकसित झाले आहे असे वाटते तेही शक्य झाले नसते. धंदा मात्र अजून वाढला पाहिजे असं वाटतं. त्यात समाधान नाही.

पत्ता – डिम्पेक्स इंटर नॅशनल एक्स्पोर्ट व इंटिरिअर डेकोरेटर्स
१, कमलबाग, १०६२ गोखलेरोड, पुणे १६
टेलिफोन – ५४१४६ – कार्यालयीन वेळ – १० ते ५

## मोझांबिक : पृष्ठ ३४ वरून

व आसपासच्या सखल भागात खनिज तेल मिळण्याचाही संभव दिसतो. अलीकडेच बेहराच्या आसपास दोंदोजवळील तेलविहिरीत काही प्रमाणात तेल मिळाले आहे.

मोझांबिकमध्ये कारखानदारीचा विशेष विकास झालेला नाही. येथील कारखाने मुख्यत: शेतमालावर प्रक्रिया करणारेच –कृषिउत्पादनावर आधारलेले–आहेत. हे कारखाने मुख्यत: कानफूमो (लोरेंको मार्क्वेस) हे राजधानीचे शहर व बेहरा या प्रमुख शहरांतच असून त्यात साखर, कापूसजिनिंग, साबण व तंबाखू इ. पदार्थांचेच उद्योग विशेष आहेत. उद्योगधंद्यांसाठी औष्णिक व जलविद्युत उपलब्ध आहे. पूर्वी फक्त एकाच जलविद्युतकेंद्रातून अवघी १३ मेगावॅट वीज मिळत असे; परंतु सबाई धरण झाल्यावर हा पुरवठा वाढला. १९६८ साली हाती घेतलेली झांबेझी नदीवरील धरणयोजना (काबोराबासा) फार मोठी असून तिची विद्युतउत्पादनक्षमता ४००० मे. वॅ. इतकी असून त्यामुळे मोझांबिकच्या उद्योगधंद्यांची खूपच जलद वाढ होण्याची शक्यता आहे. अर्थात यासाठी भांडवल, तंत्रज्ञान व कुशल कामगार हे सुरुवातीस बाहेरून आणावे लागतील. या धरणयोजनेमुळे झांबेझीच्या खालच्या भागातून मुखाशी असलेल्या बंदरापर्यंत जलवाहतूक शक्य होणार असल्याने तिचा खनिज संपत्तीच्या विकासास व निर्याताधिष्ठित शेतीसही फार उपयोग होणार आहे.

मोझांबिकमध्ये पोर्तुगीज सत्ता होती. त्यामुळे (आपल्याकडील गोव्यापूर्वीच्या चलनाप्रमाणे) इस्कूडो हे चलन वापरात आहे. १ इस्कूडोची किमत आपल्या २० पैशांइतकी असते.

साधारण वेतन प्रमाण :

शेतमजूर : २०–२५ इस्कूडो रोज.

| | | |
|---|---|---|
| कारखान्यातील कामगार | १५०० ते २००० इस्कूडो | मासिक. |
| कारकून | ८०० ते १००० इस्कूडो | मासिक. |
| शाळेतील शिक्षक | ८०० ते १००० ,, | ,, |
| प्राध्यापक | २००० – ४००० ,, | ,, |

मोझांबिकच्या इतिहासाचे व आर्थिक विकासाचे अवलोकन केले तर पोर्तुगीज व इतर युरोपीय सत्ताधाऱ्यांच्या वसाहती करणातील फरक लक्षात येतो. पोर्तुगीजसत्ता किनाऱ्यालगतच स्थिर होती. त्यांची सत्ता अंतर्भागात फार काळपर्यंत जाऊ शकली नव्हती. चार शतके राज्य करूनही हा प्रदेश त्यांच्या राजवटीत त्या मानाने अगदी अलीकडील काळापर्यंत फारच उपेक्षित होता. धर्मविस्ताराचे व पोर्तुगिझीकरणाचे जोरदार प्रयत्न करूनही फारच थोड्या प्रमाणात लोक 'अॅसिमिलादो' झाले.

परकीय सत्तेखाली असताना मोझांबिकचा विकास सत्ताधाऱ्यांच्या सोयीप्रमाणे व त्यांच्या फायद्याच्या दृष्टीने होत होता; परंतु नव्या राष्ट्रवादी आफ्रिकेतील एक स्वतंत्र घटक म्हणून यापुढे इतर विकसित स्वतंत्र राष्ट्रांच्या मदतीने मोझांबिकचा विकास अधिक जलद होण्याची शक्यता आहे.

**[कोंताल अंतोनिओ मानदाया ह्या मोझांबिकमधील पुण्यात आलेल्या विद्यार्थ्याने वेतन व चलन याविषयी दिलेल्या माहितीबद्दल लेखक मन:पूर्वक आभारी आहे.]**



एक प्रमुख जागतिक प्रश्न

# नैसर्गिक तेल व आर्थिक गळचेपी


**डॉ. बी. जी. देशपांडे**

प्रमुख, भूशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ


आधुनिक शेती व कारखानदारीचा प्राण असणारी इंधनशक्ती उपलब्ध होण्यात तूर्तास कोणत्या अडचणी आहेत ह्याची भूशास्त्रीय माहिती, आर्थिक दृष्टिकोनाने समजावून घेण्याकरता प्रस्तुतचा लेख डॉ. देशपांडे ह्यांचेकडून विशेष प्रयासाने लाभला आहे. विद्यापीठात येण्यापूर्वी डॉ. देशपांडे हे जिऑलॉजिक सर्व्हे ऑफ इंडिया, दि इंडियन ब्यूरो ऑफ माइन्स व ऑइल अँड नॅचरल गॅस कमिशन ह्यामध्ये भूशास्त्र–तज्ज्ञ म्हणून काम करीत होते. भारतातील अनेक तेलसाठ्यांचे संशोधन त्यांच्या मार्गदर्शनानुसार झाले आहे. तेलाप्रमाणे पाणी हाही त्यांचा संशोधनाचा व अभ्यासाचा विषय आहे. सदर लेख विशेषतः उद्योगयोजकांना संग्रही ठेवावासा वाटेल.

६ ऑक्टोबर १९७३ हा जगाच्या इतिहासात एक गाजलेला दिवस म्हणून मानता येईल. त्या दिवशी सर्व जगभर खळबळ उडवून देणारी एक घटना झाली. इसराइल लोक आपला 'योम किपूर' हा जूनचा विमुक्तिदिन साजरा करण्यात गर्क झाले होते. नेमक्या याच संधीचा फायदा घेऊन प्रे. सादत यांनी आपली फौज सुवेज कालव्याच्या पलीकडे पाठविली. सन १९६७ च्या लढाईत इसराइलने काबीज केलेला आपला प्रांत परत मिळविण्याच्या इरादाने ही तयारी होती. किसिंजर यांची शिष्टाई चालूच होती. इजिप्तचे प्रतिनिधी वॉशिंग्टनमध्ये इजिप्त–इसराइल लढ्याबद्दल किसिंजर यांच्या दालनात विचारविनिमय करत होते. सौदी अरेबियाचे राजे फैजल किसिंजर यांना धमकीवजा सूचना देत होते की जर इसराइल युद्धविरामास तयार होत नसेल तर मध्यपूर्वेत आतापर्यंत गुप्त असलेला ज्वालामुखी प्रज्वलित होईल आणि त्याची झळ केवळ मध्यपूर्वेतच लागणार नाही तर सर्व जगावर त्याचा परिणाम होईल. किसिंजर तटस्थ राहिले किंवा ते इसराइलला लढाईपासून परावृत्त करू शकले नाहीत. युद्धाची ठिणगी पेटली पण हे युद्ध मैदानात न होता ते सर्व जगाची नाकेबंदी करू शकेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती.

मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांत अशी काय किमया आहे की त्याना जगाची नाकेबंदी करता येईल? **आज इंधन हे ऊर्जेचे महत्त्वाचे अंग आहे.** इंधनाशिवाय सर्व राष्ट्रांच्या नाड्या आवळतील–युद्धेही बंद होतील. इंधनाशिवाय कारखाने बंद होतील, चलनवलन बंद होईल, शेतीच्या उत्पादनाला आळा बसेल, बोट–रेल्वे–विमानवाहतूक थांबेल. व्यवहार मंदावतील, काही थंडावतील. असे हे विश्वव्यापी इंधन म्हणजे प्रामुख्याने नैसर्गिक तेल व वायू. नैसर्गिक वायू बहुतेक जागच्या जागी किंवा जवळपासच वापरला जातो. तेल मात्र पृथ्वीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत वाहून नेले जाते आणि मगच त्याचा उपयोग केला जातो. तेल हे द्रव असल्यामुळे नळांतून किंवा पाइपलाइनमधून त्याची वाहतूक सहज होऊ शकते. कोळशाप्रमाणे रेल्वेने अथवा रस्त्याने ते न्यावे लागत नाही. त्यामुळे तेलवाहतूक स्वस्त, सुकर व जलद होते. कोळशात १०–१५ टक्के तरी राख निघते. तेलाचा शेवटचा थेंबही उपयोगास येतो. तेलाची उष्णता–क्षमता कोळशापेक्षा अनेक पटींनी जास्त असते. एकूण तेलाचा उपयोग फारच झपाट्याने वाढत आहे.

जगातील ऊर्जावापराचा समतोल (World Energy Consumption Balance) खालील तक्त्यावरून सहज लक्षात येईल.

| ऊर्जा | १९५० | १९६० | १९७० | १९८० |
|---|---|---|---|---|
| तेल आणि वायू | ३६·२% | ४५·६% | ६२·०% | ७०·५% |
| कोळसा | ६२·२% | ५२·२% | ३०·६% | २१·०% |
| ॲटॉमिक ऊर्जा | – | – | ०·६% | ३·४% |
| वीज | १·६% | २% | ५·८% | ५·१% |

आज सर्व ऊर्जांत तेलाचे प्रमाण शेकडा ६५ च्या वर आहे. तर ते १९८० साली ७० च्याही वर जाईल अशी अपेक्षा आहे. कदाचित २००० सनापर्यंत याहून जास्त प्रमाणात

तेलाचा वापर होईल. अशा या विश्वव्यापी तेलाचे रूपरंग, गुणधर्म, उत्पादन आणि त्याचे साठे याबद्दल कुतूहल निर्माण होणे साहजिक आहे. त्याचप्रमाणे त्याचा शोध कसा लावतात व त्याच्या उत्पादनात काही आर्थिक स्वरूपाचे धोके आहेत काय वगैरे गोष्टींचा ऊहापोह होणे आवश्यक आहे.

अशा या विश्वव्यापी तेलाचे रहस्य आहे तरी काय ? तेल हे पृथ्वीच्या स्तरात खोलवर मिळणारे एक खनिज आहे. ते रासायनिक दृष्टया 'अनुविद्ध उदांगार' (Saturated Hydra-Carbon) या मालिकेत गणले जाते. सर्वसाधारण मधाच्या रंगाचे किंवा त्याहून थोडे जास्त काळपट रंगाचे ते असते. जवळजवळ मधाप्रमाणेच जडप्रवाही असते. पाण्यापेक्षा हलके असल्यामुळे (दाढर्च ०·७ ते ०·९९) ते पाण्यावर सहज तरंगते. एकाच वर्गातल्या अनेक रसायनांचे ते एक मिश्रण आहे. निसर्गात जमिनीमध्ये असताना त्यात त्याच रसायन-मालेचा वायू (मिथन इथेन) मिश्रित असतो. सोडावॉटरमध्ये ज्याप्रमाणे कार्बन डाय ऑक्साइड गॅसमिश्रित असतो, अगदी त्याचप्रमाणे सोडयाच्या बाटलीचे बूच उघडताच ज्याप्रमाणे तो वायू अलग होतो, उडू लागतो त्याचप्रमाणे नैसर्गिक तेलात विलीन असलेला वायू दाब कमी होताच अथवा उष्णतामान वाढताच अलग होतो. म्हणजे तेल खालून वर येत असतानाच तेल व वायू अलग होतात. हा वायूही रासायनिक दृष्टया त्याच मालेतील असून तोही एका मिश्रणाच्या स्वरूपात असतो. या लेखात वायूचा विचार नाही.

नैसर्गिक तेल व वायू हे दोन्ही दहनशील असून ज्वालेचा स्पर्श होताच ते पेट घेतात. तेल उघडे राहिल्यास त्यातून सतत थोडाफार वायू हवेत उडून जातो. त्यामुळे तेलाचे सर्व व्यवहार आगीच्या दृष्टीने सुरक्षित असावे लागतात. तेल व वायूही इंधन म्हणून वापरले जातात. मात्र तेल असते त्याच स्थितीत न वापरता त्याचे संस्करण अथवा परिष्करण (Refining) करून त्याचे निरनिराळे अवशेष निरनिराळ्या पद्धतीने इंधन म्हणून वापरले जातात. तेल व तेलाचे अवशेष ही अत्यंत प्रभावी इंधने होत. तेलातील जड अथवा थोडा घट्ट भाग वंगण म्हणून वापरले जातात तर शेवटचा अवशेष मेणाचा असतो.

## पृथ्वीच्या पोटात तेल बनते कसे ?

पृथ्वीतलावरील तेलाचे साठे आता कानाकोपऱ्यांतही मिळाले आहेत. त्या सर्वांची बारकाईने पाहणी करून काही सिद्धान्त बसविण्यात आले आहेत. व्यापारीरूपाने म्हणजे ज्या साठयातून लाखो टन तेल काढले आहे व काढले जात आहे त्यावरून नैसर्गिक तेल हे अवसादी खडकात म्हणजे समुद्र-तळाशी साठलेल्या किंवा बनलेल्या खडकातच विशेषेकरून सापडते. तेलाच्या सान्निध्यातल्या खडकांचा—प्रस्तरांचा—विशेष सखोल अभ्यास करून आता असे सिद्ध झाले आहे की तेल हे प्राण्यांच्या तसेच वनस्पतींच्या अवशेषांतून बनले आहे. या सिद्धान्ताला अपवाद फारच थोडे आहेत. तेलाच्या संशोधनात या अपवादांचा क्वचितच विचार केला जातो.

करोडो वर्षांपूर्वीचा पृथ्वीचा इतिहास हा आता स्पष्टपणे उमगला आहे. सूर्याची उष्णता, हवा, पाणी यांच्या सहाय्याने खडकांची धूप होऊन ते रेती व मातीच्या रूपाने नद्यांतून समुद्रात जातात. समुद्रतळी वर्षानुवर्षे ही गाळ साठण्याची क्रिया चालू राहिल्याने थरावर थर निर्माण झाले. हे थर निर्माण होत असतानाच, त्या त्या वेळी समुद्रतळावर तसेच समुद्रात संचार करणारे प्राणी आणि वनस्पती हीही काल-वशात मरून समुद्रतळाशी जात व त्या स्तरांमध्ये समाविष्ट होत. थरावर थर-वाढताच वरील थराचा भार खालच्या स्तरांवर वाढू लागला. वाढत्या भाराबरोबरच उष्णताही वाढू लागली, या प्राणिमात्रांचे व वनस्पतींचे गाडले गेलेले अवशेष वाढत्या दाबांबरोबर व वाढत्या उष्णतेबरोबर पृथक्करण होऊन अनेक रासायनिक स्थित्यंतरांतून शेवटी तेल निर्माण झाले. या क्रियेला लाखो वर्षांचा अवधी लागला असावा असा अंदाज आहे. साधारणपणे १० लाख वर्षांचा कालावधी तर खासच लागला असावा.—अर्थात् परिस्थितीनुरूप यापेक्षा कमी कालावधीतही तेलाची निर्मिती झाल्याची उदाहरणे उपलब्ध आहेत; परंतु ती अपवादात्मक अथवा अनपेक्षित परिस्थितीतच.

जगातील तेलाचे उत्पादनही झपाटयाने वाढत आहे हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

| देश | १९७३ चे उत्पादन ( हजार टनांत ) |
|---|---|
| उत्तर अमेरिका | ६१४,४३५ |
| कॅरिबिअन | १९५,४६६ |
| लॅटिन अमेरिका | ७५,७९६ |
| मध्यपूर्व | १,०५९,२५४ |
| आफ्रिका | २८७,६८६ |
| युरप | १५,४४२ |
| दूर पूर्व | १०९,८९६ |
| पूर्व युरप आणि चीन | ४९६,८२२ |
| सर्व जग | २,८४७,७९८ |

जवळजवळ ३ अब्ज टनांचे उत्पादन आजमितीस होत आहे. त्यातील अरब राष्ट्रांचा वाटा जवळजवळ ½ पेक्षा जास्त आहे.

११ ऑक्टोबर १९७३ या दिवशी इसराइलांनी बनियास येथे अरबांच्या १२ तेलवाहू जहाजांना आग लावून दिली. या कृत्याचा सर्वत्र निषेध झाला. इसराइलांचा संताप वाढतच होता. इसराइली गुप्तवार्ताखात्याचे धुरीण जनरल आरन यारीव म्हणाले, 'ही लढाई थोडक्यात संपणार नाही. आम्ही शत्रूचा धुव्वा उडवू.' वगैरे. ऑक्टोबर १३ रोजी इसराइलांची सुवेज कालव्यावरील हुकमत अरबांच्या ताब्यात गेली. अमेरिकेने आणखी युद्धसामुग्री इसराइलकडे पाठवली. १५

ऑक्टोबरला प्रे. निक्सन यांनी फौजा पाठवण्याचाही धाक घातला. रशियनांनी अरबांना विमानाने शस्त्रास्त्रे पाठविली. त्याला शह म्हणून अमेरिकेने इसराइलांना शस्त्रास्त्रे नव्याने पुरविण्यास सुरुवात केली. ऑक्टोबर १९ रोजी अमेरिकेच्या कॉंग्रेसने २२० कोटी रुपयांचे तातडीचे कर्ज इसराइलला देण्याचे ठरविले. अरब–इसराइल या लढयाला जास्त व्यापक स्वरूप येऊ लागले.

तेलाची एक बॅरल काढण्यास केवळ २० सेंटस् (रु.१·६०) लागतात, तर बाजारात बॅरलची किंमत ११ डॉलर (रु. ९०) झाली. यांत विक्रेत्याचा नफा केवळ ८० सेंटस् (रु. ६) आहे तर, बाकीचा नफा सरकारजमा आहे. सरकारदरबारी जाणारा नफा हा राजकीय स्वरूपाचा आहे. तो सर्वसाधारण भाववाढीचा परिणाम म्हणून नाही. तेव्हा या अवास्तव भाववाढीत सुमारे ९ टक्केच केवळ सार्वत्रिक भाववाढीचा परिणाम तर ९१ टक्के अरब–इसराइल लढयामुळे निर्माण झालेली राजकीय परिस्थिती कारण आहे. केवळ आर्थिक परिस्थितीमुळेच भाववाढ झाली हा काही अरब राष्ट्रांचा दावा फोल ठरला.

अरब-इसराइल युद्धात तेलाचा समावेश प्रथम इराक या राष्ट्राने केला. ऑक्टोबरच्या ७ तारखेस इराकने एक्सन आणि मोबील या दोन अमेरिकन कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले. या कंपन्यांचे शे. २४ टक्के भांडवल बसरा तेलकंपनीत गुंतले होते. लवकरच त्यांनी एका डच कंपनीचीही तीच विल्हेवाट लावली. ऑक्टोबरच्या ८ तारखेस आरामको या तेलकंपनीने सौदी–अरेबियाच्या भूमध्य समुद्राला जाणाऱ्या पाइपलाइन-मधून वाहणाऱ्या तेलाची ५० टक्क्यांनी कपात केली. लढाईत या पाइप लाइनीवर परिणाम झाल्यास आपले नुकसान कमी व्हावे म्हणून ही काळजी घेण्यात येत आहे असे सांगण्यात आले. ऑक्टोबर १७ रोजी ओपेक "Organisation of Petroleum Exporting Countries" या संस्थेचे सदस्य असणाऱ्या ६ अरब राष्ट्रांनी घोषणा केली की तेल–युद्ध हे दोन आघाडींवर लढविण्यात येईल–तेलाच्या किंमतीत वाढ व उत्पादनात कपात. सुरुवातीस दरमहा केवळ ५ टक्क्यांनी कपात करण्याचे ठरले. या मार्गाने तरी इसराइल १९६७ मध्ये आक्रमण केलेला अरबांचा प्रदेश परत देईल अशी अपेक्षा होती. अरबांच्या मित्रदेशांना मात्र या तेलयुद्धाची झळ लागणार नाही अशी खबरदारी घेण्याचे अरबांनी जाहीर केले. या लढाईत मध्यपूर्वेतील दहा अरब राष्ट्रे सामील झाली.–सौदी अरेबिया, इराक, कुवाईट, अबुधाबी, काटर, लिबिया व अल्जेरिया. यांतीलच काही राष्ट्रांनी ५ टक्क्यांची कपात १० टक्क्यांवर आणली. १–२ महिन्यांतच मध्यपूर्वेतून जाणाऱ्या तेलाची निर्यात १३·८ टक्क्यांनी कमी झाली.

तेलाचे उत्पादन आणि निर्यात कमी होताच त्याचा परिणाम भाववाढीत झाला. तेल आयात करणाऱ्या देशांत तेल मिळविण्यासाठी आपापसात चढाओढ सुरू झाली. विक्रेत्याला निरनिराळया तऱ्हेने आमिष दाखविण्यातही स्पर्धा सुरू झाली आणि तेलयुद्धाला ऊत आला. तेलाचा भाव १·३० डॉलर होता (१९७०) तो आता ११ डॉलर झाला (१९७४). याचे परिणाम आज जगभर दिसत आहेत. या भाववाढीमुळे तेल कोणाला विकावयाचे हे ठरविण्याचा हक्क सर्वस्वी उत्पादन करणाऱ्यांकडेच आहे. त्यामुळे नजरेस न पडणाऱ्या अनेक घडामोडी आज चालू आहेत आणि जगाचे नैतिक वातावरण ग्रसरतच चालले आहे.

अरब राष्ट्रांच्या हातांत जगाची नाकेबंदी करण्याची ताकत आलीच कशी असा सर्वसाधारण माणसाच्या मनात विचार येणे साहजिक आहे. निसर्गाने अरब राष्ट्रांवर या खनिज संपत्तीची खैरात केली आहे असे वाटते. सर्वसाधारणपणे अरब देशातील तेल बऱ्या दर्जाचे आहे. त्यात गंधकाचे प्रमाण काही ठिकाणी बरेच कमी आहे. गंधक हे अनेक प्रकारे गैरसोयीचे असल्याने जितके गंधक कमी तितका तेलाचा भाव जास्त; त्याचप्रमाणे जितके तेल पातळ किंवा हलके तितका त्याचा भाव जास्त. या लढयात भाववाढ इतकी भरमसाठ झाली आहे कीं तेलाच्या प्रतीचा विचार करण्यास सवड नाही. मात्र प्रत्येक तेल त्या त्या विशुद्धीकरण कारखान्यात ( Refinery ) योग्य असेच असले पाहिजे. नाही तर त्याचे विशुद्धीकरण करता येणार नाही.

मध्यपूर्वेतर तेलक्षेत्रांची उत्पादनक्षमता सरासरीने दर विहिरीस रोजी ४०–५० बॅरल (सुमारे ४० गॅलनची बॅरल) इतकी असते तर अरबांच्या विहिरींची उत्पादनक्षमता सरासरीने रोजी ५००० बॅरल असू शकते. इराकमधील कांही विहिरींचे उत्पादन रोजी १३००० बॅरल म्हणजे सुमारे १८००० टन तर इराणमध्ये १५५०० बॅरल म्हणजे २,२०० टन आहे. अरबांच्या विहिरींची सरासरी खोली १०,००० फुटांपर्यंत असते तर इतरत्र २५००० फुटांपर्यंत खोदून तेलाचे उत्पादन करावे लागते. त्यामुळे अर्थातच अरब देशांना तेल उत्पादनाचा खर्च फारच कमी येतो.

याच प्रमाणात अरबांचे तेलाचे साठेही तसेच जबरदस्त आहेत. नुकत्याच टोकियो येथे झालेल्या जागतिक पेट्रोलियन कॉंग्रेसमधील अधिकृत लेखाच्या आधारे याबाबतची परिस्थिती अशी आहे.

**जगातील तेलाचे निश्चित झालेले साठे**
**(अब्ज मेट्रिक टनामधे)**

| देश | साठे |
|---|---|
| रशिया व चीन | ८·८ |
| उत्तर अमेरिका (अमेरिका व कॅनडा) | ६·१ |
| मध्यपूर्व | ४३·१ |
| इतर देश (नॉर्थ सी, युरोप, लॅटिन अमेरिका, इंडोनेशिया वगैरे) | १६·५ |
| एकूण | ७४·५ |



अ॰

एकूण जगातील तेल साठ्यापैकी जवळजवळ ६० टक्के तेल मध्यपूर्वेत आहे. त्यात इराणचाही समावेश आहे. इतर सर्व साठे निरनिराळ्या देशांत विखुरलेले आहेत. अरब राष्ट्रे भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती आहेत त्यामुळे तेलाच्या वाहतुकीवर त्या मानाने कमी खर्च येतो. सुवेज खुला झाल्यामुळे यात अधिकच भर पडली आहे.

तेलाचे साठे, उत्पादन, तेलाचा दर्जा, मध्यवर्ती स्थान व सर्वसाधारण एकी या सर्व कारणांमुळे आज अरब राष्ट्रे एकवटून जगावर प्रभुत्व गाजवीत आहेत. परंतु ही परिस्थिती अशीच चालू राहील असे धरून चालण्याचे कारण नाही. या अनिर्बंध भाववाढीमुळे जगातील इतर देश आता जागे झाले आहेत. बहुतेक सर्व देशांत जारीने नवीन तेलसाठे शोधण्याचे प्रयत्न चालू आहेत व त्यांतील अनेकांना गेल्या २–३ वर्षांत बरेच यश आले आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या साठ्यांतूनही जास्तीत जास्त प्रमाणात तेल कसे बाहेर काढता येईल यावरही विशेष भर दिला जात आहे. काही वर्षांपूर्वी जमिनीतील साठ्यांतील शे. ६०–६५ टक्के तेल बाहेर काढू शकत होते. हे प्रमाण आता बरेच वाढले आहे. शे. ७०–८० आणि क्वचित ठिकाणी ९० टक्क्यांपर्यंत तेल बाहेर काढण्याची शक्यता दिसत आहे. त्यामुळे सध्याच्या साठ्यांतूनही जास्त उत्पादन होऊ शकेल, होत आहे. याचप्रमाणे जमिनीवर असलेले तेलसाठ्यांचे इतर प्रकार म्हणजे डांबरयुक्त वाळू (Tar Sands) आणि तेलयुक्त शेलखडक, (Oil Shales). या साठ्यांतून आतापर्यंत तेल काढण्याला तांत्रिक अडचणी होत्या. तेलाचा भाव बॅरलला १·३० डॉलर असताना या वाळूतून किंवा शेलखडकांतून तेल काढणे अती खर्चाचे होते. परंतु आता मात्र ते तेल बाहेर काढणे अनेक कारणांनी सुकर झाले आहे, आवश्यकही झाले आहे. अशा तऱ्हेने तेलउत्पादन करून त्याचे विशुद्धीकरणाचे कारखाने नुकतेच सुरू झाले आहेत व एकूण तेलाच्या उत्पादनात अशी वाढ खूप झाली आहे.

बहुतेक सर्व देश आपापल्या उत्पादनाचे किंवा साठ्यांचे खरे आकडे बाहेर जाऊ देत नाहीत. जी आकडेवारी दिली जाते ती बहुतेक राजकीय दृष्टिकोनातून दिली जाते. त्यामुळे खरी परिस्थिती काय आहे हे कळणे दुरापास्त आहे. तरीसुद्धा इतर देशांत तेलाचे उत्पादन वाढत आहे हे मात्र निश्चित, तेव्हा मध्यपूर्वेची ही मक्तेदारी फार काळ टिकेलच असे नाही.



संदर्भ—

1. The oil crisis, 1974 ( S. Chand Ltd. )
2. Oil statistics, 1974 (Petroleum Information Service )
3. Irak Oil–Ministry of Oil & Minerals, Govt. of Iraq. N. Delhi.
4. Arab oil reservoirs, by Dr. Sami Shareet, INOC Publications, Baghdad.
5. World Petroleum Congress, 1975 Panel Discussion, Tokyo, Japan.


## शेतमालाच्या किंमती

पृष्ठ १० वरून

सर्वसामान्य चलनवाढ हीच खरी डोकेदुखी आहे. अशा परिस्थितीत उपभोक्त्यांनाच संरक्षणाची गरज आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या देशातील किंमतीविषयक धोरणासारख्या सरकारी धोरणाचे निमंत्रण जाणवते. त्यामुळे शेतीमालाच्या भावांना आवर घालण्याची (सरकारी किंवा उपभोक्त्यांची) तिडीक कमी होईल आणि तरीही हंगामाचा बरेवाईटपणा राहीलच. सरकारला तुल्यतेच्या तत्त्वावर आधारित असे धोरण आखता येईल आणि खरेदी-विक्रीचा अंतिम हक्क ठेवून खुल्या बाजारात खरेदी करता येईल. या दोहोंतील कुठल्याही पद्धतीनं स्वस्त किंमतीच्या दुकानातून विकण्यासाठी किंवा संकटकालानिमित्त साठा करण्यासाठी आवश्यक तेवढा आणि भरपूर माल मिळविणं फारसं कठीण जाऊ नये. सरकारी खरेदीचे, खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा फारसे कमी नसलेले भाव ठरल्यास स्वस्त किंमतीच्या दुकानातून अन्नधान्य घेणाऱ्या उपभोक्त्यांनिमित्त होणाऱ्या खर्चाचा काही वाटा अन्नधान्य उत्पादकांना आणि काही खुल्या बाजारातील उपभोक्त्यांना उचलावा लागेल. अंतिम हक्कानुसार (सरकारला) खरेदी करावी लागल्यास हा खर्च सर्वसामान्य करदात्याला उचलावा लागेल. सर्वसामान्य चलनवाढीला एकदा आळा घातल्यावर, अशा प्रकारच्या शेतमालाच्या किंमतीविषयक प्रस्तावांची चर्चा होऊन धोरण आखता येणं तेव्हा सहज शक्य होईल.



# अर्थशास्त्रीय परिभाषेचा प्रश्न

**श्रीपाद जोशी**

श्रीपाद जोशी ह्यांचा परिचय नव्याने करून देण्याची गरज नाही. देशभरच्या साऱ्या भिन्न भाषा बोलणाऱ्या रसिक, साहित्यप्रेमी व चिकित्सक वाचकांना त्यांच्या साहित्याची ओळख आहे. त्यांना अनेक भाषा नुसत्या ज्ञात आहेत असे नसून त्या भाषेत ते उच्च दर्जाचे साहित्य लिहीत असतात. त्यांतल्या-त्यात उर्दू, पर्शियन, बंगाली, अस्सल मराठी, हिंदी ह्या भाषांचा त्यांचा व्यासंग अजोड आहे. गोखले अर्थशास्त्र संस्थेत सादर केलेल्या त्यांच्या निबंधावरून खालील लेख मुद्दाम संक्षेपित करून घेतला आहे.
विशेषतः अर्थशास्त्र विषयावरचे लेखक, प्राध्यापक, व्याख्याते, संशोधक, भाषातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी व जिज्ञासू वाचक ह्यांना परिभाषेचा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. भिन्न लेखकांनी समानार्थी शब्दांना वेगवेगळ्या संज्ञा वापरल्याने विद्यार्थ्यांच्या व सर्वसामान्य वाचकांच्या मनाचा गोंधळ उडतो. म्हणून अचूक शब्दांचा वापर झाला पाहिजे. अर्थशास्त्राच्या पाठ्य पुस्तकात वापरल्या गेलेल्या मराठी शब्दांचा इतका घोळ आहे की प्रश्नपत्रिकेत एखादा मराठी शब्द वापरल्यास कंसात त्याला इंग्रजी शब्दाची कुबडी घ्यावीच लागते. तेव्हा पाठ्यपुस्तके लिहिताना वाचकास सुबोध वाटतील तसेच यथार्थ व योग्य असतील अशा संमत शब्दांचा वापर व्हावा ही अपेक्षा करणे जरुरीचे झाले आहे. ‘ अर्थ ’ सारखी मासिके, इतर वृत्तपत्रे, आकाशवाणी व चित्रवाणी ह्या सर्व माध्यमांना अशा संमत, सुबोध, बिनचूक व आकलनास सहजसाध्य आर्थिक परिभाषेची आज नितांत गरज भासते आहे. ह्या लेखाने ह्या महत्त्वाच्या विषयाला चालना मिळेल असे वाटते.

---

अर्थशास्त्र हा विषय आपल्याला तसा काही अगदीच नवा नाही. जुन्या काळी या विषयासंबंधी थोडेफार चिंतन झाले असावे, असे दिसते; परंतु आधुनिक अर्थशास्त्रातील अनेक संकल्पना सर्वस्वी नवीन आहेत आणि अर्थव्यवहार हा अलीकडील काळात जणू सर्वव्यापी बनला आहे. त्यामुळे त्याचा व्याप व विस्तारही खूप वाढला आहे. कालक्रमानुसार अर्थशास्त्राच्या मांडणीतही खूप क्लिष्टता, सूक्ष्मता व विविधता आलेली आहे. त्यामुळे एका अर्थाने आधुनिक अर्थशास्त्र हे भारतीय लोकांना सर्वस्वी नवे वाटत असल्यास आश्चर्य नाही.

अर्थशास्त्र हे जीवनव्यापी बनल्यामुळे त्याचे ज्ञान साऱ्या जनतेला किंवा निदान सर्व सुशिक्षित समाजाला असणे अपरिहार्य झाले आहे. आजपर्यंत भारतात अर्थशास्त्राचे ज्ञान इंग्रजी भाषेच्या द्वारे देण्यात येत होते; परंतु इंग्रजी ही मूठभर लोकांपुरतीच मर्यादित राहिल्यामुळे हे ज्ञानही फार थोड्या लोकांपुरते मर्यादित राहिले. आता इतर **ज्ञानशाखांप्रमाणे अर्थशास्त्राचे ज्ञानही सामान्य सुशिक्षितांपर्यंत नेऊन पोचविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. विद्यार्थ्याला त्याच्या मातृभाषेतून ज्ञान दिले गेल्यास ते अधिक सहजपणे व चांगल्या प्रकारे त्याला आकलन होऊ शकते.** यामुळे अर्थशास्त्राचे ज्ञानही प्रादेशिक भाषांतून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांचा प्रारंभ महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकांच्या द्वारे झाला आहे, ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. अन्य भारतीय भाषांप्रमाणे मराठीतही अर्थशास्त्राची प्रारंभिक ओळख करून देणारी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. महाविद्यालयांत व विद्यापीठांत अर्थशास्त्राचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनीच प्रामुख्याने ती लिहिली असल्यामुळे विद्यार्थ्यांची धारणाशक्ती लक्षात घेऊन ती लिहिली असली पाहिजेत असे गृहीत धरण्यास हरकत नाही.

अर्थशास्त्रावरील ही पुस्तके सामान्यतः गेल्या दहा वर्षांत लिहिली गेली आहेत; परंतु सुमारे शंभर वर्षांपूर्वी असाच एक प्रयोग मराठीत झाला होता, हे आपल्यापैकी अनेकांना माहीत नसेल. **इ. स. १८४३ ते १८५५ या कालखंडात सर्वश्री रामकृष्ण विश्वनाथ, लोकहितवादी, हरि केशवजी व कृष्णशास्त्री चिपळोणकर** यांनी लिहिलेल्या चार लहानमोठ्या अर्थशास्त्रीय ग्रंथांचे संपादन प्रा. दि. के. बेडेकर यांनी केले असून 'चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ' या नावाने गोखले अर्थशास्त्र संस्थेने ते अलीकडेच (१९६९ साली) एकत्रित प्रकाशित केले आहेत. भारतीय भाषांतून आधुनिक ज्ञान जनतेपर्यंत नेऊन पोचविण्याच्या ब्रिटिश सरकारच्या धोरणानुसार हे ग्रंथ लिहिले गेले होते. हे धोरण कायम राहिले असते तर अर्थशास्त्रीय परिभाषेचा जो प्रश्न आज उपस्थित झाला आहे तो त्याच वेळी सुटला असता आणि भारतीय भाषांमध्ये अर्थशास्त्रासंबंधी मौलिक चिंतनही प्रकट होऊ लागले असते; परंतु त्या वेळच्या सरकारने आपले धोरण लौकरच बदलले आणि सारे शिक्षण इंग्रजीतूनच द्यावयाचे ठरविले. **त्यामुळे भारतीय भाषांच्या शास्त्रविषयक आधुनिकीकरणाची जी प्रक्रिया त्या वेळी सुरू झाली होती ती खंडित झाली.** आता स्वातंत्र्योत्तर काळात ती पुनः चालू झा ली आहे. मध्यंतरीच्या शंभर वर्षांत अर्थशास्त्रासंबंधी भारतीय भाषांतून ग्रंथलेखन फारच तुरळक झाले. मात्र नियतकालिकांतून लेखरूपाने व बातम्या, संपादकीय टिपण्या वगैरे स्वरूपात अर्थशास्त्राचा परामर्श घेतला जात होता. त्यामुळे अर्थशास्त्राची एक स्वयंभू परिभाषा आपोआपच तयार होत गेली. अर्थात् ही परिभाषा स्थूल विषयांपुरतीच मर्यादित राहणे स्वाभाविक होते. सूक्ष्म व तपशीलवार अध्ययनाला ती पुरेशी ठरणारी नव्हती. त्यामुळे अर्थशास्त्राचे अध्ययन व ग्रंथलेखन सुरू झाल्यानंतर परिभाषेच्या बाबतीत एक प्रकारचे अराजक निर्माण झाले. वाचकांना या अराजकाची कल्पना यावी यासाठी आम्ही मराठीतील काही नवीन पुस्तकांतून अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द निवडून त्यांची तुलनात्मक सारिणी तयार केली आहे. या सारिणीसाठी आम्ही निवडलेली पुस्तके पुढीलप्रमाणे आहेत :

(१) **चार जुने मराठी ग्रंथ :** (१८४३–१८५५) ले. रामकृष्ण विश्वनाथ; लोकहितवादी; हरि केशवजी; कृष्णशास्त्री चिपळोणकर. सं. प्रा. दि. के. बेडेकर. प्र. गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे; १९६९.

(२) **अर्थशास्त्रपरिचय :** ले. प्रा. व. गो. सहस्रबुद्धे; प्र. पुणे विद्यापीठ, १९५८ (दु. आ. १९६०) (२ अ) देशोदेशांचा आर्थिक इतिहास ' प्र. अ. वि. गृह. पुणे. १९६०

(३) **आधुनिक अर्थशास्त्र :** ले. प्रा. भा. शं. भणगे; प्र. जोशी आणि लोखंडे, पुणे १९५९ व १९६४.

(४) **आधुनिक अर्थशास्त्राची मूलतत्त्वे :** (भाग १ व २) ले. प्रा. रा. म. गोखले; प्र. कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे; १९६१ (ति. आ. १९६६)

(५) **अर्थशास्त्रविचार :** ले. प्रा. दि. ब. केरूर; प्र. व्हीनस प्रकाशन, पुणे; १९६७.

(६) **अर्थशास्त्र** (भाग २) : ले. प्रा. स. श्री. मु. देसाई; प्र. ओरिएंट लॉंगमन्स, मुंबई; १९६९.

(७) **अर्थसिद्धान्त : काही चिकित्सक निबंध :** ले. प्रा. नी. वि. सोवनी; प्र. देशमुख आणि कंपनी, पुणे; १९७१.

जे पारिभाषिक शब्द मराठीत सामान्यतः रूढ झाले आहेत व ज्यांचा वापर बहुतेक सर्व लेखकांनी केला आहे अशा शब्दांचा समावेश या सारिणीत नाही. केवळ ज्यांच्या बाबतीत मतभिन्नता आढळली अशाच शब्दांचा समावेश या सारिणीत केला आहे. स्तंभ ८ मध्ये आम्ही आमच्या पसंतीचा पारिभाषिक शब्द दिला आहे. खालील सारिणीत वानगीदाखल काही थोडे शब्द व त्यांचे पर्यायी शब्द घेतले आहेत.

| मूळ इंग्लिश शब्द व रामकृष्ण विश्वनाथ इ. चे प्रतिशब्द (१८४३–१८५५) | भणगे (१९५९) | गोखले (१९६१) | केरूर (१९६७) | देसाई (१९६९) | पसंती |
|---|---|---|---|---|---|
| Adverse balance of trade | | | प्रतिकूल व्यापार शेष | प्रतिकूल व्यापार तोल | प्रतिकूल व्यापार शेष |
| Balance of trade | आंतरराष्ट्रीय व्यापार तुला | व्यापार शेष | व्यापार शेष | आंतरराष्ट्रीय व्यापार तोल | व्यापार शेष |
| Budget | अंदाजपत्रक | अंदाजपत्रक अर्थ संकल्प | | अंदाजकपत्रक | अर्थसंकल्प |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Capital–भांडवल; पुंजी मुद्दल | | भांडवल | भांडवल | भांडवल | भांडवल |
| Combination | | | एकत्रीकरण | | संयोगीकरण |
| Commodity–विनिमयार्ह पदार्थ | | वस्तू | वस्तू | | क्रयवस्तू |
| Consumption–उपभोग | सेवन | उपभोग | उपभोग | उपभोग | उपभोग |
| Contract–कौल | | करार | | | करार |
| Credit–साक | पतपैसा; धेव | पत | पत | | पत |
| Currency–नाणे | चलन | | चलन | | चलन |
| Demand–खप | मागणी | मागणी | | मागणी | मागणी |
| Division of labour श्रमविभाग | श्रमविभाग | श्रमविभागणी | | श्रमविभागणी | श्रमविभाजन |
| Employment–रोजगार | रोजगारी | रोजगार | रोजगार | रोजगार | रोजगार |
| Enterprise–उदमी | प्रवर्तक | | संयोजक | | उद्योग परिचालक |
| Enterpreneur–उदमी | प्रवर्तक | | संयोजक | | उद्योगपरिचालक |
| Enterprise–कारखाना | | | साहस | | उद्यम; उदमी, धाडस |
| Exchange Value–मोबदला मोल | विनिमय मूल्य | | विनिमय मूल्य | | वितिमय मूल्य |
| Expenditure–व्यय | खर्च | खर्च | | खर्च | खर्च |
| Fixed Capital–स्थिर पुंजी, स्थिर भांडवल; अविनाशी भांडवल | | | स्थिर भांडवल | | स्थिर भांडवल |
| Foreign Trade–परदेश व्यापार; बाह्यदेश व्यापार | | | | परकीय व्यापार | विदेशी व्यापार |
| Unemployment–बेरोजगारी | बेकारी; वृत्तिहीनता | अविकसित | | बेकारी | बेरोजगारी |
| Unit–माप | घटक; नग | प्रमाण | नग; परिमाण | परिमाण | घटक |
| Wages–मजुरी | मजुरी; भृती | वेतन; मजुरी | वेतन; मजुरी | | वेतन |
| Weaith–संपदा; धन | धन | संपत्ती | संपत्ती | | संपत्ती |
| Income–उत्पन्न | उत्पन्न | उत्पन्न | प्राप्ति | उत्पन्न | आय |
| Indifference curve | | समवृत्ति वक्र; तटस्थतावक्र | | | समवृत्तवक्र |
| International Monetary Fund | आंतरराष्ट्रीय चलन निधी | आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी आंतरराष्ट्रीय चलननिधी; आ. चलन संचय | | आंतरराष्ट्रीय नाणेनिधी | आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी |
| Intrinsic Value–आंगमोल | अंतर्गत किमत | | | | आंगिक मूल्य |
| Joint Stock | संयुक्त भांडवली | संयुक्त निधि | संयुक्त भांडवली | | संयुक्त भांडवल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Company– मंडळी; संभूय समुत्थान | प्रमंडल | मंडळी | मंडळी | | कंपनी |
| Labour–श्रम | श्रम | श्रम, श्रमिक | श्रम श्रमिक | | श्रम; श्रमिकवर्ग |
| Land Revenue– धारा; सारा | शेतसारा | | शेतसारा | | जमीनमहसूल |
| Letter of Credit– भलावणपत्र | लेटर ऑफ क्रेडिट | | | | भलावणपत्र |
| Liquidity Preference | रोकडपसंती | रोकडप्राधान्य | रोखीची अभिलाषा | रोखता पसंती | रोखीची पसंती |
| Macroeconomics | सांकलिक अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र | | | समग्रलक्ष्मी अर्थशास्त्र |
| Money–पैका | नाणे; मुद्रा | पैसा | पैसा | नाणे | मुद्रा |
| Monopoly– मक्ता; मख्ता; गादी | मक्तेदारी | मक्तेदारी | मक्तेदारी | | मक्तेदारी |
| Moral Suasion | नैतिक दडपण | | | नैतिक मनधरणी | नैतिक समजावणी |
| Net–निके | घट्ट | निव्वळ शुद्ध | निव्वळ | | निव्वळ |
| Opportunity Cost | प्रतिवस्तु व्यय | वैकल्पिक खर्च खर्च | संधित्यागात्मक खर्च | संधित्याग खर्च | वैकल्पिक व्यय |
| Optimum | सुयुक्त | पर्याप्त; युक्त; बाजवी | इष्ट; पर्याप्त | | इष्टतम |
| Over population– प्रजातिवृद्धी | अति लोकसंख्या | अतिरिक्त लोकसंख्या | अतिरिक्त लोकसंख्या | | लोकसंख्येची अतिवृद्धी |
| Precautionary motive | पूर्वखबरदारीचा हेतू | | | तरतुदीचा हेतु | सावधगिरीची प्रेरणा |
| Productivity– उत्पादकता; उत्पादनशक्ती | उत्पादकता; | उत्पादनक्षमता; उत्पादिता | उत्पादनक्षमता उत्पादकता | | उत्पादनक्षमता |
| Quasi rent | आभास भाटक | आभास खंड | आभास खंड | | खंडवजा उत्पन्न |
| Recession | पिछेहाट | घसरण | | | मंदी |
| Regressive | प्रतिगामी | प्रतिगामी | प्रतिगामी | प्रतिगामी | परागामी |
| Relative–सांबंधिक | | सापेक्ष | | सापेक्ष | सापेक्ष |
| Revenue–पट्टी | | प्राप्ती | महसूल | | महसूल |
| Saving–संग्रह | संचय; शिल्लक | | बचत | बचत | बचत |
| Share–रोखा | भाग | | भाग | भाग | भाग; रोखा |
| Standard of living | | जीवनमान | राहणीचे मान; जीवनमान | जीवनमान | राहणीमान |
| Stock–भरणा | | | संचय; साठा | | साठा |
| Supply–आमदानी; भरती; पुरोठा; पुरावा | पुरवठा | पुरवठा | पुरवठा | | पुरवठा |
| Theory | | | सिद्धांत | | प्रमेय |

या सारिणीकडे दृष्टिक्षेप टाकल्यानंतर काही गोष्टी ठळक-पणे नजरेस पडतात. त्या अशा :

१. शंभर वर्षांपूर्वी वापरण्यात आलेले काही शब्द आजही त्याच अर्थाने वापरले जात आहेत. उदाहरणार्थ, भांडवल, पुंजी, उपभोग, श्रमविभाग, रोजगार, विनिमय, उत्पन्न, श्रम, मक्ता, उत्पादकता, मजुरी, धन वगैरे.

२. सामान्यतः सोप्या, तद्भव शब्दांऐवजी अपरिचित, तत्सम संस्कृत शब्दांचा वापर करण्याची प्रवृत्ती वाढत गेली आहे. उदाहरणार्थ, 'मालमोबदला' याऐवजी 'वस्तु-विनिमय'; 'उदमी' ऐवजी 'उद्योगपती', 'प्रवर्तक', किंवा 'संयोजक'; 'आंगमोल' ऐवजी 'अंतर्गत किमत'; 'पैदास' ऐवजी 'उत्पादन'; 'कमताई' ऐवजी 'दुर्मिळता', वगैरे.

३. काही शब्द अधिक सोपे व अर्थवाही असूनही ते मागे पडत गेले आहेत. उदाहरणार्थ, 'भलावणपत्र' (लेटर ऑफ क्रेडिट), 'निके' (नेट), 'कच्चा' (ग्रॉस), 'बेरोजगारी' (बेकारी) वगैरे.

४. 'पुरोटा' सारख्या काही शब्दात फेरबदल होऊन ('पुरवठा') ते नव्या स्वरूपात रूढ झाले आहेत.

५. 'प्रजननवृद्धी' (ओव्हरपॉप्युलेशन); 'संभूय समुत्थान' (जॉइंट स्टॉक कंपनी), 'विनिमयार्ह पदार्थ' (कमोडिटी) यांसारखे काही संस्कृतप्रचुर शब्द चांगले असूनही रूढ झाले नाहीत.

६. 'पूर्ण रोजगार' (फुल एम्प्लॉयमेन्ट), 'कार्य' (फंक्शन), 'कायदेशीर' (लीगल), 'उत्पादनक्षमता' प्रॉडक्टिव्हिटी) 'परस्पर–' (रेसिप्रोकल), 'ताठर' (रिजिड), 'मोसमी', (सीझनल) 'घटक' (युनिट) वगैरे शब्दांसाठी अनुक्रमे 'सर्वोद्योग', 'अनुवर्त' (किंवा श्रित); 'विधिग्राह्य' (किंवा विधिपूत, विधिमान्य), 'उत्पादकता' (किंवा उत्पादिता), 'व्युत्क्रम' (किंवा व्यस्तांक), 'ठोकळेबाज', 'हंगामी' (किंवा ऋतुनिष्ठ), 'एकक' वगैरे शब्दांचा वापर करण्यात आला आहे; परंतु प्रचलित शब्द सोडून हे शब्द का योजण्यात आले असावेत याचा नीट उलगडा होत नाही.

७. काही शब्दांच्या अर्थासंबंधीच लेखकांमध्ये मतभेद असावेत असे दिसते. उदाहरणार्थ, 'अॅबिलिटी' म्हणजे 'पात्रता' की 'क्षमता'? 'ऑटॉनॉमस' म्हणजे 'स्वायत्त', 'स्वतंत्र' की 'स्वयंशासित'? 'कलेक्टिव्ह' म्हणजे 'सामुदायिक', 'सामूहिक' की 'सांघिक'? 'कॉर्पोरेटिव्ह' व 'रिलेटिव्ह' यात काही फरक आहे की नाही? 'तुलनात्मक' हा शब्द दोन वेगवेगळ्या लेखकांनी 'कॉर्पोरेटिव्ह' व 'रिलेटिव्ह' यासाठी वापरला आहे. 'उपभोग' व 'सेवन' यांपैकी 'कंझम्प्शन' साठी कोणता शब्द योग्य होईल? 'व्यय' व 'खर्च' यात काही फरक करावा की करू नये? 'डिप्रीसिएशन' साठी 'घसारा' शब्द योग्य होईल की 'झीज'? 'डिराइव्हड' शब्दाचा अर्थ 'परप्रवृत्त', 'परोक्ष' की अप्रत्यक्ष?' जर 'डिराइव्हड' साठी 'अप्रत्यक्ष' शब्दाचा प्रयोग करावयाचा असेल तर मग 'इनडायरेक्ट' साठी कोणता शब्द वापरावयाचा? 'श्रमविभाग', 'श्रमविभागणी' व 'श्रमविभाजन' यांपैकी कोणता शब्द अधिक योग्य ठरेल? 'लवचिकता' की 'लवचिकपणा?' 'एक्सचेंज' म्हणजे 'हुंडणावळ' की 'विनिमय?' 'इन्कम' साठी 'उत्पन्न', 'प्राप्ती', 'मिळकत', 'आय' यांपैकी कोणता शब्द वापरावा? 'इन्फ्लेशन' म्हणजे 'भाववाढ' की 'चलनवाढ?' 'फायनॅनशियल' म्हणजे 'भांडवलविषयक', 'मुद्रानिष्ठ' की 'वित्तीय?' 'मनी' म्हणजे 'चलन' की 'पैसा?' 'रियल इन्कम' म्हणजे 'वस्तुरूप उत्पन्न', 'वास्तव उत्पन्न' की 'प्रत्यक्ष प्राप्ती?'

८. नंतरच्या लेखकांनी आपल्या आधीच्या लेखकांची पुस्तके नजरेखाली घालून त्यांनी वापरलेल्या परिभाषांचा विचार केला असावा, असे दिसत नाही. त्यामुळे काही चांगल्या शब्दांच्या ऐवजी सामान्य, क्लिष्ट व प्रसंगी चुकीचेही शब्द वापरण्यात आल्याचे आढळून येते. परिभाषेसंबंधी फारसा गंभीर विचार झाला नसावा असे वाटते.

## परिभाषेची प्रक्रिया

पारिभाषिक शब्दांची निवड व निर्मिती करताना कोणत्या अडचणी समोर येतात त्याचा आता विचार करावयाचा आहे. या दृष्टीने विचार करता अर्थशास्त्रीय साहित्याचे दोन भाग पडतात. सर्वसामान्य जनतेच्या उपयोगासाठी लिहिले जाणारे साहित्य व विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी लिहावयाचे साहित्य. यांपैकी सामान्य वाचकांसाठी लिहावयाचे साहित्य जास्तीत जास्त सुबोध, सोपे व रोचक असले पाहिजे हे उघड आहे. ज्ञानसुलभता हा त्या साहित्याचा उद्देश असल्यामुळे परिभाषेची सुबोधता हे त्याचे अपरिहार्य अंग ठरते. अशा साहित्यात वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या द्वारा रूढ व परिचित झालेली परिभाषा वापरणे योग्य ठरते. 'अंदाजपत्रक', 'शिरगणती', 'बट्टा' 'हुंडी', 'हुंडणावळ', 'भांडवल', 'बेकारी' वगैरे शब्द सर्वसामान्य वाचकांना परिचित असल्यामुळे त्यांचा वापर करणे उपयुक्त ठरते; परंतु अभ्यासा-

साठी म्हणून जेव्हा पुस्तक लिहावयाचे असते तेव्हा परिभाषा अधिक अचूक, बारकाव्यांचे सूचन करणारी अशी असावी लागते.

## संस्कृतचा आधार

भारतीय भाषांमध्ये (उर्दूव्यतिरिक्त) परिभाषा तयार करताना सामान्यतः संस्कृतचा आधार घेतला जातो. **एका शब्दापासून अनेक शब्द बनविण्याचे सामर्थ्य संस्कृतमध्ये असल्यामुळे तसे करणे स्वाभाविकच ठरते.** 'अर्थ' हा आधारभूत शब्द घेतला की त्यापासून 'अर्थव्यवहार', 'अर्थशास्त्र', 'आर्थिक' 'अर्थकारण', 'अर्थमिती' (एकॉनॉमेट्रिक्स) वगैरे शब्द बनू शकतात. 'शेती' ऐवजी 'कृषि' हा शब्द वापरल्यास त्यापासून 'कृषिविकास', 'कृषिअर्थशास्त्र', 'कष्टभूमी', 'कृषिउत्पादन', 'कृषक', 'कृषिविज्ञान' (अ‍ॅग्रॉनॉमी) वगैरे शब्द बनू शकतात.

परंतु संस्कृतचा वापर केल्याने परिभाषेचा प्रश्न पूर्णपणे सुटतो, असे मात्र समजता येणार नाही. संस्कृतचा उपयोग हे साध्य नसून साधन आहे, ही दृष्टी सुटली की परिभाषा क्लिष्ट व बोजड बनते. मग 'मौद्रिक' मजुरी (मनीवेजेस), 'क्षैतिज' (हॉरिझॉंटल) वृत्तिहीनता' (अनएम्प्लॉयमेंट), 'भृती' (मजुरी) 'अनुमाप' (स्केल), 'सिद्धांत' (थियरी) वेम (माग) यासारखे शब्द बनविण्याकडे प्रवृत्ती होऊ लागते. **याचा अर्थ एवढाच की संस्कृतच्या उपयुक्ततेची मर्यादाही लक्षात घेणे आवश्यक आहे.**

## सर्व भाषांसाठी समान परिभाषा

भारतातील सर्व भाषांसाठी, निदान 'इंडोआर्यन' परिवारातील भाषांसाठी समान परिभाषा असावी, असा आग्रह काही मंडळी बाळगतात; परंतु ही गोष्ट निकट भविष्यात साध्य होईल असे दिसत नाही. याचे कारण असे की सर्वच भारतीय भाषांनी स्वतःसाठी वेगवेगळे शब्द यापूर्वीच तयार केले असून ते लोकमानसावर अंकितही झाले आहेत. त्यांना तेथून काढून त्यांच्या जागी नवे शब्द आणणे सध्या तरी शक्य दिसत नाही. उदाहरणार्थ 'कॅपिटल' या शब्दासाठी मराठीत 'भांडवल', हिंदीत 'पूंजी', बंगालीत 'मूलधन' व गुजरातीत 'मूडी' हे शब्द प्रचलित आहेत. त्यांपासून 'भांडवलदार', 'भांडवलशाही', 'पूंजीपती', 'पूंजीवाद', 'धनिक', 'धनिकतावाद', 'मूडीदार', 'मूडीवाद' यांसारखे जोडशब्दही प्रचलित आहेत. 'बॅलन्सशीट' या शब्दासाठी मराठीत 'ताळेबंद', हिंदीत 'तलपट', बंगालीत 'स्थितिपत्र' व गुजरातीत 'स्वरवैयुं'. हे शब्द प्रचलित आहेत. यापैकी हिंदीचा **'तलपट' शब्द मराठीने घ्यावयाचे ठरविले आणि त्यातील 'ल'चा चुकून 'ळ' झाला तर अनवस्था प्रसंग ओढवावयाचा!**

**प्रत्येक भाषेची एक विशिष्ट प्रकृती असते. तिला अनुसरून शब्दांची रूपे बनतात, त्यामुळेही परिभाषेच्या समानीकरणात अडथळा निर्माण होतो.** उदाहरणार्थ 'अकाउंट' या शब्दासाठी मराठीत 'खाते', गुजरातीत 'खातुं' व हिंदीत 'खाता' असे शब्द प्रचलित आहेत. एका अर्थाने हा शब्द एकच असला तरी त्याची तीन वेगवेगळी रूपे या तीन भाषांत रूढ आहेत. त्यातील कोणतेही एक रूप स्वीकारल्यास अन्य भाषांशी ते विसंगत ठरेल.

संस्कृत शब्दांच्या बाबतीत आणखी एक अडचण आहे. ती अशी की एकच संस्कृत शब्द वेगवेगळ्या भाषांत वेगवेगळ्या अर्थांनी वापरला जातो. त्यामुळे एका भाषेत प्रचलित असणारा शब्द दुसऱ्या भाषेत जसाच्या तसा वापरता येत नाही. उदाहरणार्थ 'अ‍ॅडल्ट' या इंग्रजी शब्दासाठी हिंदीत व गुजरातीत व 'वयस्क' हा शब्द वापरला जातो. (बंगालीत 'वयस्क' किंवा 'वयस्थ' हा शब्द वापरला जातो.) मराठीत त्याचा अर्थ 'म्हातारा' असा होतो. 'पर्यायी' हा शब्द मराठीत 'अल्टरनेटिव्ह' या शब्दासाठी वापरला जातो तर हिंदीत व बंगालीत त्याचा उपयोग 'सिनॉनिमस' या शब्दासाठी केला जातो. 'अल्टरनेटिव्ह' या शब्दासाठी हिंदीत, बंगालीत व गुजरातीत 'वैकल्पिक' हा शब्द वापरला जातो. परंतु मराठीत मात्र 'वैकल्पिक' हा शब्द 'ऑप्शनल'. या शब्दाचा अर्थ सूचित करतो. हिंदीत, बंगालीत व गुजरातीत 'ऑप्शनल' साठीही 'वैकल्पिक' हाच वापरला जातो. (अर्थात् हिंदीत त्याच्या जोडीने 'ऐच्छिक' हा शब्दही वापरला जातो. त्याचा उपयोग मराठीत 'व्हॉलंटरी' या शब्दासाठी केला जातो. अशी ही विचित्र गुंतागुंत आहे. सारांश, केवळ संस्कृतचा आधार घेतल्याने परिभाषेचा प्रश्न चुटकीसरशी सुटणारा नाही.

**यातून सुटण्याचा मार्ग एवढाच की प्रत्येक भाषेने आपापल्या प्रकृतीचा विचार करून तिच्याशी जुळेल अशी परिभाषा तयार करावी आणि तसे करताना एक अखिल भारतीय परिभाषा तयार करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून त्या उद्दिष्टाच्या अधिकाधिक जवळ पोचण्याचा प्रयत्न करावा. मराठीपुरता विचार करावयाचा झाल्यास मराठीत सध्या परिभाषेसंबंधी जे अराजक माजले आहे ते संपुष्टात आले पाहिजे. आतापर्यंत या दिशेने जे प्रयत्न झाले आहेत ते विचारात घेऊन संपूर्ण मराठी भाषी प्रदेशात एक परिभाषा प्रचलित होईल असे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. अर्थशास्त्रासाठी लागणाऱ्या पारिभाषिक शब्दांची एक सर्वसम्मत सूची तयार झाल्यास या दिशेने वाटचाल करणे लेखकांनाही सोयीचे होईल.**



# मोझांबिक

## नव्याने स्वतंत्र झालेले एक आफ्रो-आशियाई राष्ट्र

डॉ. श्रीधर चंद्रशेखर गुप्ते

पुणे विद्यापीठातील भूगोलविभागात गेली १५ वर्षे डॉ. गुप्ते अध्यापन करीत आहेत. 'गोव्याच्या आर्थिक भूगोला'वर त्यांनी डॉक्टरेटसाठी प्रबंध सादर केला. पोर्तुगीज वसाहती व पोर्तुगीजांचा प्रभाव ह्यांचा त्यांनी विशेष सखोल अभ्यास केला आहे. पोर्तुगीजांची एक वसाहत—मोझांबिक ह्या देशाला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले. आफ्रिका खंड आता जागे होत आहे. त्यातील स्वतंत्र झालेले हे राष्ट्र त्याचा आर्थिक विकास कसा घडवेल ह्याची कल्पना ह्या लेखाने येऊ शकेल.

२५ जून, १९७५ रोजी चार शतके पोर्तुगीज जोखडाखाली असलेला मोझांबिक हा आफ्रिकेतील देश स्वतंत्र झाला. आफ्रिकेतील स्वतंत्र राष्ट्रांच्या नभांगणात एका नव्या ताऱ्याचा उदय झाला! दोन तपांच्या कणखर स्वातंत्र्य-लढ्याचा अखेर विजय झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर भारत स्वतंत्र झाल्यावर आफ्रिका खंडात उसळलेल्या राष्ट्रीयतेच्या लाटेत अनेक देश युरोपीय सत्तेतून मुक्त झाले; परंतु जुलमी पोर्तुगीज सत्तेखालील प्रदेश मात्र स्वतंत्र होऊ शकले नाहीत. मोझांबिकमधील राष्ट्र-भक्तांनी दिलेल्या प्रखर लढ्याला आता पोर्तुगालमध्येच क्रांती झाल्यावर यश आले. या स्वतंत्र राष्ट्राचा आता आंतरराष्ट्रीय, राजकीय व आर्थिक जीवनात नव्यानेच प्रवेश होत आहे. भारताचे आफ्रिकेतील स्वतंत्र राष्ट्रांशी असलेले विशेष संबंध लक्षात घेऊन या नव्या राष्ट्राची ओळख करून घेणे अगत्याचे ठरते.

मोझांबिक व अंगोला हे पोर्तुगीज आधिपत्याखालील आफ्रिकेतील दोन मोठे प्रदेश होते. दोन्हीही देश विषुववृत्ताच्या दक्षिणेस म्हणजे दक्षिण गोलार्धात आहेत. अंगोला खंडाच्या पश्चिम किनाऱ्यालगत आहे तर मोझांबिक खंडाच्या पूर्व-किनाऱ्यालगत १०° ते २७° अक्षवृत्ताचे दरम्यान पसरली आहे. सुमारे तीन लक्ष चौ. मैल क्षेत्रफळ असलेला मोझांबिकचा प्रदेश उष्ण कटिबंधातील गवताळ भागात असून न्यासा सरोवराच्या पूर्वेस व दक्षिणेस वसलेला आहे. किनारपट्टीवर पोर्तुगीजसत्ता गेली चार शतके असली तरी यातील बहुतेक अंतर्भाग पोर्तुगीजांच्या सत्तेखाली गेल्या पन्नास-साठ वर्षांतच आला असे म्हणावे लागेल. हा प्रदेश पोर्तुगीजांनी इतका उपेक्षिला होता की या शतकाच्या सुरुवातीस त्यांनी तो ब्रिटनला तीस लक्ष पौंड किमतीस विकायला काढला होता; परंतु सौदा न पटल्यानेच तो पोर्तुगीजांकडे राहिला.


या शतकाच्या सुरुवातीस बेईरा हे मोझांबिकमधील बंदर खनिज संपत्तीने नटलेल्या ऱ्होडेशिया, झांबिया (पूर्वीचा उ. ऱ्होडेशिया) मालावी, (न्यासालँड) वगैरे अंतर्भागातील भूवेष्टित देशांना रेल्वेमार्गाने जोडले गेले व तेथूनच मोझांबिकच्या आधुनिक विकासास प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर पोर्तुगीजांनी या प्रदेशावरील आपली पकड अधिक घट्ट करण्याच्या उद्देशाने व या प्रदेशाचे आर्थिक शोषण अधिक प्रभावीपणे करण्याचे उद्देशाने येथे नियोजनबद्ध विकासास सुरुवात केली. त्यांच्या षष्ठ वार्षिक योजनांमध्ये रस्ते, बंदरे व शेती यांची सुधारणा व जलसिंचनाचे क्षेत्र व विद्युत्-उत्पादन यांच्या वाढीवर विशेष भर होता. त्यामुळे गेल्या वीस वर्षांत त्यामानाने विकास अधिक गतीने झाला. परंतु याच काळात पोर्तुगालमधून अधिकात अधिक पोर्तुगीज कुटुंबांना नव्याने विकसित होणाऱ्या संपदेचा फायदा घेण्यासाठी मोझांबिकमध्ये आणून स्थायिक करण्याचा प्रयत्न केला जात होता.

मोझांबिकची लोकसंख्या सुमारे ६५ लक्ष असून देशाच्या निरनिराळ्या भागात तिची अत्यंत विषम प्रमाणात विभागणी झाली आहे. लोकसंख्येची सरासरी घनता दर चौ-

मैलास बावीस असली तरी बहुतेक अंतर्भागात व किनारा-पट्टीलगतच्याही बऱ्याच भागात ती दर चौ. मैलास पाचपेक्षा कमी आहे. या एकूण लोकसंख्येत गोरे पोर्तुगीज सुमारे एक लक्ष असून आफ्रिकी-पोर्तुगीज मिश्रवंशाचे (ख्रिस्ती) सुमारे दीड ते दोन लक्ष आहेत. काही प्रमाणात अरब मिश्र वंशाचे लोकही येथे आढळतात. मोझांबिकच्या उत्तर भागात बऱ्याच टोळ्या इस्लामधर्माच्या असून त्यांची लोकसंख्या सुमारे आठ लक्ष आहे. पोर्तुगीजांच्या सत्तेखालील इतर प्रदेशांप्रमाणे येथेही राजकीय वर्चस्व टिकवण्यासाठी धर्मप्रसाराचे धोरण होतेच. त्यामुळे ख्रिस्तीधर्माची दीक्षा घेतलेले एतद्देशीय लोकही बऱ्याच प्रमाणात आढळतात. त्यातील अधिक पोर्तुगीजीकरण केलेल्या लोकांना 'ॲसिमिलादो' म्हणतात. अर्थात या लोकांना पोर्तुगीज लोकांप्रमाणेच नागरिकत्वाचे हक्क देण्यात येत; परंतु अशाही बऱ्याच लोकांनी पोर्तुगीज सत्तेखाली नागरिकत्व घेण्यास नकार दिला होता. बहुसंख्य लोक मूळ आफ्रिकी वंशाचेच आहेत. मूळ आफ्रिकी सुमारे ६३ टोळ्या असून त्यातील बहुसंख्य बांटूगटाच्या असल्या तरी प्रत्येक टोळीची भाषा स्वतंत्र असल्याने अजूनही पोर्तुगीज भाषेचा वापर जास्त प्रमाणात होतो.


आफ्रिका खंडाच्या दक्षिणेकडील भागात कांगो व झांबेझी या दोन मोठ्या नद्या. मोझांबिक हा देश झांबेझीच्या खोऱ्याच्या खालच्या भागात वसलेला आहे. उत्तरेकडील पठारी भाग व दक्षिणेकडील लिंपोपोच्या खोऱ्याचा भाग वगळता बहुतेक भाग झांबेझीच्या मैदानी प्रदेशात आहे व मुख्यत: किनारपट्टीचा सखल प्रदेश आहे. एकूण पूर्वभाग किनारपट्टीचा सखल प्रदेश तर बहुतेक पश्चिमभाग व उत्तरेचा प्रदेश हे डोंगराळ वा पठारी आहेत. हा किनारपट्टीचा सखल भाग आफ्रिकेच्या अंतर्भागातील मोठ्या पठारी प्रदेशापासून बृहत्कड्याने (Great Escarpment) अलग झाला आहे व त्या भागात पर्वतांची उंची ८००० फुटांहून (सुमारे २५०० ते ३००० मीटर) अधिक आहे. आपल्याकडे कोकणचा सखल भाग देशावरील पठारी भागापासून सह्याद्रीमुळे अलग झाला आहे तशीच परिस्थिती आहे.

परंतु हवामानाचे दृष्टीने मोझांबिक परिस्थिती आपल्या कोकणापेक्षा थोडी वेगळी आहे. तेथे पर्जन्यमान काही भागात ४५ ते ६० इंच तर काही भागात १५ इंचांपर्यंत कमी आहे. उत्तरेकडच्या पठारी भागात सुमारे ४५ इंच तर दक्षिणेकडे किनारपट्टीला सुमारे ३०-३५ इंच आणि तेथून अंतर्भागात १०० मैलांचे आत ते १५ इंचपर्यंत कमी होते. पर्जन्य मुख्यत: उन्हाळ्यात (म्हणजे नोव्हेंबर ते मार्च–कारण द. गोलार्धात




आहे.) मिळतो. त्यामुळे चांगल्या स्थिर शेतीसाठी जलसिंचनाची आवश्यकता भासते. उष्णतामान मात्र आपल्याकडील किनारपट्टीसारखेच आढळते. झांबेझी, लिंपोपो व इतर खोऱ्यातील जमीन गाळाची व कसदार आहे तर किनारपट्टीवर बऱ्याच भागात दलदल व रेताड जमिनीमुळे शेती अवघड झाली आहे.

मोझांबिकमधील महत्त्वाची पिके म्हणजे कॅसाव्हा, भात, मका ही धान्यपिके. काही भागात अधिक पावसामुळे किंवा नद्यांच्या पाण्यावर कापूस, ऊस यांची लागवड आहे. तसेच अंतर्भागात तंबाखूचेही उत्पादन होते. मोझांबिकमधून निर्यात होणाऱ्या पदार्थांत किमतमानाने कापूस (सुमारे २०%) व साखर (सुमारे ११ ते १२ टक्के) हे महत्त्वाचे आहेत. वायव्येकडील डोंगराळ भागात चहाचेही उत्पादन होते; परंतु या देशातील शेतीची प्रगती ही मुख्यत: जलसिंचनक्षेत्रातील वाढीवरच अवलंबून आहे व अशी शक्यता मुख्यत: झांबेझी व लिंपोपो नद्यांच्या खोऱ्यातच आहे. लिंपोपो नदीवरील धरणामुळे त्या भागात धान्य, कापूस व उसाचे उत्पादन वाढले आहे. अर्थात या भागात पोर्तुगीजांची वस्ती वाढवण्याचा पद्धतशीर प्रयत्न अलीकडील वीस वर्षांत केला होताच. शेती करण्यासाठी येथे येणाऱ्या प्रत्येक पोर्तुगीज कुटुंबाला स्थायिक होण्यासाठी सात एकर बागायती (कालव्याखालील) जमीन व सत्तर एकर कुरणाची जमीन मोफत देण्यात येत असे.




लोरेन्को मारक्वेस या सर्वांत मोठया शहराच्या उत्तरेकडील इंकोमानी नदीच्या धरणामुळे सुमारे अडीच लक्ष एकर जमिनीला पाणी मिळते. याचप्रमाणे झांबेझीवरील विशाल धरणयोजनेमुळे सुमारे २५ ते ३० लक्ष एकर अधिक जमीन ओलिताखाली येत असल्याने या देशाच्या आर्थिक विकासास गती मिळून नजीकच्या काळात त्याची खूप भरभराट होण्याची शक्यता आहे. पोर्तुगालमधील ग्रामीण भागातील लोकवस्तीचा दाब दूर करण्यासाठी तेथून कुटुंबे आकर्षित करण्याचा या धरणयोजनांमागील प्रधान हेतू असला तरी आता त्यांचा तद्देशीय लोकांच्या आर्थिक विकासास व भरभराटीस उपयोग होणार आहे.

मोझांबिकमध्ये बऱ्याच प्रमाणात खनिज संपत्ती असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे; परंतु पोर्तुगीज राजवटीत ही शक्यता बरीच उपेक्षिली गेली. झांबेझीच्या खोऱ्यात कारु स्तरातील कोळशाचे काही प्रमाणात उत्पादन होते. (वार्षिक सुमारे दीड लक्ष टन). हा कोळसा मुख्यतः रेल्वेसाठीच वापरला जातो. वायव्येकडील टेटेभागात काही प्रमाणात युरेनियम सापडते. तसेच थोड्या प्रमाणात सोने, बेरिल व बिस्मथ यांचेही उत्पादन होते. झांबेझीच्या त्रिभुज प्रदेशात

[ पृष्ठ २१ वर ]



## तरुणांचे मनोगत

# कॉलेजशिक्षण घेऊ न शकणाऱ्या तरुणांसाठी व्यवसायमार्गदर्शन

प्रा. कमलाकर परचुरे

व्यवसायमार्गदर्शनावरील हा तिसरा व शेवटचा लेख. ह्या लेखाचा उपयोग विशेषतः एस. एस. सी. पूर्वीच शिक्षण सोडून दिलेल्या तरुणांना होईल. अशा विद्यार्थ्यांना वास्तविक पहाता जास्त सहाय्य व सल्ला देण्याची खरी गरज आहे. सर्वांत निराश तेच असतात व सर्वांच्या उपेक्षेमुळे त्यांच्या मनाची उभारी संपलेली असते. अशा तरुणांना हा लेख वाचल्यानंतर, त्यांना सामावून घ्यायला अनेक शिक्षणाचे मार्ग, नोकऱ्या, व्यवसाय व स्वतंत्र व्यवसायाच्या संधी आहेत, हे लक्षात आल्यानंतर आत्मविश्वासपूर्वक पावले उचलायला उत्साह वाटेल अशी आशा आहे.

सर्वांत उपेक्षित वर्ग म्हणजे बिनशिकलेल्या तरुणांचा. हे तरुण एस. एस. सी. पर्यंतचे शिक्षण पुरे करू शकत नाहीत. त्यापैकी काही एस. एस. सी. नंतर कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यांना अडचणी बऱ्याच प्रकारच्या असतात. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट, घरातील वडील भाऊ म्हणून किंवा वृद्ध मातापित्यांच्या जवळच रहावे लागण्याची जरुरी; शेत, घरातील परंपरागत व्यवसाय, दुकान इ. ची जबाबदारी, शिक्षणात गोडी नसणे, तसेच शिक्षणाविषयी तिटकारा–कंटाळा वाटणे, वय वाढलेले असल्यामुळे इतर लहान मुलांबरोबर शाळेतील वर्गात बसण्याची शरम वाटणे, अभ्यास न झेपणे अशी अनेक कारणे असतात की ज्यामुळे बऱ्याच तरुणांना उच्च शिक्षण नाइलाजाने सोडून द्यावे लागते.

दरवर्षी एस. एस. सी. ला नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अजमावा. साधारणपणे निकाल ५० टक्के लागतो असेही गृहीत धरले तरी दरवर्षी लाखाच्या वर विद्यार्थी एस. एस. सी. त नापास होत असतात. त्यातील काही पुन्हा पुन्हा बसतात व पुन्हा अयशस्वी होतात. शेवटी 'हा नाद सोड' अशी त्यांची भावना होते.

महाराष्ट्रात ह्यांची गणना केली तर लक्षावधी तरुण आपल्याला एस. एस. सी. पेक्षाही कमी शिकलेले आढळतील.

ह्या विद्यार्थ्यांची सगळ्यांकडूनच उपेक्षा व अपमान होतो. घरात वडील मंडळी त्यांना नेहमी त्यांच्या शिक्षणाविषयी बोलून त्यांना उद्वेग आणतात. लहान भावंडे हसतात. शिक्षक-सुद्धा त्यांना नाउमेद करतात. आजूबाजूचे तुच्छता दाखवतात. कोणत्याही नोकरीकरता प्रयत्न केल्यास, 'पहिल्यांदा शिक्षणाविषयीचा डोस' पाजला जातो. नोकरी तर मिळतच नाही पण नोकरी मागायला जावे तर दुःखावर डागणी देणारे शब्द मात्र ऐकून घ्यावे लागतात.

बेकारीची सार्वत्रिक परिस्थिती लक्षात घेता सर्वांनाच वाटते...एम. ए., बी. ए., बी. एससी, बी. एड्. इत्यादी उच्च पदवीधर हजारोंनी बेकार असता...जो एस. एस. सी. ही नाही त्याला नोकरी, व्यवसाय कसा मिळणार? असे वाटणे सहाजिक आहे. पुन्हा घरातले तसेच मित्र–हितचिंतक सल्ला देतात–"शिक्षण पुरे कर–कमीत कमी एस. एस. सी. हो. त्याशिवाय तरणोपाय नाही." हा सल्ला कुचकामी असतो. कारण ज्या व्यक्तीचा शिक्षणातील उत्साह पार मावळलेला असतो अशा व्यक्तीला अशा सल्ल्याचा वीटच येतो.

बेकारी प्रचंड आहे, शंकाच नाही; पण त्याचबरोबर ज्याला कोणतेही काम करण्याची शरम नाही, कंटाळा नाही त्याला व्यवसाय शोधून काढणे तितकेसे अवघड नाही. त्यातली एक अडचण एवढीच आहे की, बऱ्याच अशिक्षित तरुणांना त्यांना योग्य असे अभ्यासक्रम व व्यवसायशिक्षणाचे मार्गच माहीत नाहीत.

बारकाईने पाहिल्यास आपणास असे आढळेल की, निकराची स्पर्धा आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या सर्वांत चांगल्या सन्मानांच्या जागांकरताच असते. उदाहरणार्थ

मेडिकल-प्रवेश, आय. आय. टी, परीक्षा, आय. ए. एस., सेक्रेटरीएट वा बँकांतील नोकऱ्या इत्यादी. हजारो तरुण एका जागेकरता अर्ज करतात. शेकडो मुलाखतीला जातात. त्यातला एकच निवडला जातो.

पण सर्वसामान्य उद्योगधंदे—कारागिरी—कसबी काम—मजुरी ह्या क्षेत्रात तितकी निकराची स्पर्धा नसते. सामान्य बुद्धीच्या व्यक्तीला ह्या क्षेत्रात व्यवसाय शिकताना त्रास कमी वाटण्याची शक्यता आहे. त्याला त्यातले तंत्र व कसब चटकन आत्मसात करता येते. अशा व्यवसायांचे तंत्र शिकायला फार दीर्घ मुदतीचा काळही लागत नाही. ३ महिने ते १ वर्ष एवढ्या अल्प काळात असे कारागिरी स्वरूपाचे कोर्स पुरे करता येतात. अशा कोर्सेसना काही ठिकाणी फी नसते, असल्यास नाममात्र असते. ३–४ महिन्यांचा कोर्स पुरा करण्याचा खर्च सामान्य परिस्थितीतील व्यक्तीलाही झेपू शकतो.

तेव्हा ह्या दृष्टीने सामान्य अशिक्षित तरुणांचा रोजगाराचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना विशेष मार्गदर्शन दिले जावे. सुशिक्षितांना एक वेळ हे मार्गदर्शन दिले नाही तरी चालेल पण अशिक्षितांना मात्र ते देण्याची नितांत गरज आहे.

अर्थ मासिकातील ह्या विषयावरील लेखमालेतील हा शेवटचा लेख होय. इतरही लेखांप्रमाणे ह्यात अनेक व्यवसायांची माहिती संपादन केली आहे. तपशीलवार व सविस्तर माहिती मात्र 'अर्थ' मासिकातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'व्यवसाय-मार्गदर्शन पुस्तिका भाग क्र. २' मध्ये उपलब्ध होईल.

प्रामुख्याने एस्. एस्. सी. च्या पुढे शिक्षण न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता खालील क्षेत्रात वाव मिळू शकेल.

१. शेतकी शाळा—कुक्कुटपालन, फळबागा, पशुसंवर्धन इत्यादी.

२. कारागिरी-व्यवसाय—उदा. फोटोग्राफी, लिथोग्राफी, ब्लॉकमेकिंग, इंटिरिअर डेकोरेशन, ड्रॉइंग, पेंटिंग, पोर्ट्रेटस्, कमर्शियल ड्रॉइंग, मुद्रण, कंपोझिंग, प्रूफरीडिंग, ऑफसेट प्रिंटिंग, शिल्पकाम, ओतकाम, मॉडेलिंग, सुवर्णकार, एन्ग्रेव्हिंग, कॉपीरायटर, मुद्रणाची अक्षरे व ठसे तयार करणे, संगीत-शिक्षक, वाद्यवादक, आर्केस्ट्रॉ-सहाय्यक, स्वरलिपी तयार करणे, बँड, सुतारकाम, फ्रेटवर्क, लोहारकाम, चर्मकार, चामडी कमावणे, विटांचे काम, घरबांधणे, कॉंक्रिट स्लॅबवरची कामे, प्लम्बर, फिटर, स्कूटर व मोटरदुरुस्ती, सायकल-दुरुस्ती, इलेक्ट्रीशियन, टेपरेकॉर्डर, T. V. रिपेर्स, रेडिओ व घड्याळदुरुस्ती, नाटयकला, टीव्ही व थिएटरमधील टेक्निशियन, सेट करणे, डायरेक्शन, फिल्म, रेकॉर्डिंग, फिल्म कॅमेरा, संपादन-सहाय्य, बातमी मिळवणे, वृत्तपत्रव्यवसाय, जाहिरात व इतर एजन्सी वर्क—फिरता विक्रेता, होम सायन्स, केटरिंग, बेकरी इत्यादी.

३. **उमेदवार मजूर :** टेल्को, फिलिप्स, गरवारे, कूपर, झेनिथ स्टील, भारत फोर्ज, टेक्स्टाइल मिल्स इत्यादी कारखाने चाचणी घेऊन त्यांच्या कामगार-विद्यार्थ्यांची निवड करतात. काम शिकवले जाते. शिष्यवृत्ती मिळते. कामास प्राविण्य मिळाल्यास नोकरी व पगार चांगला.

४. **तांत्रिक अभ्यासक्रम :** एम्ब्रॉयडरी, टेलरिंग, कटिंग, मास्टर टेलर, मिस्त्री, फिटर, वेल्डर, टर्नर, ड्रायव्हर, हेअर-ड्रेसिंग, रिक्षाड्रायव्हिंग इत्यादी.

५. **ग्रामीण उद्योगधंदे :** ताडगूळउत्पादन, फायबर इंडस्ट्री, मधुमक्षिकापालन, रेशीमउद्योग, हातमाग, कन्फेक्शनरी, कँडी मेकिंग, टॅपिंग, खजूर, नीरा, साबण, चुना, खडू, चुनाभट्टी, विटा तयार करणे, मातीची भांडी, कलाकुसरीच्या वस्तू, खराटे, ब्रश, केरसुण्या, घायपात, तेलघाणी, हिरडा, धुलाई, घराला रंग देणे, स्टेशनरी, बाईंडिंग, विडीव्यवसाय, तंबाखू, मिरची, मसाले, फर्निचर, टोपल्या, पोती, जंगलराखण व वनसंवर्धन, दूधदुभते, कोंबड्या, बकऱ्या, शेळ्या, मेंढपाळी इ.

६. **व्यापार व सहकारविषयक :** गुमास्ता, दलाल, एजंट, हिशेबनीस, पत्रव्यवहार, पोस्टाची कामे, ऑडिट, जी. सी. सी. परीक्षा, सहकारी संस्थेच्या सेक्रेटरीचा कोर्स, कारकुनी कामे, टायपिंग, शॉर्टहँड इ.

७. **मेडिकल व्यवसाय :** नर्स, ड्रेसर्स, व्हॅक्सिनेटर्स, कंपाउंडर्स, मेडिकल शॉप लायसेन्स.

८. **पोलीसदल व संरक्षणदलातील व्यवसाय :** ह्यात कुक, क्लीनर्स, स्वीपर्स, लास्कर्स, खलाशी, मेकॅनिक, हत्यारी पोलीस, वायरलेस, मोटरलाँच ड्रायव्हर, बिनहत्यारी पोलीस, एअरमन, नेव्हल कॅडेट, वॉरंटऑफिसर, स्टोअरकीपर इ.

ह्या व्यवसायांची जंत्री करावयाचे ठरवले तर ते थोडक्यात आवरणारे काम नाही. अशा सामाजिकदृष्टचा हलक्या ठरलेल्या व्यवसायांना आजच्या आर्थिक युगात फार महत्त्व आले आहे. खेड्यात आता मजूर मिळणे तितकेसे सोपे राहिलेले नाही. शहरात देखील सुतार, नळ दुरुस्ती करणारा प्लम्बर, फिटर हे दुर्मिळ झाले आहेत. छोटया छोटया किरकोळ कामांना ही माणसे आता उपलब्ध नाहीत. त्यांचे वेतन व कमाईही वाढली आहे. अ दर्जाचा सुतार कमीत कमी २० रु. रोज घेतो, साधा क दर्जाचा हेल्पर ५ रु. पेक्षा कमी घेत नाही. साधी इस्त्री करायचे झाले तरी ४०-५० पैसे द्यावे लागतात, तर पॉलिशला जवळजवळ तितकेच. ह्यापुढे जस-

जशी आर्थिक प्रगती व राहणीमान वाढत जाणार तसतसा कारागीर व स्वतंत्र व्यावसायिक मजुराची परिस्थिती सुधारत जाणार असे स्पष्ट दिसते. स्कूटर रिपेर करणाऱ्या साध्या मेकॅनिकला रोजी ३० रुपये सहज मिळतात व तो एखाद्या बँकेतल्या कारकुनासारखे कपडे घालू शकतो व त्याच्या-इतकीच चैन करू शकतो...तेव्हा कोणताही व्यवसाय हलका-श्रेष्ठ मानण्याचे आता दिवस राहिलेले नसून बेकार राहण्या-पेक्षा कोणतेही काम नव्या नीतीने व दानतीने करून आर्थिक संघर्षास तोंड देऊ शकणाऱ्या व्यक्तीलाच ह्या जगात सामाजिक स्थान प्राप्त होते.

अशिक्षित बेकार तरुणांनी बेकारी ही हलकी गोष्ट आहे व कोणताही व्यवसाय करणे हीच श्रेष्ठ गोष्ट आहे असे मानून आपल्याला आवडेल व झेपेल असा व्यवसाय स्वीकारण्याची आता गरज आहे.

सूचना – ह्या बाबतीतील तपशीलवार सविस्तर माहिती व्यवसायमार्गदर्शन पुस्तिका भाग २ या पुस्तिकेत मिळू शकेल. पुस्तिका आमच्यातर्फे प्रकाशित होत आहे.

किमत फक्त १ रुपया

**कॉलेज शिक्षण न घेऊ शकणाऱ्या तरुणांसाठी योग्य अभ्यासक्रम व व्यवसाय**


## पॉकेट-मनी कसा पुरवावा ?

ही आजकालची तुमची अडचण आम्ही समजू शकतो !

या बाबतीत आमचा तुम्हाला मित्रत्वाचा सल्ला असा की,

' विद्या बँकेत '

तुमच्या पॉकेट-मनीतून ' बचत खाते ' उघडा अन् चमत्कार पाहा. तुम्हाला आपोआप बचतीची सवय लागेल. शिवाय तुमच्या बचतीवर ६%. दराने व्याजही मिळेल !

विद्यार्थी, शिक्षक व पालकांची—


**विद्या सहकारी बँक लि.**

३७५, नारायण पेठ, उंबऱ्या गणपती चौक,
लक्ष्मी रस्ता, पुणे–३०.

**आमच्याकडे केव्हाही या. तुमचे स्वागतच होईल ।**

ज. ग. नलावडे
व्यवस्थापक

प्रा. प. वि. पटवर्धन
अध्यक्ष




# सोव्हिएट युनियनचा आर्थिक इतिहास

**(१९१७–१९६७) लेखक प्रा. प. वि. पटवर्धन**

उपप्राचार्य, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे.

प्रकाशक : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्यामकांत लक्ष्मण बर्वे, आर्यडियल बुक सर्व्हिस, 'निर्मल', नवी पेठ, पुणे ३०.

पृष्ठसंख्या ६६६, किंमत– पस्तीस रुपये.

महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाच्या विषयसमितीने सोव्हिएट युनियनचा आर्थिक इतिहास हा ग्रंथ लिहिण्यासाठी प्रा. प. वि. ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन ह्यांची नियुक्ती केली होती. ह्यापूर्वी प्रा. पटवर्धन ह्यांनी आधुनिक जगातील प्रमुख देशांच्या आर्थिक इतिहासावर लिहिलेले पुस्तक तृतीय वर्ष बी. कॉम, व बी. ए. च्या अभ्यासक्रमाचे अध्ययन व अध्यापन करण्यास उपयुक्त झाले आहे. मराठी माध्यमाच्या त्या विषयावरील पुस्तकात शैली व माहिती ह्या दोन्ही दृष्टींनी प्रा. पटवर्धन ह्यांचे पुस्तक प्रमाणभूत वाटते. त्यांच्या पाठ्यपुस्तकाचा चहातावर्ग विद्यापीठीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आहेच.

प्रस्तुतच्या ग्रंथात १९१७ ते १९६७ ह्या कालखंडात सोव्हिएट युनियनने आर्थिक प्रगती कशी घडवून आणली ह्याचा समग्र आढावा आला आहे. विकसित व विशेषत: विकसनशील देशातील... सर्वसामान्य माणसाला रशियाच्या नियोजनकार्यपद्धती, अर्थव्यवस्था, शेती, उद्योग, करपद्धती, बँकिंग आणि सोव्हिएट पक्ष व त्याचे ध्येयधोरण ह्यासंबंधी फार कुतूहल आहे. ह्यासंबंधात मराठी भाषेत समग्र माहिती देणारा हा पहिलाच ग्रंथ असावा. म्हणूनच हा ग्रंथ 'आर्थिक विकास' ह्या नव्याने सुरू झालेल्या अभ्यासविषयाची तयारी करण्याकरता सर्वच विद्यापीठातील बी. ए, बी. कॉम, व एम्. ए. आणि एम्. कॉम च्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल. सर्वसामान्य नागरिकांस देखील हा ग्रंथ कंटाळवाणा वाटणार नाही. ह्याचे कारण ग्रंथकारांनी विषयाची माहिती देताना सुबोध भाषेच्या माध्यमाचा आवर्जून वापर केला आहे. साम्यवादाचे उपासक व विरोधक ह्या दोघांनाही रशियाच्या विकासाबद्दल जी माहिती मिळते ती अतिरंजित व पूर्वग्रहदूषित असण्याचा संभव असतो. प्रा. पटवर्धन ह्यांनी विद्यापीठीय उदारमतवादी व वास्तववादी विश्लेषण देण्याची परंपरा सांभाळल्यामुळे हे पुस्तक रशियाच्या अभ्यासासाठी आधारभूत झाले आहे.

या पुस्तकात एकूण २५ प्रकरणे आहेत व ग्रंथाची रचना योग्य व सर्वसमावेशक झाली आहे. पहिल्या ३ प्रकरणांत ऐतिहासिक पार्श्वभूमी आली आहे. त्यानंतर ४ थे प्रकरण क्रांतिकालानंतर झालेल्या घडामोडींचा आढावा घेणारे आहे. ५ वे ६ वे व ७ वे ह्या प्रकरणांत लेनिनच्या काळात पार पडलेली आर्थिक उद्दिष्टे, त्यानंतर ८ ते १८ प्रकरणात सोव्हिएट युनियनच्या नऊ योजनांमध्ये साध्य झालेली परिपक्व आर्थिक प्रगती ह्यांची माहिती आहे. १९ व २० व्या प्रकरणात रशियाची शासनव्यवस्था व कामगारसंघटनांची रचना व कार्यपद्धती अभ्यासता येते. त्यानंतरच्या उर्वरित प्रकरणात नियोजन, करपद्धती, बँका, आर्थिक सुधारणा व परराष्ट्रीय आर्थिक संबंध ह्यांचा ऊहापोह आला आहे.

पुस्तकाची माहिती श्रेष्ठ संदर्भग्रंथ व अधिकृत आकडेवारी ह्यांनी समृद्ध आहे.

प्रा. पटवर्धन ह्यांचे पराकाष्ठेचे परिश्रम ह्या ग्रंथाच्या पानापानावर आढळतात. पुस्तकात नकाशे, माहितीचे तक्ते व आकडेवारीची कोष्टके योग्य ठिकाणी व योग्य तितकी दिली आहेत. प्रत्येक प्रकरणात उपशीर्षके देऊन छोट्या सुटसुटीत भागात स्वतंत्रपणे तेवढ्याच भागाचे विवेचन दिले आहे. त्यामुळे अभ्यासकाला एक एक नवी गोष्ट आत्मसात करून, पुढे वाचत राहावे अशी ओढ वाढत राहील. उदाहरणार्थ 'तात्त्विक पार्श्वभूमी' हे प्रकरण दुसरे पहा. त्यात मार्क्सवाद, मार्क्सवादाचा आशय, विरोधविकासात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवादी वरकड मूल्यांचा सिद्धांत, भांडवलसंचय, आर्थिक आपत्तीचा सिद्धांत, सामाजिक क्रांतीचा सिद्धांत, समाजवादाकडे जाताना होणारी स्थित्यंतरे हा भाग अतिशय थोडक्यात मार्मिकपणे व अचूकपणे देऊन लेनिन व लेनिनवाद व सोव्हिएट अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये ही त्यात उकलून दाखविली आहेत. ४ थ्या प्रकरणात क्रांतीनंतरच्या ८ महिन्यांत झालेली उलथापालथ व लेनिनचा उदय किती अपरिहार्यपणे झाला त्याचा इतिहास... इतक्या ओघाने व शैलीदारपणे लिहिला गेला आहे की वाचकाला त्याचा चित्रपट डोळ्यां पुढून सरकत आहे असेच भासेल. योजनांच्या तपशिलात तितकासा रंजक भाग नसतोच; पण एका योजनेनंतर दुसऱ्या योजनेची सुरुवात होत असताना काय झाले व काय व्हायला पाहिजे होते ह्याची दर प्रकरणाच्या सुरुवातीची चर्चा उद्बोधक व जिज्ञासावर्धक झाली आहे.

ह्या ग्रंथाचा उपयोग रशियासंबंधी यच्चयावत आर्थिक माहिती एकत्र एका ठिकाणी, संदर्भ मिळण्यासाठी आहे व त्या दृष्टीने जसजसा हा ग्रंथ अभ्यासकांच्या अवलोकनात येईल तसतसा वाचनानंतर झालेल्या अभिप्रायाने आपोआप इतरेजनांत ह्या पुस्तकाला प्रियता व पुरस्कार मिळत राहील असे वाटते. ¤

## समाजवाद विरुद्ध भांडवलशाही

**लेखक प्रा. जी. लु. गांधी**

प्राध्यापक, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४.
प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
पृष्ठसंख्या १०८. किंमत : ६ रुपये.

हे पुस्तक प्रा. आर्थर सेसिल पिगु ह्यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचे विश्वासार्ह व शब्दशः भाषांतर करण्याच्या हेतूने व ते मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासास उपलब्ध व्हावे ह्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने प्रा. जीवराज गांधी ह्यांना नियुक्त केले होते. भाषांतराचे समीक्षण प्रा. देवदत्त दाभोलकर ह्यांच्यासारख्या ज्येष्ठ व परिपक्व अर्थशास्त्रज्ञाकडून झाले आहे ह्यातच ह्या पुस्तकाचे गुणवैशिष्ट्य साररूपाने सांगता येईल. प्रा. पिगु ह्यांचे मूळ पुस्तक 'Socialism Vs Capitalism' हे त्यांच्या १९३७ मध्ये त्यांनी दिलेल्या व्याख्यानांच्या आधारे तयार करण्यात आले होते. ब्रिटनमध्ये त्या वेळी प्रा. पिगु ह्यांच्यासारख्या अधिकारी अर्थशास्त्रज्ञाचे भांडवलशाही व समाजवाद ह्यांच्यावरचे तौलनिक भाष्य समजावून घेण्याची उत्सुकता होती. 'समाजवाद' व 'भांडवलशाही' ह्यांच्या तत्कालीन अनुयायांना अभिप्रेत असलेल्या दोन्ही आर्थिक व्यवस्थांमध्ये आता फार बदल झाले आहेत. तथापी बाजारातील पूर्ण स्वातंत्र्य एका टोकाला तर आर्थिक व्यवहारावर संपूर्ण राजसत्तेचे नियंत्रण ह्या दोन टोकात अजूनही मूलभूत मतभिन्नता कमीअधिक प्रमाणावर तशीच आहे. त्यामुळे समाजवाद विरुद्ध भांडवलशाही हा वाद निर्णायक स्थितीला अजून पोहोचला नाही.

ह्या मूळ वादाचे एक उपांग म्हणून 'साम्यवाद विरुद्ध संमिश्र अर्थव्यवस्था' ह्या चर्चेला काही देशात महत्त्व प्राप्त होत आहे.

आर्थिक व्यवस्थांचा (Economic Systems) अभ्यास करणाऱ्या आर्टस व कॉमर्सच्या सर्वच विद्यार्थ्यांना तसेच I. A. S. व अखिल भारतीय स्पर्धांच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक संदर्भपुस्तक म्हणून उपयुक्त आहे. आपला देश भांडवलशाहीतून समाजवादाकडे वाटचाल करत आहे. त्या दृष्टीने सर्वसामान्य नागरिकाला ह्या दोन्ही पद्धतींत संपत्ती आणि उत्पन्न ह्यांचे वाटप कसे होते, उत्पादनसाधनसामग्रीचा नियोजनपूर्वक वापर कसा होतो, दोन्हीही व्यवस्थांत बेकारी व सामाजिक कल्याण ह्याबाबत कशी स्थिती असते, त्याचप्रमाणे नफा, कार्यक्षमता, व्याजाचे दर ह्यांत काय फरक असतो...अशा महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेता येतील. केंद्रीय नियोजनातील अडचणीही त्याला समजावून घेता येतील.

मूळ पुस्तक प्रमाणभूत आहे. त्यातल्या मजकुरावर भाष्य करण्याची जरुरी नाही. भाषांतरासंबंधी थोडक्यात असे म्हणता येईल की, भाषांतर प्रामाणिक व्हावे ह्या हेतूने जी शब्दरचना, वाक्यरचना झाली आहे तिच्यात एक प्रकारचा कृत्रिमपणा आला आहे. भाषांतरकारांनी सुरुवातीच्या प्रकरणात बऱ्याच पानांवर त्या पानावरील मजकुराच्या मानाने विस्तृत टिप्पणी दिल्या आहेत. मूळ भाषांतराचा तर्जुमा वाचताना असल्या टिपणांचा एक प्रकारे अडथळा होतो. त्यापेक्षा भाषांतरानंतर सर्व काही समजून सांगणारी एक सलग टिप्पणी सारांशरूपाने दिली असती तर बरे झाले असते. अर्थात हा ज्याच्या त्याच्या पसंतीचा भाग आहे. दोष दाखविण्याचा ह्या बाबतीत प्रश्न उद्भवत नाही. हे पुस्तक लिहिताना भाषांतरकाराच्या ज्या पारंपारिक मर्यादा आहेत त्याच लेखकाने पाळल्यामुळे व कदाचित त्याचा नाइलाज झाल्यामुळे पुस्तक म्हणावे तितके सुरस झाले नाही. मात्र ते सकस आहे, अचूक आहे व संदर्भास विश्वसनीय आहे.

ह्या पुस्तकाचे एक नशीब असे की त्याला प्रा. दाभोलकर ह्यांची प्रस्तावना लाभली आहे. ही सोळा पानांची प्रस्तावना अर्थशास्त्राच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मनन करण्यासारखी आहे. 'नामूलं लिख्यते किंचित्' असे ब्रीदवाक्य असणाऱ्या तटस्थ अभ्यासकाची प्रा. पिगु ह्यांची भूमिका, त्यांचे निःपक्षपाती विचार, दीनदलितांच्या बाजूकडे झुकणारी आंतरिक सहानुभूती, बुद्धिवादी विवेचन, अनाग्रही भूमिका ह्या गोष्टींचा प्रा. दाभोलकरांनी आवर्जून उल्लेख केला आहे. त्यामुळे प्रा. पिगु ह्यांचे व्याख्यानरूपाने पुस्तकात ग्रथित झालेले विचार समजून घ्यायला आवश्यक ती पार्श्वभूमी त्यांच्या प्रस्तावनेने सुरू होते. प्रस्तावनेतील पहिल्याच उद्धृत केलेल्या वचनाखालील पिगुऐवजी पिग छापले जाणे व ते संबंधितांच्या तपासणीतून निसटणे ह्यामुळे झालेला निष्पाप विनोद... साऱ्यांनाच मुद्रणाच्या काळजीपूर्वक कामाचे महत्त्व सहज समजावून जातो.

हे पुस्तक प्रत्येक कॉलेजच्या ग्रंथालयात असावे असेच त्याचे महत्त्व व उपयुक्तता आहे.

# संख्याचित्र

**कागदव्यवसाय**

एकूण खाजगी ५९ कागदकारखाने—त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता ९,५३,००० टन. ५ व्या योजनेत ही क्षमता खाजगी क्षेत्रात १,६०,००० टनांपर्यंत वाढयिण्याचे उद्दिष्ट आहे. सार्वजनिक क्षेत्राचे उद्दिष्ट ४ लक्ष टन ठरले असून त्यापैकी एकटया हिंदुस्थान पेपर कार्पोरेशनने त्यातले ५० टक्के उत्पादन करण्याची जबाबदारी घेतली आहे. कागद हार्ड बोर्ड उत्पादनाचे आकडे—

| वर्ष | उत्पादन |
|---|---|
| १९५४ | २,९४,००० टन |
| १९५९ | ४,१०,००० „ |
| १९६९ | ७,०१,००० „ |
| १९७१–७२ | ७,९१,००० „ |
| १९७२–७३ | ८,२५,००० „ |
| १९७३–७४ | ७,६०,००० „ |

कागदकारखाना हा भांडवल-प्रधान धंदा आहे. १०० टन कागद दररोज निर्माण करणाऱ्या कारखान्याकरता कमीत-कमी ४० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक लागते.

५ व्या योजनेत भारतीय जंगलांची शास्त्रशुद्ध लागवड करण्यासाठी ८५० कोटी रुपयांची तरतूद.

**न्यूजप्रिंट उत्पादन**

एकमेव कारखाना नेपानगर. त्याची क्षमता ३०,००० टन ती ७५,००० व्हावी असा संकल्प.

केरळात नवा कारखाना—त्याचे लक्ष्य ८०,००० टन.

म्हणजे एकूण १॥ लक्ष टन उत्पादन ह्या योजनेअखेर होईल असा अंदाज. आपली गरज ३ लक्ष टनांची. कागदाची जागतिक तूट १६० लक्ष टन. विकसित देशांकडून ३० लक्ष टन कागद निर्यात होतो; पण ह्या १० वर्षांत त्यांनाच देशांतर्गत मागणी भागवता येणे अशक्य होईल.

**मोठया खाजगी कंपन्यांची विक्री, उत्पादन, उत्पन्नखर्च इत्यादींचे आकडे ( कोटी रुपयांमध्ये )**

| | १९७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ |
|---|---|---|---|
| निव्वळ विक्री | ५०८९ | ६६२३ | ६०४७ |
| उत्पादन मूल्य | ५१७७ | ५३२९ | ६१४५ |
| एकूण उत्पाजन | ५२७७ | ५७३८ | ६२६६ |
| „ खर्च | ४६९० | ५१४२ | ५५७६ |
| „ नफा | ५८७ | ५९६ | ६९० |
| व्याज | १६४ | १७४ | १८१ |
| कर-तरतूद | १८५ | १९८ | २२९ |
| कर वजा नफा | २३८ | २२४ | २८० |
| डिव्हिडंड | १२४ | १३२ | ११८ |
| उर्वरित नफा | ११४ | ९२ | १६२ |

## राज्य – निहाय कागद-उत्पादनक्षमता


| राज्य | प्रतिवर्षी ३०,००० टन आणि त्यापेक्षा जास्त उत्पादनक्षमता | | प्रतिवर्षी १०,००० टन ३०००० टनांपर्यंत उत्पादनक्षमता | | प्रतिवर्षी १०,००० टनां-पेक्षा कमी उत्पादन-क्षमता | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गिरण्यांची संख्या | उत्पादन क्षमता (१००० टन) | गिरण्यांची संख्या | उत्पादन क्षमता (१००० टन) | गिरण्यांची संख्या | उत्पादन क्षमता (१००० टन) | गिरण्यांची संख्या | उत्पादन क्षमता (१००० टन) |
| प० बंगाल | २ | ११५·० | १ | १९·० | ८ | ३१·९ | ११ | १६५·९ |
| उत्तर प्रदेश | १ | ३९·२ | — | — | २ | ७·२ | ३ | ४६·४ |
| बिहार | १ | ६०·० | — | — | १ | ३·० | २ | ६३·० |
| अ रिसा | १ | ७६·० | २ | ४६·५ | — | — | ३ | १२२·५ |
| हरियाना | १ | ४६·० | — | — | ३ | ९·७ | ४ | ५५·७ |
| मध्यप्रदेश | १ | ६५·० | १ | १३·२ | २ | ४·२ | ४ | ८२·४ |
| गुजरात | — | — | — | — | ७ | २२·७ | ७ | २२·७ |
| महाराष्ट्र | १ | ६९·० | — | — | १२ | ३४·५ | १३ | १०३·५ |
| आंध्रप्रदेश | २ | ८५·० | — | — | — | — | २ | ८५·० |
| कर्नाटक | १ | ४५·० | २ | ३४·८ | २ | १०·९ | ५ | ९०·७ |
| केरळ | — | — | १ | १२·५ | १ | २·७ | २ | १५·२ |
| तामिळनाडू | १ | ३५·० | — | — | २ | ९·० | ३ | ४४·० |
| | १२ | ६३५·२ | ७ | १२६·० | ४० | १३५·८ | ५९·० | ८९७·० |
| | २०·३% | ७०·८% | ११·९% | १४·०% | ६७·८% | १५·२% | १००·०% | १००·०% |

## कागद, कागदी पुठ्ठे आणि कागदलगद्याचे जागतिक उत्पादन

| कागद आणि कागदी पुठ्ठे | १९७२ (००० मेट्रिक टन) | १९७३ | % वाढ |
|---|---|---|---|
| अमेरिका | ५३·८०५ | ५६,३०० | ५ |
| जपान | १३·६४८ | १६,००० | १७ |
| कॅनडा | ११·५२० | १२,२०० | ६ |
| फिनलंड | ४·९६५ | ५,४४६ | ९·७ |
| स्वीडन | ४·५६२ | ५·२०४ | १४·१ |
| ब्रिटन | ४·३३८ | ४·६४१ | ७ |

| कागद–लगदा | १९७२ (००० मेट्रिक टन) | १९७३ | % वाढ |
|---|---|---|---|
| अमेरिका | ४२,२७८ | ४४,५०० | ४·९ |
| कॅनडा | १७,३१४ | १८,२०० | ५·० |
| जपान | ९,४५८ | १०,५०० | १०·० |
| स्वीडन | ८,३०८ | ९,५०० | १४·० |
| फिनलंड | ६,२८४ | ६,६७८ | ६·३ |

( "फायनान्शिअल टाइम्स" लंडन )



# चित्रपट क्रीडा मनोरंजन

# पाच – तीन – दोन

**राजस परचुरे**

## पांच चुटके

### दुसरी भेट

१) पोक्षेकाका आजारी पडले. त्यांना फिजिशियनचा सल्ला घेणे जरुरीचे होते म्हणून त्यांनी विचारले, ' राजू, मला हल्ली बरंच वाटत नाही. जरा डॉक्टरी सल्ला हवा आहे; पण आज-काल ' डॉक्टर–रॅकेट 'मध्ये अडकायची भीति वाटते, म्हणून एखाद्या प्रामाणिक डॉक्टरचे नाव सांग नं !

मी : मग काका, तुम्ही डॉ. कावळे ह्यांच्याकडे जा ना.

काका : अरे, पण ते फार पैसे घेतात ना.

मी : हो; पण फक्त पहिल्या खेपेस १५ रु. त्यानंतर दुसऱ्या व्हिजिटला ते फक्त ३ रुपये घेतात.

दुसऱ्या दिवशी काका डॉ. कावळे ह्यांच्या दवाखान्यात गेले.' डॉ. कन्सल्टिंग रूमचे दार उघडून बाहेर आले. क्षणाचाही विलंब न करता काका म्हणाले, ' डॉक्टरसाहेब, पूर्वीपेक्षा खूपच प्रगति आहे. आपला सल्ला उपयुक्त ठरला. डोकेदुखी बन्द झाली; पण तरी सुद्धा अजून बारीक ताप येतो. त्याला उपाय सांगा.

### कॉमर्स-ट्रेनिंग

२. जयंतीलाल शहांचा मुलगा चंदूलाल जेव्हा मोठा होऊ लागला तसा शेठसाहेब त्याला धंदा शिकवू लागले. असाच चंदू शिकाऊ असताना एकदा एक कोट घेऊन शेठकडे आला व त्याने विचारले,

चंदू : बाबा गिऱ्हाईक विचारतो की हा ' वूलचा ' कोट धुतल्यावर लहान होईल का ?

शेठ : ते कोट गिऱ्हाइकचे अंगावर बसते काय ?

चंदू : नाही, जरा मोठा होतोय अंगाला.

शेठ : मग विचारतेस काय ? सांग धुतल्यावर नक्की लहान होईल म्हणून.

### आदर्श वधूची निवड

३. गोपू उकिडवे मुंबईला आल्यावर त्याला खूप भटक-ल्यानंतर एका ठिकाणी नोकरी मिळाली. तेव्हा तो अतिशय खूष झाला. लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी पोस्टात जाऊन त्याच्या प्रेयसीला त्याने तार पाठवली आणि लग्नाची मागणी घातली. उत्तराकरता तो पोस्टातच थांबला. शेवटी रात्री एकदाचा तिचा होकार आला.

ऑपरेटर म्हणाला : ' मी तुमच्या जागी असतो तर मला इतका वेळ तिष्ठत ठेवणाऱ्या मुलीशी मी लग्नच केलं नसतं.

' नाही. तसं नाही ' गोपू उत्तरला, ' माझ्या मते लग्नास व संसारास योग्य मुलगी तीच की रात्रीच्या तारेच्या दराकरता विलंब करते.

### चांगले-वाईट

४. दोन जिवलग मित्र अण्णा भिडे आणि अप्पा मोने खूप दिवसांनी भेटले. जुन्या आठवणी निघाल्या. अप्पांनी विचारलं,

अप्पा : काय आण्णा, दोस्ता, काय खबरबात आहे ?

अण्णा : काही ऐकण्याजोगी नाही ! अरे, दुर्दैवाने माझं लग्न झालं रे !

अप्पा : वा : कमाल केलीस. मला वाटलं नव्हतं. तुझं लग्न होईल. छान आहे, वंडरफुल !

अण्णा : कसलं वंडरफुल ! माझी बायको अरे, फार तापट ! कजाग आणि मूर्ख आहे !

अप्पा : असं ? हे मात्र वाईट झालं हं.

अण्णा : अरे, वाईट कसलं ? तिच्याकडून चांगला दहा हजार हुंडा मिळाला ना.

अप्पा : वा रे वा ! म्हणजे हुंडा पण ? चांगलं आहे. झकास !

अण्णा : अरे, काय झकास ! मी त्या पैशाने मेंढ्या घेतल्या होत्या; पण त्या सगळ्या रोगामुळे मेल्या.

अप्पा : चू चू चू काय रे वाईट नशीब !

अण्णा : अरे, त्यात वाईट काय ? मी त्यांचं चामडं मेंढ्यांच्या किमतीपेक्षा जास्त किमतीला विकलं.

अप्पा : वा रे ! मोठा चतुर आहेस बुवा.

अण्णा : डोंबलाचं चातुर्य ! मी त्या पैशांनी घर विकत घेतलं पण ते घर नुकतंच जळून खाक झालं !

अप्पा : आं; काय म्हणतोस ? म्हणजे चांगलंच नुकसान झालं की रे.

अण्णा : (हळूच बोलतो) तसं काहीच नुकसान नाही रे ! माझी बायको त्या घरात होती. काय समजलास ?

### कंजूषीची कमाल

५. जो माणूस चष्म्याच्या काचा झिजू नयेत म्हणून त्यांच्या-वरून पाहतो तो खरा कंजूष.

## तीन विचार

१. तुम्हाला ज्ञान किती आहे ह्यापेक्षा असलेल्या ज्ञानाच्या सहाय्याने तुम्ही किती कार्य करता ह्याला जास्त महत्त्व आहे.

२. अल्पसंतुष्ट राष्ट्र वा व्यक्ती ह्याची आर्थिक प्रगती होणे कठीण.

३. कोणताही उद्योग–धंदा जसा अवाढव्य विस्तारतो तशी त्यातली गुंतागुंत वाढते आणि त्याचा ऱ्हास सुरू होतो.

## दोन कोडी

१. नवाब मीर सज्जादअली रौशनअली शौकत यांना झाडे लावण्याचा फार शौक होता. एकदा त्यांनी आपल्या माळ्याला बोलावलं. ते त्याला म्हणाले, ' बागवाँ, आमची ख्वाहिश आहे की तुम्ही बगीच्यात १९ झाडे लावावी; पण ती ९ ओळीतच पाहिजेत आणि प्रत्येक ओळीत पाच झाडे पाहिजेत. अशी रचना तयार करा. ' बागवानाने ही रचना कशी करावी ?

२. तीन मुले एका वेळेस एका गोल ट्रॅकच्या सुरुवातीच्या बिंदूपासून पळू लागली. त्या वर्तुळाचा व्यास ४२ मीटर आहे. मुलांचे वेग अनुक्रमे २·५, ३, ३·५ मीटर (सेकंदाला) आहेत. काही वेळाने ती तिन्ही मुले पुन्हा सुरुवातीच्या बिंदूपर्यंत येऊन पोहोचली. त्यातील प्रत्येक मुलगा किती अन्तर पळाला असेल ? ◻

# कंपन्यांच्या कारभाराची मेख

श्री. वा. काळे

नुकताच मी मुंबईला गेलो होतो. त्या वेळी माझे मित्र श्री. र. पु. करंदीकर ह्यांची नेहमीप्रमाणे भेट झाली. श्री. करंदीकर हे एका मोठ्या यशस्वी कंपनीचे चीफ अकौंटंट आहेत. कंपन्यांच्या कारभाराचे अंतरंग त्यांच्याकडून चांगले समजते. कारण त्यांचे अवलोकन मार्मिक असते.

सध्या वृत्तपत्रांतून कंपन्यांच्या मुदत ठेव योजनांच्या जाहिराती येत असतात. त्यासंबंधी आमचे बोलणे झाले. श्री. करंदीकर म्हणाले, "ह्या जाहिरातीत संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय ही दिलेली असतात. कुणी संचालक व्यापारी, तर कुणी कारखानदार, कुणी कन्सल्टिंग इंजिनिअर, तर कुणी बिझिनेस एक्झिक्युटिव्ह असतो. ह्यांपैकी फारच थोडे संचालक कंपनीच्या कारभारात लक्ष घालतात. त्यांनी लक्ष घालावे अशी प्रमुख सूत्रधारांची अपेक्षाच नसते. ज्यांना कंपनीच्या खर्चाने अमेरिकेची वारी करायला मिळते, क्रिकेट किंवा टेनिसच्या सामन्यांसाठी विमानाने जाऊन फाइव्ह स्टार होटेलमध्ये रहायला मिळते, ते प्रमुख सूत्रधाराच्या चालत्या गाड्याला कशाला खीळ घालतील? सभेच्या उपस्थितीचा भत्ताही भरपूर असतो. कंपनीच्या प्रमुख सूत्रधाराला असे नामांकित संचालक प्रियच असतात. काही संचालक प्रमुख सूत्रधाराचे सगे-सोयरेच असतात, तर काही संचालक त्यांचे मित्र असतात. एखादा संचालक त्याचा खास सल्लागार असतो; पण सामान्यत: स्पष्ट मत सांगणारे संचालक सूत्रधाराला सोयीचे वाटत नाहीत. त्याला संचालकमंडळाचा एकमुखी पाठिंबा हवा असतो आणि आपले ज्यांच्याशी पटेल, अशाच संचालकांना तो संचालकमंडळात घेतो किंवा ठेवतो आणि स्वत:चे काम सुकर करतो.

"कंपनीचा कारभार कोण आणि कसा चालवितो?" ह्या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. करंदीकर म्हणाले, "कंपनीचा सूत्रधार हाच कंपनीचा कारभार चालवितो; कंपनीची व्यवस्था संचालकमंडळाच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली चालते, अशी कायदेशीर तरतूद असली तरी व्यवहारात ही देखरेख व नियंत्रण मामुली, अपथ्य असते. सूत्रधार प्रत्यक्ष काम करताना दिसणारही नाही. कित्येक आठवडे तो कारखान्यात फिरकणारही नाही. तरीसुद्धा, सर्व कामे व्यवस्थित चालू रहातात. ह्याचे कारण त्याने आपल्या अधिकाऱ्यांची योग्य निवड केलेली असते, त्यांना कामे वाटून दिलेली असतात. तो त्यांच्या कामात हस्तक्षेप करीत नाही; परंतु हे अधिकारी आपआपली कामे दक्षतेने करीत आहेत ना, ह्याकडे त्याचे बारकाईने लक्ष असते. काही विशिष्ट प्रमाणाबाहेर भ्रष्टाचार वाढळून आला, तर त्यांची तात्काळ उचलबांगडी केली जाते. कमी दर्जाचा माल खरीदला जात नाही ना, ह्याकडेही लक्ष ठेवले जाते. कारण भ्रष्टाचाराला येथेच वाव असतो. उत्पादनाचा दर्जा चांगला राखण्याकडे सूत्रधाराचा कटाक्ष असतो. काही कंपन्यांचे सूत्रधारच कंपनीच्या हितापेक्षा स्वत:चा खिसा गरम करण्याला प्राधान्य देतात. त्यांची गोष्ट वेगळी. त्यांना कंपनीपेक्षा स्वार्थ महत्त्वाचा वाटतो; भविष्यकाळापेक्षा चालू घडीकडे त्यांचे लक्ष असते."

सूत्रधाराला विरोध करण्यास सहसा कुणी संचालक तयार होत नाही. असा कुणी तत्त्वनिष्ठ संचालक धजलाच, तर सूत्रधार त्याच्यावरच कंपनीच्या कटकटींची जबाबदारी टाकण्यास तयार होतो आणि विरोधकांची तशी तयारी नसते. उदाहरणार्थ संचालकमंडळाच्या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर 'येत्या महिन्यात परतफेड करावयाच्या ठेवींच्या रकमेची तरतूद' असा विषय ठेवला, म्हणजे विरोधकालाही मौन पाळून सूत्रधाराला आवश्यक ती मोकळीक अप्रत्यक्षरीत्या द्यावीच लागते. काही संचालक कंपनीच्या कारभारात सुधारणा सुचवितात, दोष दाखवितात, पण अत्यंत सावधगिरीने; सूत्रधाराशी आपले सलोख्याचे संबंध बिघडणार नाहीत ह्या धोरणाने. स्पष्टवक्ता संचालक फार काळ टिकत नाही; तो तरी कंटाळून जातो किंवा त्याला निवृत्त होण्यास अप्रत्यक्ष रीत्या सुचविले जाते. ऑडिटरची नेमणूक भागधारक करतात; त्याचे नाव सुचविण्याचे संचालक कटाक्षाने टाळतात; पण तो सुद्धा सूत्रधाराच्याच पसंतीचा ठरतो. आपण स्वत: कायद्याच्या कचाट्यात सापडणार नाही ना, पुन: आपली नेमणूक होण्यास सूत्रधाराचा अप्रत्यक्षही विरोध होणार नाही ना, हे पाहूनच ऑडिटर आपले कर्तव्य बजावीत असतो. अशा रीतीने, सूत्रधाराच्या कार्यक्षमतेवरच सर्व काही अवलंबून असते.

कंपनीमध्ये कंपनीचा सूत्रधार—चालक हाच खरा महत्त्वाचा माणूस; त्याच्या पदाचे नाव काही का असेना. तोच ताळेबंद तयार करतो आणि ऑडिटरकडून तपासून घेतो. त्यावर संचालक विश्वासाने सह्या करतात. हा ताळेबंद किती वस्तुनिष्ठ असतो, हे मुख्यत: सूत्रधारावरच अवलंबून असते. कंपनीचे यश सूत्रधारच घडवीत असतो.

व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवणारे आणि देखरेख करणारे संचालक ह्यांची निवडणूक वार्षिक साधारण सभेत भागधारक करतात; कंपनीचे हिशेबतपासनीसही भागधारक नेमतात, असा कायदा आहे; देखावाही तसा असतो; परंतु कुशल सूत्रधार अदृश्य कारवाईने सर्व काही घडवीत असतो. ह्या ढालीचा तो किती सदुपयोग करतो, ही कंपन्यांच्या कारभाराची खरी मेख आहे, असा श्री. करंदीकरांच्याबरोबर झालेल्या चर्चेचा समारोप करता येईल.

सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.


लहानशा जलाशयात,
आकाशाचे प्रतिबिंब !
छोट या गोष्टीतही कितीतरी मोठी शक्ति दडलेली असते. रोज फक्त वीस पैशांची बचत करा पाच वर्षांनी ४२५ रुपये परत घ्या.
बँक ऑफ महाराष्ट्रची
लोकमंगल
दैनिक ठेव योजना
• २० पैशांची छोटी बचत बँकेचा अधिकृत प्रतिनिधी रोज तुमच्या घरी येऊन घेऊन जाईल.
• चार वर्षांनी ६ टक्के व्याजासह तुमची रक्कम परत केली जाईल
तुमच्या व्यक्तिगत गरजा भागविण्यासाठी तयार केलेल्या वरीलप्रमाणेच आणखी अनेक योजना आमच्या जवळ उपलब्ध आहेत. सविस्तर माहितीसाठी आमच्या नजिकच्या शाखेस भेट द्या. तुमच्या संकटकाळात उपयोगी पडणारा एकमात्र जिवलग मित्र.
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७. बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.